# माणूस

## जेव्हा दोस्त सेना ऱ्हाइन ओलांडते…

"माझी अशी प्रामाणिक श्रद्धा आहे की, आघाडीवरील या विजयाच्या क्षणी मरण येते ते चर्चिल यांना आवडले असते.


त्यांनी मला अनेक वेळा सांगितले होते की, लढत असताना मरण यावे, कारण त्यावेळी रक्त सळसळत असते व

मृत्यू येतो आहे हे देखील माणसाला कळत नाही."

**नाझी भस्मासुराचा उदयास्त** [पृ. ५३]

तीस पैसे : १ जानेवारी १९६६

## पतंगाचा वेगळाच खेळ






वर्ष पाचवे : अंक पंधरावा : १ जानेवारी १९६६
किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## निवेदन

'माणूस'च्या पंचवीस [तीस] पैसे प्रयोगाला एक वर्ष पूर्ण होत आहे. या प्रयोगाला मराठी वाचकांनी ज्या तत्परतेने साथ दिली त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करणे अवश्य आहे. त्यांच्या सक्रीय सहकार्याशिवाय हा प्रयोग यशस्वी होणे अशक्यच होते. यापुढे मात्र वाढते भाव, कागदाची टंचाई यामुळे केवळ तीस पैसे किमतीत 'माणूस'चा अंक देणे परवडू शकणार नाही. पुढील अंकापासून [दि. १५ जानेवारी १९६६] 'माणूस'च्या प्रत्येक अंकाची किंमत चाळीस पैसे राहील याची वाचकांनी व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी ही विनंती. वार्षिक वर्गणी दिवाळी व इतर विशेषांकासहित दहा रुपये.

वाचकांचा 'माणूस'वरील लोभ कायम राहील ही अपेक्षा.

**प्रकाशक**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# ता श्कं द. . . . . इ ति हा सा ची

ताश्कंदची तयारी जोरात सुरू आहे. या ताश्कंद बैठकीला पंतप्रधान शास्त्री यांच्यासमवेत परराष्ट्रमंत्री श्री. स्वर्णसिंग, संरक्षणमंत्री श्री. चव्हाण व इतर बराच मोठा अधिकारीवर्ग जात आहे, ही एक सूचक घटना वाटते. वरवर जरी या बैठकीकडे उभय पक्ष साशंकतेने पाहात आहेत असे दिसले, तरी आतून काश्मीर व भारत-पाक संबंध यांच्या बाबतीत काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले तर अडचण पडू नये या दृष्टीने आपल्या-समवेत येणाऱ्या सहकारी मंत्र्यांची व अधिकारीवर्गाची निवड शास्त्री-जींनी केली असावी. तसे पाहिले तर या बैठकीचे प्रयोजनच काय होते? अध्यक्ष आयूबखान यांना भारत-पाक वैराचे काश्मीर हेच एकमेव कारण वाटते तर पंतप्रधान शास्त्रीजी काश्मीरबाबत वाटाघाटींना काही जागा आहे हेच मान्य करण्यास तयार नाहीत. इतके तीव्र मतभेद बहुधा शस्त्र-बळानेच सुटत असतात, सोडवावे लागतात. वाटाघाटींच्या टेबलावर अशा प्रखर द्वंद्वांचा निकाल लागत नसतो. असे असूनही ज्या अर्थी वाटा-घाटी सुरू होत आहेत, इतकेच नव्हे तर शास्त्रीजी नेहमीची प्रथा सोडून दोन सहकारीमंत्री व मोठा अधिकारीवर्ग मदतीसाठी आपल्यासमवेत नेत आहेत, त्या अर्थी मतभेदांची तीव्रता दाखविली जाते त्यापेक्षा कमी आहे, काश्मीरबाबत देवाणघेवाणीला, तडजोडीला जागा आहे. कच्छ-बाबत असाच वाटाघाटींना मुळीच वाव नव्हता, आपले सार्वभौमत्व अबाधित होते, आपली भूमिका ठाम होती......वगैरे; तरीही कच्छ-करार झालाच. काश्मीरबाबत ताश्कंद-बैठकीत याच इतिहासाची पुनरा-वृत्ती होण्याची खूपच शक्यता दिसते.

# पुनरावृत्ती होणार काय?

अमेरिकेने विद्युत्वेगाने सुरू केलेली धान्य मदत या शंकेला दुजोरा देते. आठ पंधरा दिवसापुर्वीची खळखळ आणि विरोध कुठे आणि हा अचानक मदतीचा पूर कोठे ! आमचे अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् जातात काय, पूर्वीचे विरोधी वातावरण एकदम निवळते काय, धान्य रवाना करण्याची अमेरिकेची तत्परता काय, जॉन्सन-सुब्रह्मण्यम् यांची भेट काय–? (रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील यांची जॉन्सन यांच्याशी भेट होऊ शकली नव्हती ! )अमेरिकेच्या या अचानक हृदयपरिवर्तनाची वेळ आणि ताश्कंद बैठकीची वेळ जमून येते हा केवळ योगायोग नव्हे. ताश्कंद बैठकीला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा आहे याचे हे द्योतक आहे. बैठकीपूर्वी परिस्थिती निवळलेली असावी, वातावरणातील तंगी कमी झालेली असावी यासाठी अमेरिकेने घाईघाईने केलेली ही कृती आहे. काश्मीरबावत काहीतरी देवाणघेवाण करून सन्मान्य तडजोड घडवून आणण्याचे शास्त्रीजींवरचे दडपण यामुळे वाढले आहे, यात शंका नाही.

रशियाचा पुढाकार आणि अमेरिकेचा पाठिंबा ही वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमी असल्याने ताश्कंद बैठकीत काश्मीर प्रश्नाचा विचार मुख्यत: चीनच्या संदर्भातच होण्याची शक्यता अधिक आहे. रशिया–चीन वैर आता निकरावर आले आहे. चिनी फौजा रशियन सीमेवर हालचाली करीत आहेत अशाही वार्ता आहेत. अमेरिकेप्रमाणेच रशियालाही चीनच्या वाढत्या धोक्यापासून भय आहे, त्या दृष्टीने चीनविरुद्ध लष्करी व राजनैतिक फळी उभी करण्याची तीव्र गरज आहे. चीनविरुद्धच्या या व्यापक जागतिक हालचालींत काश्मीरचे स्थान मध्यवर्तीच आहे.

या मध्यवर्ती प्रश्नाबाबत भारत–पाक सलोखा घडवून आणून चीनला शह देणे, पाकिस्तानला पुन्हा आपल्या गोटात खेचून चीनला एकाकी करणे असा रशिया–अमेरिका यांचा ताश्कंद बैठकीमागील संयुक्त उद्देश असणे स्वाभाविक आहे. शास्त्रीजींनाही हा चीनविरोधी बनाव मान्य होण्यासारखाच आहे. म्हणून वाटते, की ताश्कंद बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, काश्मीरबाबत एखादा नवाच पर्याय पुढे येईल. कच्छबाबत फक्त इंग्लंडचेच दडपण आपल्यावर होते; या वेळी रशिया–अमेरिका असे संयुक्त दडपण आहे. भारतातील लोकमत व भारतीय सेनेच्या काश्मीरबाबतच्या तीव्र भावना याही शास्त्रीजींना विचारात घ्याव्याच लागतील. या परस्परविरोधी ताणातून कशी काय वाट निघते ते पाहायचे. पण ही वाट देवाणीच्या दिशेने असेल, घेवाणीची आपली शक्यता कमी–असे समजून चालण्यास हरकत नाही.कारण युद्ध आपण अर्धवट स्थितीत सोडलेले आहे. पाकिस्तानचा कोणताही महत्त्वाचा भूभाग निर्णायकरीत्या आपल्या ताब्यात नाही. हुकमाची पाने हाती नसताना आपण खेळाला सुरुवात करणार आहोत. खेळातील चतुराई काय हात देईल तेवढाच आधार.

श्री. ग. मा.

मध्यमवर्गीयांना उपयोगासाठी लागणारे सर्व प्रकारचे सुंदर, मजबूत आणि टिकाऊ, तसेच हॉस्पिटल्स आणि ऑफिसेस यांना लागणारे उत्तम फर्निचर ऑर्डरप्रमाणे बनवून मिळण्याचे एकमेव ठिकाण,

**स्टँडर्ड फर्निचर वर्क्स** (के. के. मुळे)

नूर बिल्डिंग, तुळशीपाईप रोड, दादर (बी. बी.)
रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई २८.

# विचार धारा

समीर

**● पुस्तकी किडयाचे ज्ञान**

" हिंदुस्थान आज आधुनिक पुनरुत्थानाच्या उंबरठ्यावर उभा आहे, आणि हा पुनरुत्थानाचा सोपान शिक्षणाकडेच नव्हे, तर प्रत्यक्ष जीवनाकडेही शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्याशिवाय चढता येणार नाही. पण इकडे येणाऱ्या परदेशी माणसाला येथल्या माध्यमिक ( ' सेकंडरी ' ) शिक्षणात निव्वळ पुस्तकावरचा भर पाहून " फार मोठा धक्का " बसतो; येथल्या शिक्षणाची आर्थिक व तांत्रिक गरजांशी सांगड घातलेली नाही, " असे उद्गार गेल्या आठवडयात डॉ. क्लॅटन विल्यम्स या अमेरिकन शिक्षण-तज्ज्ञाने दिल्लीत काढले.

डॉ. विल्यम्स हे अमेरिकन सरकारच्या ' एजन्सी फॉर इंटर्नॅशनल डेव्हलपमेंट इन् इंडिया ' या संस्थेचे प्रमुख शैक्षणिक सल्लागार आहेत. " हिंदुस्थानातील शाळांतल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांची ताबडतोब द्रव्यार्जनासाठी तयारी केली पाहिजे. म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला त्यांचा हातभार लागेल " असे विल्यम्स म्हणतात, आणि या दिशेने भारतीय शिक्षण-पद्धतीची पुनर्रचना करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

हिंदुस्थानात सध्या १० वर्षांच्या वरचे २६ कोटी लोक निरक्षर आहेत व दर वर्षी त्यांची संख्या ४० लाखांनी वाढत आहे; म्हणजे अशिक्षित भारतीयांची संख्या दक्षिण अमेरिका व आफ्रिका मिळून होणाऱ्या अशिक्षित जनतेच्या संख्येपेक्षाही मोठी आहे. भारतात सध्या ज्या गतीने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा प्रसार होत आहे, त्या गतीने निरक्षरतेवर मात करायला कित्येक दशके लागतील. शिवाय हिंदुस्थानात शिक्षण प्रसाराच्या कार्यातली सर्वांत मोठी समस्या म्हणजे सर्व प्रकारच्या व्यावसायिक व आधुनिक तंत्राने होणाऱ्या कामासाठी मुलामुलींना तयार करणारी बहुगुणी ( ' मल्टिपर्पज ' ) माध्यमिक शिक्षणपद्धती आखायला पाहिजे. पण व्यवसाय-शिक्षकांच्या ' भयंकर तुटवडयामुळे हे काम दुर्धर झाले आहे. प्रत्येक माध्यमिक शाळत शेतकीविषयक, व्यापारविषयक व तांत्रिक अशा तीन प्रकारच्या

शिक्षणासाठी चांगले शिक्षक पाहिजेत. शिवाय मुलींसाठी गृहविज्ञानाची सोय असली पाहिजे.

विज्ञानाचे शिक्षण भारतात जगाच्या कित्येक वर्षे मागे आहे. आधुनिक शोधांशी त्याचा संबंध नाही, अभ्यासक्रम ठरीव ठशाचा आहे. पुस्तके जुनाट आहेत व प्रयोग-शाळा साधने व उपकरणांच्या बाबतीत दरिद्री आहेत. विद्यार्थ्यांना मुख्यत: प्रयोग-शील (' प्रॅक्टिकल् ') व्हायला शिकवायला हवे, त्याऐवजी त्यांना टाकाऊ सिद्धान्त आणि परीक्षार्थी ज्ञान पाजण्यात येते. पण आता ही परिस्थिती बदलण्यासाठी ' समर स्कूल ' (उन्हाळयाचे वर्ग) नावाची अमेरिकन शिक्षण–पद्धती अवलंबिण्यात येत आहे.

तांत्रिक शिक्षण देण्यासाठी देशात २७० पॉलिटेक्निक्स (तंत्रशाळा) आहेत, पण त्यांच्या शिक्षणपद्धतीत तावडतोब फरक करणे आवश्यक आहे. " परखड शब्दांत सांगायचे म्हणजे या पॉलिटेक्निक शाळा केवळ ' पाणी मिसळलेली ' इंजिनियरिंग कॉलेजे आहेत. " पॉलिटेक्निक शाळा म्हणजे इंजिनियरिंग कॉलेज नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. या शाळा जर देशाची औद्योगिक गरज भागविणार असतील तर त्यांच्यांत चांगलीच सुधारणा व्हायला पाहिजे. प्रत्येक पॉलिटेक्निक शाळेचा अभ्यासक्रम आसमंतातल्या औद्योगिक हालचालींशी निगडित ठेवला पाहिजे. आणि पॉलिटेक्निकमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याला पहिल्या दिवसापासून हाताने काम करायला शिकवायला पाहिजे. अभ्यासक्रमात प्रयोगशाळेला पहिले स्थान पाहिजे. " तांत्रिक शिक्षणावर देशात होणारा खर्च आणि देशात निर्माण होणारी संपत्ती यांचा निकटचा संबंध आहे. "

## ● साहसाची दुनिया

स्काउटिंगचे शिक्षण हिंदुस्थानात ३० वर्षांपूर्वी ज्या पद्धतीने देण्यात येत होते तीच पद्धत आजतागायत कायम आहे. तिच्यात काही सुधारणा व्हायला पाहिजे, अशी जाणीव स्वातंत्र्यानंतर आता थोडयाच दिवसांपूर्वी निर्माण झाली असून श्री. जॉन थर्मन हे ' इंटर् नॅशनल ट्रेनिंग सेंटर 'चे शिबिर-प्रमुख व स्काउटिंग तज्ज्ञ यांना नवीन पद्धतीचे स्काउटिंग-शिक्षण देण्यासाठी हिंदुस्थानात बोलावण्यात आले आहे. थर्मन म्हणतात, " स्काउटिंग ही मुख्यत्वे एकाच परिसरात राहणाऱ्या आणि ' आउट–डोअर ॲक्टिव्हिटी ' ची आवड असलेल्या मुलांची संघटना आहे. " याच उद्देशाने ती सुरू झाली; पण आशियाई देशांतली मंडळी गोऱ्या साहेबाने ती यथे सुरू करण्याची वाट पाहात बसली. त्यामुळे स्काउटिंग येथल्या जमिनीत—म्हणजे क्षितिजापलीकडे काय आहे हे शोधून काढण्याची ईर्ष्या बाळगणाऱ्या तरुण मुलांच्या मनांत रुजले नाही. इतर देशांत गिर्यारोहण, स्किइंग, सर्फ रायडिंग, स्किन डायव्हिंग या सर्व गोष्टींचा स्काउटिंगमध्ये समावेश झाला आहे; पण हिंदुस्थानातले

स्काउटिंग मात्र बव्हंशी वर्गांतले धडे आणि वार्षिक संमेलन एवढ्यापुरते मर्यादित राहिले आहे.

जगातला प्रत्येक पिता आपल्या मुलाला सर्व काही पुरवू पाहतो-पण त्याला धकाधकीच्या दुनियेत लागणारी मैत्री मात्र देत नाही. उलट संध्याकाळी थकून भागून हातांत वर्तमानपत्र घेऊन बसणारे बापच सगळीकडे दिसतात. म्हणून मुलांच्या मनांतली साहसाची दुनिया प्रत्यक्षात उतरविण्यासाठी दमदार स्काउट-मास्तरची आवश्यकता प्रत्येक समाजात असते. कृती आणि साहस यांच्या बाबतीत स्काउट-मास्तर हा मुलांना आदर्श वाटला पाहिजे.

## ● लोकशाहीचे भवितव्य काय ?

भारतीय लोकशाही आणि पाकिस्तानी हुकूमशाही यांच्यांत झालेला सशस्त्र संघर्ष अजून ताजाच आहे. तेव्हा थोड्याच दिवसांपूर्वी दिल्लीत 'लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर दोन दिवसांचा एक परिसंवाद झाला हे कालानुरूपच होते. भारतीय विचारवंतांच्या या बौद्धिक मेळाव्यात एक परदेशी पाहुणे बोलले, ते म्हणजे ऑस्ट्रेलियाचे भारतातील हाय-कमिशनर सर आर्थर टँग. श्री. टँग म्हणाले : ऑस्ट्रेलियन सरकारच्या मते आशियातील लोकशाहीला वळण लावण्याच्या कामी तीन घटना प्रमुखपणे कारणीभूत झाल्या आहेत. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे लष्करशाही जपानचा पराभव आणि आधुनिक, उदारमतवादी जपानचा उदय. दुसरी म्हणजे आधुनिक भारताचा जन्म. आणि तिसरी गोष्ट म्हणजे सहजीवन व सहकार्य धुडकावणारे, आशियाभर स्वतःचे राजकीय वर्चस्व स्थापण्याच्या ध्येयाला वाहिलेले, आणि आपले धोरण अमलात आणण्यासाठी धमक्या व शस्त्र-सामर्थ्य यांचा वापर करणारे असे सरकार चीनमध्ये सत्तेवर येणे. या त्रयीच्या जोडीला दुसरी एक त्रयी सांगताना श्री. टँग म्हणाले : आशियात लोकशाहीच्या जोपासनेसाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे– एक म्हणजे कुठल्याही एका राजसत्तेचा वरचष्मा नको; दुसरे म्हणजे आशियात लोकशाही वाढावी अशी खरोखरीच इच्छा असणाऱ्या आशियेतर देशांशी आशियाने संबंध ठेवला पाहिजे, आणि तिसरे म्हणजे आशियाई देशांचा एकमेकांशी परिणामकारक विचार-विनिमय होत राहिला पाहिजे.

●

# डॉ. राठी

## एका प्रयोगशील व प्रगत कारखानदाराचे मनोगत

### लेखक : मधुकर परांजपे

पुण्यातील सुदर्शन केमिकल वर्क्सचे डॉ. राठी म्हणजे एक कारखानदार. रूढ समजाप्रमाणे भांडवलशाहीचे ते कट्टर पुरस्कर्ते व कम्युनिझमचे ते कट्टर विरोधक असणे स्वाभाविक होते. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. दोन्ही पद्धतींचा त्यांचा अभ्यास आहे, दोन्ही पद्धतींमधील गुणदोषांवर त्यांनी विचार केला आहे. अमेरिकेत तर त्यांचे शिक्षणच झाले आहे; पण रशिया व पूर्व युरोपातील देशांनाही त्यांनी कमीअधिक मुदतीच्या भेटी देऊन तेथील आर्थिक विकासाचे अवलोकन केलेले आहे. या दोन्ही पद्धतींचा समन्वय भारतात घातला जावा, असे डॉ. राठी यांना मनापासून वाटते.

आज डॉ. राठी यांचे वय केवळ ४२ वर्षांचे आहे. पुण्याच्या सुप्रसिद्ध नूतन मराठी विद्यालयातून १९४१ साली मॅट्रिक होऊन फर्ग्युसन कॉलेजात त्यांनी नाव नोंदवले. इंटर सायन्सनंतर बनारस हिंदू विद्यापीठातून 'औद्योगिक रसायन' हा विषय घेऊन ते बी. एस्‌सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. १९४६ साली एका कार्गो बोटीतून अमेरिकेस जायची त्यांना संधी मिळाली. ओहियो विद्यापीठाची 'केमिकल इंजिनियरिंग'ची एम्. एस्. ही पदवी त्यांनी संपादन केली. जवळजवळ नऊ-दहा महिने अमेरिकेतील रासायनिक कारखान्यांतून त्यांनी काम केले. 'केमिकल इंडस्ट्री'-वर त्यांनी लिहिलेला प्रबंध विद्यापीठाने मान्य करून त्यांना पीएच्. डी. ची पदवी दिली.

युरोपातील केमिकल इंडस्ट्रीजची पाहणी करून हिंदुस्थानात ते परतले व १९५१ साली शंकरशेट रोडवर डॉ. राठींनी पिग्मेंट्स तयार करणारा भारतातला पहिलाच कारखाना सुरू केला. सुरुवातीला देशाची शंभर टक्के गरज भागविणारा हा कारखाना उद्योगधंद्यांत प्रगती करीत असलेल्या देशाची पस्तीस टक्के गरज आजही भागवीत आहे. पिग्मेंट्सच्या बाबतीत देशाने मिळविलेल्या स्वावलंबनात 'सुदर्शन

☐ रशियन लोकांचे वैशिष्टय म्हणजे ते देशात झालेला मालच वापरतील....

☐ मध्यम दर्जाची कारखानदारी आपल्याकडे आज कोसळण्याची भीती निर्माण झालेली आहे....

केमिकल्स इंडस्ट्रीज 'चा वाटा फार मोठा आहे. ६५ हजारांच्या खपावरून गेल्या चौदा वर्षांत ७५ लाखांपर्यंत उडी या कारखान्याने मारली आहे. दिवसेंदिवस कारखान्याचे क्षेत्र अधिकाधिक वाढत आहे ते या कारखान्याचे कर्तेकरविते डॉ. राठी यांच्या कुशल मार्गदर्शनामुळेच.

रशिया, अमेरिका या देशांबरोबरच युरोपखंडातील अनेक देशांतील कारखानदारीची त्यांनी पाहणी केली असून आपल्या कारखान्यात तयार होणारी पिग्मेंट्स त्याच दर्जाची कशी राहतील, याकडे डॉ. राठी अधिक लक्ष पुरवितात. या क्षेत्रात अधिकाधिक संशोधन व्हावे म्हणून खास ' संशोधन–प्रयोगशाळा 'ही त्यांनी सुरू केली आहे. कारखान्यात तयार झालेला माल परदेशीसुद्धा पाठविला जातो.

पण या साऱ्या गोष्टींचा डॉ. राठींना गर्व नाही. आल्या-गेल्याची आस्थेवाईकपणे ते चौकशी करतील, त्यांच्याशी एखाद्या मित्राप्रमाणे गप्पा मारतील. मोठेपणाच्या चौकटीत स्वतःला गुरफटवून न घेता एखाद्या कामगाराप्रमाणे कारखान्याच्या कामात मश्गुल झालेले ते तुम्हांस दिसतील. सबंध दिवस कारखान्यात बसून राहिलेला कारखान्याचा मालक क्वचितच दिसतो, पण डॉ. राठींच्या बाबतीत हे घडते खरे. मुलाखतीचे निमित्त पुढे करून तीन–चार वेळा तरी मी त्यांच्याकडे गेलो असेन. दर वेळी त्यांच्या वागणुकीचा नवा पैलू मला पाहायला मिळाला.

अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांचा विचार करताना भारताचा त्यात समावेश करण्यास ते विसरणार नाहीत. तसेच, कुठल्याही गोष्टीची वृथा स्तुती करण्याची त्यांची वृत्तीच नाही. अमेरिकन भांडवलवादाची स्तुती करताना रशियाच्या साम्यवादाला ते मुळीच नावे ठेवणार नाहीत. अमेरिकेच्या औद्योगिक प्रगतीचा उल्लेख करताना चाळीस वर्षांच्या अल्पावधीत रशियाने केलेल्या नेत्रदीपक प्रगतीचे गुणगान मुक्तकंठाने राठी करतात. मोडक्या-तोडक्या रशियन भाषेच्या जोरावर

रशियाच्या सामाजिक जीवनात आपण कसे वावरलो, याचे ते रसभरीत वर्णन करतील. पण त्याचबरोबर रशियातील शिक्षणपद्धती बऱ्याच अंशी तेथील प्रगतीस कशी जबाबदार आहे, याची माहिती देतील. आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण संपल्यावर प्रत्येक विद्यार्थ्यास एखाद्या तांत्रिक विषयाचे ज्ञान असलेच पाहिजे या दृष्टीने तेथे दक्षता घेतली जाते. त्यामुळे 'पुस्तकी पंडित' वा 'पढतमूर्ख' विद्यार्थी रशियन शाळांतून बाहेर पडत नाही, तर एक कुशल कामगार म्हणून तो वावरतो. तांत्रिक शिक्षणावर रशियात एवढा भर देण्यात आला की, १९६० मध्ये एक लाख सतरा हजार इंजिनिअरिंगचे पदवीधर निर्माण झाले. ही संख्या अमेरिकेच्या तिप्पट होती.

## रशियातील नियोजन

रशियाच्या प्रगतीचे दुसरे महत्त्वाचे अंग नियोजन हे आहे. नियोजनाशिवाय कुठलीही गोष्ट रशियात केली जात नाही. डॉ. राठी म्हणाले, "कुठलाही एखादा कारखाना उभारायचा झाला, की त्याविषयीची सारी माहिती वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली जाते व त्याबद्दल तज्ज्ञांकडून, जनतेकडून सूचना मागविल्या जातात. या सूचनांचा विचार करून मगच कारखान्याचा शेवटचा आराखडा तयार होतो. कारखान्यास लागणारा कच्चा माल, विद्युत् पुरवठा या सर्व गोष्टींची तरतूद प्रथम केली जाते. जी गोष्ट कारखान्यांच्या बाबतीत, तीच गोष्ट इतर सर्व योजनांच्या बाबतीत रशियात लागू केली जाते. केवळ कारखाना सुरू केला म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर उत्पादनवाढीसाठी हरप्रकारे चालना देण्यात येते. बोनससारखी कामगारांना उत्तेजन देणारी पद्धत म्हणा वा कारखान्यास होणाऱ्या नफ्यातून कामगारांसाठी बांधण्यात येणारी घरे, दवाखाने यांसारख्या सुखसोयी म्हणा, या गोष्टींनी कामगाराला अंग मोडून काम करण्यास उत्साह वाटतो. व्यवस्थापकीय मंडळींनाही बोनस मिळतो; पण तो काहीसा वेगळ्या निकषावर देण्यात येतो. कारखान्यास झालेला नफा हा घटक तर ध्यानात घेतला जातोच, पण त्याशिवाय कारखान्यात तयार झालेल्या मालास खर्च किती आला यावर हे बोनसचे प्रमाण अवलंबून असते. ह्या मालास जर खर्च कमी आला असला तर साहजिकच बोनसचे प्रमाण वाढते. अशा तऱ्हेने कामगार उत्पादनवाढीसाठी प्रयत्नशील राहतो तर व्यवस्थापकीय मंडळी निर्माण होणारा माल कमीत कमी किंमतीस कसा पडेल याविषयी दक्ष राहतात. परिणाम असा होतो की, व्यवस्थापक व कामगार ही कारखान्याची दोन्ही चाके एकाच उद्दिष्टा-साठी मन लावून कार्य करीत राहतात. त्याचा परिणाम उत्पादनावर फार मोठा होतो व माल कमी किंमतीत पडतो."

औद्योगिक क्षेत्रात रशियातल्या कामगार संघटनेइतकी महत्त्वाची भूमिका क्वचितच इतर देशांतील कामगार संघटना पार पाडत असतील, असे डॉ. राठींना

वाटते. ते म्हणाले, " रशियन कारखान्यांतून एकमेव कामगार संघटना असते व ही संघटनाही कम्युनिस्टांच्या आधिपत्याखाली असते. संघटनेचा नेता चांगला शिकला-सवरलेला असतो. कामगार संघटनेच्या दृष्टिकोनातून त्याने काय केले पाहिजे याविषयीचे प्रशिक्षण त्याला सरकारतर्फे देण्यात येते. अशा तऱ्हेने एक जागरूक नेता निर्माण केला जातो व त्याच्या ताब्यात संघटना दिली जाते. कारखान्यांत उशिरा येणाऱ्या कामगारांची कुचेष्टा केली जाते. वारंवार रजा काढून घरी बसू इच्छिणाऱ्या कामगारांस खिजवले जाते व तरीही त्यांनी दाद दिली नाही, तर त्यांची रवानगी सैबेरियात केली जाते. उत्पादनाचे ठराविक उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यवस्थापक व कार्यकारी मंडळी जशी झटत असते तसाच कामगार नेताही प्रयत्न करीत असतो. उत्पादनाचे लक्ष्य गाठण्यात अयशस्वी ठरलेल्या कुणाचीच गय रशियात केली जात नाही. मग त्यातून संघटनेचा नेताही सुटत नाही. तोसुद्धा सैबेरियाची वाट धरतो. रशियाच्या सर्व पंचवार्षिक योजनांचे उद्दिष्ट साडेतीन-चार वर्षांत पूर्ण झालेले त्याच्यामागे ही भक्कम उभारणी आहे, की ज्यातून कोणीच सुटू शकत नाही— मग दिसते. तो कामगार असो, की व्यवस्थापक की कामगार नेता असो." कमी किंमतीत जास्तीत जास्त उत्पादन वाढविण्याच्या रशियाच्या या तंत्रामुळेच जगातला तो एक बडा देश ठरला आहे. खाजगी क्षेत्राप्रमाणे कारखानदारीत येथ अहमहमिका नसली तरी रशियन सरकारच्या या कडक धोरणाने खाजगी क्षेत्रात न मिळणारे अनेक फायदे तेथे मिळतात. संशोधनाचे कार्य तर होतेच होते. रशियाकडून नियोजन व त्याची काटेकोरपणे पद्धतशीर अंमलबजावणी या बाबतीत आपणांस खूपच शिकता येण्यासारखे आहे, असे राठींना हे सारे पाहिल्यावर वाटते.

**रशियन लोकांचे वैशिष्टच म्हणजे ते देशात झालेला मालच वापरतील. आपण मात्र गप्पा मारतो स्वदेशीच्या आणि कुठलीही वस्तू खरेदी करायची झाली की, ती जर्मनीत तयार झाली आहे का अमेरिकेत याची चौकशी करून मगच ती खरेदी करतो.**

"रशियन महिलाही पुरुषांच्या मानाने मागे नाहीत. त्यांच्याइतक्या कष्टाळू महिला जगात इतरत्र क्वचितच सापडायच्या. त्यामुळे विकासाच्या बाबतीत जेवढे महत्त्व रशियातील पुरुषांना दिले जाते, तेवढेच ते रशियन महिलांनाही मिळते. टॅक्सीपासून दुकान चालविण्यापर्यंतची अनेक कामे त्या करतात. रशियात पुरुषांची संख्या कमी असल्याने हे घडते असे काहीजण म्हणतात. ते कदाचित् खरेही असेल. पण तेथल्या स्त्रिया कुठल्याही बाबतीत मागे पडलेल्या दिसत नाहीत.

सर्वसामान्य रशियन लोकांचे जीवनमान मात्र युरोपातील इतर पुढारलेल्या देशांहूनही फारच कमी आहे. अमेरिकेशी तर तुलनाच नको. १९८० पर्यंत आज जे अमेरिकन लोकांचे जीवनमान आहे तेथपर्यंत आम्ही पोहोचू अशी रशियन नेत्यांची

आकांक्षा आहे.


खर्च व जमा या दोहोंची तोंडमिळवणी करणाऱ्या जीवनमानामुळे रशियात कुठलाही माणूस रिकामा बसून खाऊ शकत नाही. ' जो काम करणार नाही, त्याला जगण्याचा अधिकार नाही, ' हे लेनिनचे वचन खऱ्याखुऱ्या अर्थाने कार्यवाहीत आणलेले दिसते. अशा तऱ्हेने उद्योगप्रिय रशियन जनता व नेत्यांचे त्यांना लाभलेले सुयोग्य मार्गदर्शन यामुळे अल्पवधीत रशिया झपाट्याने प्रगती करू शकला," असे डॉ. राठींनी सांगितले.

रशियन प्रगतीचा विचार करताना आणखी एक गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे. अमेरिकन कारखानदारी ही गेल्या शतकापासून विकास पावलेली आहे. याउलट रशियाची मजल ही केवळ चाळीस वर्षांतली आहे. दोन्ही महायुद्धांचा जोरदार तडाखा रशियन कारखानदारीला बसला होता. उलट या दोन्ही महायुद्धांमुळे अमेरिकन कारखाने अधिकच उत्कर्ष पावले.

**असे असूनही १९१३ साली ज्या रशियाचे औद्योगिक उत्पादन अमेरिकेच्या केवळ १३॥ टक्के होते ते १९५९ मध्ये ६० टक्के झाले. १९५३ ते ५९ या काळात हेच उत्पन्न ९० टक्क्यांनी वाढले. उलटपक्षी, अमेरिकेत हाच आकडा अकराच्या आसपास घुटमळतो.**

## ग्राहकोपयोगी कारखान्यांची अवस्था

डॉ. राठी म्हणाले, " एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घ्यायला हवी, की रशियन कारखानदारी सरकारी मालकीची आहे तर अमेरिकेत ती खाजगी क्षेत्रातली आहे. रशियाची अर्थव्यवस्था संपूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली आहे. दोन्ही देशांतील कारखानदारीचा पायाही काहीशा भिन्न तत्त्वांवर घालण्यात आल्याचे दिसते. प्रचंड प्रमाणावर उभाराव्या लागणाऱ्या मूलभूत मालाच्या कारखानदारीवर अधिक भर रशिया देतो तर अमेरिकेत ग्राहकोपयोगी माल तयार करणाऱ्या कारखानदारीचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. मूलभूत व मोठ्या प्रमाणावरील कारखाने अमेरिकेत फार पूर्वीपासूनच सुरू झालेले असल्याने त्यांना त्यांची फारशी चिंता वाटत नाही आणि म्हणूनच या पायाभूत समजल्या जाणाऱ्या कारखान्यांना जोड म्हणूनच ग्राहकोपयोगी माल तयार करण्याचे कारखाने अमेरिकेत सुरू झाले आहेत. अमेरिकेच्या औद्योगिक उत्पादनाचा ६० टक्के भार या छोट्या कारखानदारीवर आधारलेला आहे. रशियात हेच प्रमाण फक्त तीस टक्के पडते. प्रचंड प्रमाणावरचे हे मूलभूत स्वरूपाचे कारखाने रशियात केंद्र सरकारच्या मालकीचे असतात, तर छोटे कारखाने प्रांत सरकारे चालवितात. त्यामुळे फार मोठी बिकट परिस्थिती निर्माण होते. बरेच नुकसान तर सहन करावे लागते. पण जेथे गिऱ्हाईक तेथे कारखाना उभारावा लागत असल्याने



केंद्रीय उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा व डॉ. राठी

या साऱ्या ठिकाणी केंद्र सरकारला लक्ष देणे कठीण होऊन बसते व या ग्राहकोपयोगी मालाच्या कारखान्यांकडे रशियन केंद्र सरकारचे दुर्लक्ष होते आणि हे दुर्लक्षही मुद्दामच करण्यात येते. बरे, दुसरे असे की, वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळे कारखाने व त्यांच्यावरचे नियंत्रणही वेगवेगळ्या प्रांत सरकारांचे असल्याने त्यात एक-सूत्रता दिसत नाही. आणि खाजगी क्षेत्रांत आढळणारी अहमहमिका किंवा स्पर्धाही तेथे नसते. एका प्रांतात ज्या मालाची किंमत पन्नास रूबल्स असते, तोच माल दुसऱ्या राज्यात पस्तीस रूबल्सना मिळेल. प्रांताबरोबर मालाच्या दर्जातही तफावत पडत जाते. कारखानदारीच्या क्षेत्रात होणारे संशोधन काहीशा वेगळेपणाच्या भाव-नेने चालते. संशोधनासाठी खर्च होणारा पैसा व त्यासाठी दिला जाणारा वेळ फारच कमी असतो असे आढळून येते." डॉ. राठी म्हणाले, "या साऱ्यांचा परिणाम रशिया-तल्या ग्राहकोपयोगी मालाच्या उत्पादनक्षमतेवर होत असतो. आणि म्हणूनच या क्षेत्रातली रशियाची स्थिती काहीशी शोचनीय आहे, असे म्हणणे भाग पडते."

ग्राहकोपयोगी मालाच्या उत्पादनात रशिया जरी काहीसा मागे असला तरी भारी प्रमाणावर व मूलभूत मालाच्या उत्पादनात तो कुठेही मागे नाही. संशोधन क्षेत्रात तर नाहीच नाही. आणि त्यामुळेच अमेरिकेच्या 'स्पेशलाइज्ड इंडस्ट्रीज'चे फायदे रशियातही काही प्रमाणात मिळू शकतात. अमेरिकेत 'स्पेशलाइज्ड इंडस्ट्रीज'ची एवढी प्रचंड वाढ झाली आहे की, कुठलीही एक कंपनी दुसरा माल

तयार करण्याचा विचारसुद्धा करीत नाही. ठराविक कंपनी ठराविक मालावर आपले सारे लक्ष केंद्रित करते. फोर्ड आपला मोटारींचा कारखाना कसा वाढविता येईल याचा विचार करील, त्यांचा दर्जा सुधारण्याकडे, किंमत कमी कशी करता येईल याच्याकडे लक्ष देईल. साबण तयार करणारी कंपनी साबणच तयार करण्याचे कारखाने न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो, सॅन्फ्रॅन्सिस्को आदी ठिकाणी सुरू करील. मोटारींचा कारखानदार रासायनिक क्षेत्रांत उतरणार नाही. मग कापड, कागद, साखर, शर्टस् आदींच्या कारखान्यांचे तर नावच नको. आपल्याच कारखान्यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर कशी वाढविता येईल याकडे अमेरिकन कारखानदार लक्ष देत असतो. या स्पेशलायझेशनमुळे अनेक फायदे होतात. आणि हे फायदे कारखाना सुरू करीत असतानाच मिळत असतात. मालाचा विशिष्ट दर्जा, त्याविषयी होणारे संशोधन यांत प्रगती तर होतेच; पण सुसूत्रता राखली जाते. माल तयार करण्याचे तंत्र पूर्णपणे माहीत असल्याने दुसऱ्या ठिकाणी कारखाना उभारण्याचे ठरले तरी खर्चात फारच बचत होते. पूर्वीच्याच कारखान्यातील अनुभवी कामगारांची जोड या नव्याने सुरू होणाऱ्या कारखान्याला मिळते आणि शिवाय गिऱ्हाइकालाही एक विवक्षित दर्जाचा माल सतत व मुबलक प्रमाणात मिळत राहतो. या 'स्पेशलाइज्ड इंडस्ट्रीज'मुळे नफ्याचे प्रमाण वाढतेच, शिवाय तयार होणारा मालही कमी किंमतीला पडतो.

डॉ. राठींच्या मते भारतात 'स्पेशलायझेशन' मुळातच नाही. टाटा कंपनीसारख्या भारतातील औद्योगिक विकासाचा पाया घातलेल्या कंपनीचेच उदाहरण घ्या. पोलाद, साबण, तेले, विमानवाहतूक, विद्युत् उत्पादन, केमिकल्स, कापड यांसारख्या कितीतरी क्षेत्रांत या कंपनीने कारखाने उघडले आहेत. त्यांत त्यांना अपयश आले असे नाही. पण स्पेशलायझेशनचे फायदे जेवढ्या प्रमाणावर मिळायला हवे होते, तेवढे मिळाले नाहीत. स्पेशलायझेशनच्या बाबतीत भारतातील परिस्थिती काहीशी न्यारीच आहे, असेच म्हणावे लागते.

जी गोष्ट स्पेशलायझेशनची, तीच गोष्ट चढाओढीची. चढाओढ असल्याशिवाय कुठलाच माणूस सामान्यत: जितक्या जोरकसपणे काम करायला हवे तेवढे तो करणार नाही. अमेरिकेची कारखानदारी खाजगी क्षेत्रांतली असल्याने तेथे चढाओढीला खूपच वाव आहे. रशियात ही उणीव केंद्र सरकारच्या उत्तम नियोजनामुळे भरून निघते. चढाओढीमुळे प्रत्येक कारखानदार आपल्याकडे होणारा माल अधिक चांगला व कमी किंमतीत कसा बनविता येईल, याचा विचार करतो. कारण इतरांपेक्षा कमी दराने त्याला बाजारात तो विकायचा असतो. ही बाजारपेठ काबीज करण्याची अहमहमिका खूपच फायद्यात पडते. एकतर संशोधन करण्याकडे भरपूर लक्ष दिले जाते व मालाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर होते. कारण टंचाई पडली, की किंमती वाढणार हे ठरलेलेच ! रशियात ही 'हमरीतुमरी'

दिसत नाही. रशियन सरकारचे धोरणच असे असते की, लोकांच्या गरजेपेक्षा थोडासा कमीच माल बाजारात यावा. जास्त माल म्हणजे जास्त गिऱ्हाईक आणि जास्त खर्च हे गणित ठरलेलेच आहे. लोकांनी काय वाटेल ते करून दरमहा काही तरी शिल्लक टाकलीच पाहिजे, हा रशियन राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन आहे. कारण रशियन बँकांत ठेवलेला हा पैसा विकासाच्या कामासाठी हवा तेव्हा सरकारला मिळू शकतो. अमेरिकेत पैसा खेळत राहतो. मालाचे उत्पादन जास्त होते. लोक जास्त खरेदी करतात, त्यासाठी जास्त खर्च होतो आणि अशा तऱ्हेने सर्व उत्पन्न उडविण्याकडे लोकांचा कल राहतो. आणि नेमके हेच रशियन सरकार टाळू इच्छिते.

रशियातला सामान्य नागरिक हा कम्युनिझमचा भोक्ता आहे. तो राजकारणाबाबत काही बोलणार नाही; बोललाच तर राज्यकर्त्यांची स्तुती करील. कारण तेच त्याच्या कानांवर सतत पडत आलेले असते. "माझ्या पाहणीत तर रशियन नागरिकांना बाहेरच्या जगाविषयी फारच कमी माहिती असल्याचे मला दिसले," असे डॉ. राठी म्हणाले. "एका गोष्टीचे मात्र मला राहून राहून आश्चर्य वाटते," डॉ. राठी सांगत होते, "ते म्हणजे कुठलाही परदेशी माणूस रशियातल्या कुठल्याही खेड्यात जावो, त्याच्या आवडीनिवडी, त्याच्या सवयी, त्यांचा इतिहास या साऱ्यांविषयीची यथासांग माहिती सरकारकडून तेथे पुरविण्यात येते. हे सारे ध्यानात घेऊनच रशियन लोक या पाहुण्याचे आदरातिथ्य करतात."

रशिया व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांचा औद्योगिक दृष्टिकोनातून तुलनात्मक अभ्यास करता एक गोष्ट नजरेत भरते की, मूलभूत व मोठ्या प्रमाणावर उभारण्यात येणाऱ्या कारखानदारीच्या क्षेत्रात रशियाने अल्पकाळात फारच प्रगती केली आहे. लोकशाहीत इतक्या जलद गतीने प्रगती होण्यास फारच कमी वाव असल्याचे अमेरिकेच्या उदाहरणावरून वाटते.

अशा तऱ्हेने अमेरिका व रशिया यांच्या औद्योगिक वाढीचा साकल्याने अभ्यास केल्यावर भारताला स्वयंपूर्ण व्हायचे असेल तर अनेक गोष्टी करणे आवश्यक आहे. या साऱ्या गोष्टींचा पाठपुरावा वास्तविक स्वातंत्र्य मिळाल्याबरोबरच सुरू व्हायला हवा होता; परंतु अजूनही वेळ टळलेली नाही. डॉ. राठी म्हणाले, "जेव्हा एखाद्या राष्ट्राला कुठल्याही क्षेत्रात स्वयंपूर्णता मिळवायची असेल, तेव्हा शेतीउत्पादन, राष्ट्रसंरक्षण व लोकसंख्या या त्रयींकडे लक्ष द्यावेच लागते. भारतासारख्या अविकसित व प्रचंड लोकसंख्येच्या देशाला तर याचा विचार प्रथम करायला हवा. पण दुर्दैवाने पहिल्या काही वर्षांत ही गोष्ट झाली नाही. आता ही चूक राज्यकर्त्यांच्या व नियोजन मंडळाच्या लक्षात येत आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट आहे. कृषिप्रधान देश म्हणून जगात गणना होणाऱ्या भारताला रोजच्या अन्नाला परदेशी खेटे घालावे लागतात ही खेदाची गोष्ट आहे. स्वातंत्र्यानंतर शेतीचे

उत्पादन वाढले नाही असे मला मुळीच म्हणायचे नाही. पण उत्पादनाची वाढ जेवढ्या प्रमाणात झाली त्याच्या दुप्पटतिप्पट प्रमाणांत खाणारी तोंडे वाढली. तुम्ही कितीही पिकविले तरी ते अपुरेच आहे. यासाठी या प्रचंड प्रमाणावर व भौमितिक पद्धतीने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या वाढीवर काहीतरी नियंत्रण सरकारने त्वरित घालणे आवश्यक आहे. संरक्षणाच्या प्रश्नाचे गांभीर्य सरकारने आता ओळखले आहे, हे कबूल केले पाहिजे. पण आपणाला अद्याप फार मोठी मजल मारावी लागणार आहे. आणि म्हणूनच कुठल्याही गोष्टीचा विचार करताना या मूलभूत तीन गोष्टी ध्यानात घ्याव्याच लागतात.

या तीन गोष्टी केल्या म्हणजे भागले अशातला मुद्दा नाही. कुठल्याही प्रगतशील राष्ट्राला आयात संपूर्णपणे बंद करणे कधीच शक्य नसते. पण आज जी आयात व निर्यात यांत खूप मोठी तफावत दिसते, ती भरून काढली गेली पाहिजे. निदान या दोन्ही बाजू समतोल तरी असाव्यात म्हणजे परदेशी चलनाबाबत आज जी वाढती काळजी निर्माण होत आहे तिला काही प्रमाणांत आळा बसेल." दारूसारख्या पेयांची निर्यात करण्यास सरकार का कचरते आहे, याबद्दल डॉ. राठींनी अचंबा व्यक्त केला. या दारूच्या निर्यातीवरच कितीतरी परदेशी चलनाची तूट आम्ही भरून काढू शकू व आमच्या येथल्या बऱ्याच बेकारांना काम देऊ शकू. शिवाय जगात चांगली बाजारपेठ मिळवू शकू ते वेगळेच.

## मध्यम कारखानदारीला प्रोत्साहन हवे

निर्यात जास्तीत जास्त वाढवीत असताना आयातीबाबतच्या सरकारी धोरणात थोडीशी लवचिकता असणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, "आज काय होतंय, माझ्या कारखान्यात तयार झालेला माल मी निर्यात केला आणि जेवढे परदेशी चलन मिळविले तेवढ्या चलनात मी माझ्या कारखान्यास लागणाराच माल फक्त परदेशातून आणू शकतो. इतर राष्ट्रांत ही गोष्ट नाही. पाकिस्तानसारख्या औद्योगिक क्षेत्रात कितीतरी मागे असलेल्या राष्ट्रातही हे बंधन घालण्यात आलेले नाही. बंधन असू नये असे मुळीच म्हणायचे नाही. पण काहीशी 'सूट' असावी. कारण एकतर कितीतरी नुकसान सोसून आम्ही परदेशी माल पाठवितो. हे नुकसान देशात विकल्या जाणाऱ्या मालांतून भरून काढावे लागते. त्यामुळे जो माल आम्ही परदेशांत कमी किमतीला विकतो, तोच आपल्याच देशात जास्त किंमतीला आम्हांला विकावा लागतो. याला काहीसा अटकाव घालणे जरूर आहे. आणि त्यासाठी ही 'सूट' मिळणे जरूर आहे. म्हणजे या 'सूट' मिळालेल्या रकमेतून मी माझ्या कारखान्यास न लागणारा, परंतु इतर कारखान्यांस लागणारा माल परदेशांतून आणू शकेन व तो माल येथे त्या कारखान्यांना विकू शकेन. समजा, पंचवीस टक्के चलन आम्हांला अशा प्रकारे वापरता आले तरी काही प्रमाणांत तरी परदेशी माल निर्यात केल्यामुळे आम्हांला आलेले नुकसान आम्ही भरून काढू शकू.

म्हणजे तेवढीच एक सोय या नव्याने उदयास येणाऱ्या कारखान्यांना मिळेल. परदेशी निर्यात करणाऱ्या कारखान्यांची संख्या तर त्यामुळ वाढेलच; पण अधिक चलन आपण मिळवू शकू. भारतात तयार होणारा माल या 'सूट' मिळालेल्या रकमेतून कारखान्यांनी आयात करू नये, असा निर्बंध हवा तर सरकारने जरूर घालावा. पण जो माल आज देशात तयार होत नाही व ज्याची आवश्यकता आहे, तो आणायला काय हरकत आहे ?"

भारताने जर अशा प्रकारे आयातीच्या धोरणात थोडीशी लवचिकता दाखविली तरी बरेचसे काम होण्यासारखे आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सतरा वर्षांत आपल्या देशाने कारखानदारीच्या क्षेत्रात केलेली प्रगती इतर पुढारलेल्या देशांच्या मानाने कमी असली तरी ती उल्लेखनीय आहे. परंतु कारखानदारांचा हा उत्साह परदेशी चलनाची वाढती टंचाई व सरकारच्या करआकारणीच्या धोरणामुळे कितपत टिकून राहील हा प्रश्न आहे. सध्याचे करआकारणीचे धोरण 'अगदी निरुत्साही' आहे, असे सांगताना डॉ. राठी म्हणाले, "ही एक डोकेदुखीच होऊन बसली आहे. छोट्या कारखान्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यासाठी हे धोरण तर फारच तापदायक ठरेल. ही सारी कटकट चुकविण्यासाठी छोटे कारखानदार आहे त्यातच समाधान मानून घेत असलेले दिसतात. कारखान्यांची वाढ करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षाच नष्ट होत चाललेली दिसते. देशातल्या दहा-पंधरा बड्या उद्योगपतींची गोष्ट सोडली तर जो तो आपला छोटा कारखाना छोटाच ठेवण्याचा प्रयत्न करीत असलेला दिसतो. कारखान्यात होणाऱ्या नफ्याच्या पन्नास-साठ टक्के कर म्हणून द्यावे लागत आहेत. साहजिकच कारखानदाराचा उत्साह हळूहळू मावळायला लागतो आणि मध्यम दर्जाचा आमचा हा 'नवजवान कारखानदार' अकाली म्हातारा झालेला दिसतो.

**वास्तविक मध्यम दर्जाचे कारखाने म्हणजे राष्ट्राचा कणाच. पण आपल्याकडे मात्र ही कारखानदारी कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. एका प्रगतशील राष्ट्रास ही स्थिती निश्चित लाभदायक नाही.**

बड्या उद्योगपतींना सरकारी धोरण लाभदायक असते असे मुळीच नाही. पण आपल्या कारखान्यांचे मोठे साम्राज्य निर्माण करण्याची त्यांची लालसा असल्याने ते त्याकडे लक्ष देत नाहीत. परंतु बड्या उद्योगपतींना तारण्यापेक्षा मध्यमप्रतीच्या उद्योगपतींना तारणे देशाला अधिक लाभदायक आहे आणि म्हणूनच करआकारणीच्या धोरणात जरूर तो फेरबदल केला गेला पाहिजे; तरच कारखानदारांचा उत्साह कायम टिकून राहील व पर्यायाने देश स्वावलंबनाच्या बाबतीत पुढे जाईल."

करआकारणीचे उदार धोरण म्हणजे नेमके काय या बाबतीत डॉ. राठी यांनी अमेरिकेचे दिवंगत अध्यक्ष केनेडी यांनी स्वीकारलेल्या धोरणाचा उल्लेख केला, "गतिमान अर्थव्यवस्थेत करांच्या आकारणीचे प्रमाण कमी करून सर्वांनाच

दिलासा मिळेल या दृष्टीने केनेडींनी करआकारणी केली. त्यामुळे कारखानदारांना प्रोत्साहन मिळालेच, पण करापासून मिळणारे उत्पन्नही वाढले."

"ते कसे काय ?" मी प्रश्न केला.

"असे पाहा–" डॉ. राठी सांगू लागले, "कर कमी केल्याने कारखानदारांचा उत्साह वाढला. त्यांनी आपले कारखाने वाढवायचा प्रयत्न केला. त्यात नव्याने सुरू झालेल्या कारखान्यांची भर पडली. याचा परिणाम असा झाला की, पूर्वीपेक्षा जास्त कराचे उत्पन्न मिळू लागले. पन्नास हजार कारखान्यांपासून समजा, दोन कोटी रुपये उत्पन्न मिळत असेल तर आता एक लाख कारखान्यांकडून तीन-साडेतीन कोटी उत्पन्न मिळायला लागले. त्याचा फायदा सरकारला तर झालाच, पण औद्योगिक दृष्टीने देशाची अधिक वाढ झाली. पहिल्या दोन-तीन वर्षांत या स्वरूपाच्या धोरणाने आर्थिक नुकसान सोसायची तयारी देशाने ठेवली पाहिजे. आणि एकदा ती ठेवली की, पुढच्या काळात त्याची चांगली फळे चाखायला मिळतील. तोपर्यंत थांबण्याची मात्र आपली तयारी हवी."

भारत सरकारला या बाबतीत बरेच करता येण्यासारखे आहे. आज कारखान्यास होणाऱ्या संपूर्ण नफ्यावर कर आकारला जातो. त्याचे प्रमाणही बरेच असते. एका विवक्षित मर्यादेच्या पलीकडे पन्नास टक्के, त्याच्या पलीकडे साठ टक्के असे हे प्रमाण असते. त्यामुळे कारखानदार निरुत्साही होतो. तो जे 'खपून' कमवतो ते सरकार त्याच्याकडून एकदम काढून घेते. हा निरुत्साह घालवायला हवा आणि त्यासाठी कारखान्यास झालेल्या नफ्यातील अमुक इतका भाग, समजा, पन्नास टक्के भाग कारखानदाराने कारखानावाढीसाठी खर्च केला तर त्यावर सरकार कर आकारणार नाही, असे सरकारने जाहीर करायला हवे. त्यामुळे खूपच फायदा होईल. कारखानदार जास्त उत्पादनाच्या मागे लागतील, बेकारांना काम मिळेल, नगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा फायदा होईल व पर्यायाने देशाची भरभराटही होईल.

असे काही अडथळे, सरकारी धोरणातील अडचणी जाणवत असल्या तरी राठींची कारखानदारी विकासाच्या दिशेने वेगाने आगेकूच करीत आहे. कारखान्यास लागणारा कच्चा माल सध्या परदेशाहून आणावा लागत आहे. तो येथेच तयार करण्याच्या उद्देशाने संगम पुलाजवळ पुढच्याच वर्षी एका नव्या कारखान्याचे काम डॉ. राठी सुरू करीत आहेत. "यामुळे आम्ही तयार करीत असलेल्या पिग्मेंट्सच्या बाबतीत आपला देश संपूर्णतः स्वयंपूर्ण होऊ शकेल, असा आम्हांस विश्वास वाटत आहे. आजच पिग्मेंट्सच्या आयातीवर सरकारने बंदी घातली आहे. पण कच्चा माल आम्हांला लागणारच. नवा कारखाना उभा राहिल्यावर कच्चा मालही तेथे तयार होईल व त्याचे पक्क्या मालात रूपांतरही तेथेच होईल." राठी सांगत होते.

● ● ●

माणूस

दिवाळी अंकात
प्रसिद्ध झालेली

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची नवी
ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं

लवकरच पुस्तकरूपाने
प्रकाशित होत आहे

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

# दि व स

## अरुण विनायक मांडे

बसच्या रांगेसारखा दिवस वाढत जात होता. मधूला ऑफिसमध्ये बसण्याचा कंटाळा आला होता. वर लावलेला पंखा हळू आवाजात फिरत होता. त्या संथ वाऱ्यामुळे-सुद्धा भिंतीवरचं कॅलेंडर सारखं आपटत होतं. भिंतीवर लावलेल्या घड्याळाचे काटे रेंगाळल्यासारखे दिसत होते. ऑफिसातलं वातावरणच कसं दमट, कुंद, झोप येण्यासारखं होतं. कोपऱ्यात खुर्चीवर बसलेली टायपिस्ट तरीही न त्रासता काम करत होती. तिचे भुरे, कापलेले केस मानेवर वाऱ्यामुळे उडत होते. नखांना रंग लावलेल्या लांबसडक बोटांच्या बाहुल्या त्या छोट्या तबकड्यांवर एका लयीत नाचत होत्या.

मधूनं लायटरनं सिगारेट पेटवली. खुर्चीतलं अवघडलेलं अंग हलवलं आणि पुन्हा तो अवघडून बसला. धुरांची वलयं काढून त्याकडे बघत बसला. आज काहीच काम नाही. कसा हा कंटाळवाणा दिवस ! आता फक्त दोन वाजले आहेत. साडेपाचपर्यंत थांबायला हवं. लवकर गेलं तर हे क्लार्क्स गप्पा मारत बसतील. काहीजण आपल्या मागोमाग बाहेर पडतील. आताही ते आपल्यासारखेच अवघडून बसले असतील की ? ती गालावर सोनेरी लव असलेली देशमुख आपल्या पांगळ्या नवऱ्यासाठी स्वेटर विणत असेल. रोज बुटांना पॉलिश करून येणारा कामत फाइलीत पेरीमेसॉन घालून बसला असेल. पुढच्या मोडक्या दातांतून तंबाखूची पिंक टाकणारे कुलकर्णी देशपांड्यांच्याकडे मुलाच्या स्थळाविषयी चौकशी करत असतील. ही समोरची स्टेफी मेट्रोवर जॉन भेटेल का याची काळजी करत असेल. प्रत्येकजण कसा भिंगरी-सारखा स्वत:भोवती फिरतोय. आपणच कसं अवघडून बसलो आहे. हा कंटाळवाणा दिवस आपल्याकरताच आहे.

मधूची सिगारेट संपली होती. उरलेला जळता तुकडा अॅशट्रेमध्ये पडला. भिंती-वरच्या कॅलेंडरवर त्याची नजर गेली. टाचणी टोचल्यासारखा तो दचकला. त्या लांबसडक बोटांच्या बाहुल्या आपल्या टेबलावर कशा ? त्यानं वर पाहिलं. टाईप झालेला कागद ती टेबलावर ठेवत होती. त्याची नजर गुलाबी कांतीवरून सरकन् खाली घसरली. समोरच्या कागदावर सही झाली. लिपस्टिक लावलेले तिचे ओठ

अनूचं आकर्षण संपलं होतं.
वर्षभर मोगरा फुललाच नाही—

किंचितसे हसले. पाठमोरी होऊन ती जागेवर बसली. तिचा वरचा ओठ सहासारखा दिसला. सहा नोव्हेंबर तारीख पाहिल्यावर आपण का दचकलो? काहीच कळत नाही. पण आज ती आली का नाही? खोलीतल्या भिंतीसुद्धा रंग गेल्यासारख्या वाटतात. बांगड्यांचा आवाज, काळ्या केसांची रेशमी झाक, डोळ्यांचे बोलके मासे, समुद्राचं गहिरं पाणी, दूर असूनही अंगाला चिकटणारा स्पर्श, शब्दांचा सुगंध बराच वेळ राहणाऱ्या उदबत्तीसारखा. आज काहीच नाही. ती आज यायला हवी होती. जुहूला भरतीच्या लाटांत पाय भिजवत उभे राहिलो असतो. वर आकाश, वारा पिऊन मस्त रंगलेलं लक्ष डोळ्यांनी पाहात बसलं असतं. तिला आज विचारणार होतो. ठरलेलं कधीच सुरळीत होत नाही. नाहीतर आजचा हा कंटाळवाणा दिवस नशिबात आला नसता. डोकं दुखायला लागलं. काय झालंय कळत नाही. त्यानं घंटी वाजवली. हलत्या दाराखालून दिसणारा खाकी पँटमधला पाय लगेच हलला. दार उघडून तो आत आला. "अरे हे बघ, समोरून ॲस्प्रोचं पाकीट घेऊन ये." पैसे देत तो म्हणाला. त्याची राठ केसाळ बोटं पैसे उचलून निघून गेली. दार हलतच राहिलं. गोळी घेऊनही डोकं थांबेल की नाही कुणास ठाऊक. संध्याकाळी क्लबवर जाऊ. नको. काल हरलो. सुरुवातच अशी वाईट झाली. पार्टनर नावडता, अंगाला सिगारेटचा वास येणारा तो वझे. त्यामुळेच आपण हरलो. खेळण्यापेक्षा बोलणंच जास्त त्याचं. किती सांभाळून घ्यायचं! नको ती पानं बाहेर काढायचा. आणि शेवटी व्हायचं तेच झालं. पांडे जिंकला. आपण हरलो. टेबलावरचे पैसे गोळा करताना पांडेचे डोळे मांजरासारखे चमकत होते. कुणाला न बोलावता साठेला ओढत समोरच्या हॉटेलमध्ये तो शिरला होता. आणि मग स्पोर्टमधली चित्रं पाहात कालची संध्याकाळ घालवली होती. आज तसं नको. कालच्यामुळे आजचा दिवससुद्धा कंटाळवाणा झाला. साडेपाच वाजणार तरी केव्हा?

पुन्हा दार वाजलं. ती केसाळ बोटं ग्लासवरची खरी चकती काढू लागली. मधूनं पाण्याबरोबर गोळी घेतली. रिकामा ग्लास उचलताना तो म्हणाला, "देश-

पांड्यांना आत पाठव." धोतर नेसलेले देशपांडे चपला वाजवत आत आले. चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह ठेवून ते उभे राहिले. "कालचे बॉम्बे गॅस कंपनीचे मॅनेजर येणार होते ना?" मधूनं त्यांना विचारलं. यांच्या नाकावर चष्मा फार घसरतो. अजूनही ते कुलकर्ण्यांच्या स्थळातच गुंतले असतील का? "मी तेच सांगणार होतो. ते आले आहेत. बाहेर बसलेत." सरकलेला चष्मा नाकावर बसवत ते म्हणाले. त्यांच्या हातात अर्जंटची फीत लावलेली फाईल देत तो म्हणाला. "पाठवा त्यांना आत." हलतं दार अलगद सोडत ते बाहेर गेले. त्यांच्या वाजत असलेल्या चपला दाराखालून काही वेळ दिसत राहिल्या. बरं झालं आज आले ते. तेवढाच वेळ जाईल. चार वाजले. थोडाच वेळ उरला. मॅनेजर दार उघडत आत आले. मधूला बघताच आपल्या सामोशाच्या आकाराची टायची गाठ त्यांना सैल झाल्यासारखी वाटली. ती पुन्हा घट्ट करत त्यांनी खुर्ची ओढली. त्यांच्या घोटून हिरव्या झालेल्या दाढीकडे तो बघत होता. कातडी बॅगमधून कागद काढत असताना ते जरासे हसले. आणि जेलीसारखं ते चिकट काम हास्याच्या पेल्यात घालून दोघंही ते संपवू लागले.

साडेपाच वाजले. सेकंद काटा रिकामी टॅक्सी दिसल्यासारखा पळत होता. त्यानं खुर्चीच्या पाठीवरचा कोट खांद्यावर टाकला. सिगारेटचा तुकडा गाण्यासारखा ओठात घोळवत त्यानं समोर पाहिलं. स्टेफी टाईपरायटरवर कव्हर घालत होती. तिच्या शेजारची खुर्ची सकाळपासून रिकामीच होती. दार उघडून तो बाहेर आला. आवराआवर करणारे क्लार्क दचकल्यासारखे उभे राहिले. कामतनं नेहमीचं कुठल्याही जाहिरातीत दिसणारं हास्य चेहऱ्यावर फासलं. देशमुख स्वेटर विणायच्या सुया पर्समध्ये टाकत होती. बोटांना शाई लागलेले व टेबलावर घासण्यासाठी ठेवलेले कुलकर्ण्यांचे हात थांबले होते. देशपांड्यांचा चष्मा आता त्यांच्या वरच्या खिशातून बाहेर बघत होता. त्यानं सर्वांवर एकदा नजर फेकली. धुराचा एक ढग बाहेर काढत तो ऑफिसच्या पायऱ्या उतरू लागला.

मोटारच्या मागच्या सीटवर त्याने कोट टाकला. पुढचं दार उघडून तो आत बसला. रस्त्यावर वाहणाऱ्या गाड्यांच्या नदीत त्याचा बिंदू क्षणात मिसळून गेला. ऑफिसमध्ये बसून आंबून गेलेलं त्याचं शरीर आणि मन बाहेरची गार हवा लागताच शहारलं. रस्त्यावर रंगीबेरंगी कपड्यांची गर्दी वाढली होती. दुकानांत गिऱ्हाइकं चढत–उतरत होती. बाहेर शोकेसमध्ये लावलेल्या भारी किंमतीच्या, परंतु लेबल्स उलटी करून ठेवलेल्या कापडांना अनेक अधाशी, उपाशी डोळे चिकटत होते. ऑफिसमधले थकलेले, चुरगळलेले, मळकट, घामट जीव घरच्या ओढीनं पळत होते. रस्त्यावरच्या मोटारी सरपटणाऱ्या पालीसारख्या पुढे सरकत होत्या. साखळी-साखळीनं थांबत होत्या व पुढे जात होत्या.

मधूनं ब्रेक्स दाबले. कॉन्व्हेंटच्या ड्रेसमधली पोरगी मरता मरता वाचली होती.

सुरेखा ! तिचा चेहरा तसाच होता का? सहा नोव्हेंबर. माय गॉड. आज सुरेखाचा वाढदिवस. तरीच ऑफिसमध्ये आपण दचकलो. पण तिची आठवण नको. वर्ष झालं तिला जाऊन. ट्रिपच्या मोटरला घाटात झालेला अपघात. पांढऱ्या ढगासारखा दिसणारा दवाखान्यातला पांढरा वॉर्ड. अनेक औषधांचे तरंगणारे वास. खाटेवर पडलेले अनेक जीव. हसणारे, हट्ट करणारे, नाजूक शरीराचे, नितळ गालांचे, रेशमी केसांना रेशमी रिबिनी लावलेले. स्टेथास्कोप लावलेले, पांढरे ॲप्रन्स, ऑपरेशन थिएटरचं दार उघडून लगबगीनं येऊन परत जाणाऱ्या नर्सेस. डोळ्यांतल्या वितळणाऱ्या काचा. हृदयाला घरं पाडत जाणारा सेकंद काटा. आणि सुरेखा. मोडक्या बाहुलीसारखी. पुढे–नको. नको. पाठीवर फिरणारा सांत्वनाचा हात. मोटारीत खांद्यावर मान टेकून अश्रू गाळणारी अनू. पण आज हे सगळं का आठवतंय ! तेसुद्धा वाढदिवसाच्या दिवशी. त्यानंतर आपण अनूच्या घरी गेलोच नाही. ती नेहमीसारखी ऑफिसमध्ये यायची. स्टेफीसारखी आंधळ्या डोळ्यांनी. स्पर्शरहित शरीराने. अनोळखी शब्दांच्या मूक लहरी घेऊन. आज तिच्याकडे जायलाच हवं. आज ती आली नाही.

मधूनं पायऱ्या चढून कॉलबेल दाबली. तिनं दार उघडलं. " या. " अनूचे ओठ हलले. हिचे ओठ कसे लाल दिसतात. लिपस्टिक न लावता. केसांची वट कशी रांगोळीच्या नाजूक रेघेसारखी. तो कोचावर बसला. पातळाची सळसळ, बांगड्यांचा आवाज, कसलाही सेंट न वापरता येणारा अंगाचा सुगंध तो अनुभवत होता. त्यानं समोरच्या टेबलावरचं मासिक उचललं. काय बोलायचं. वर्षानंतर आलो. सुरेखा. ती असती तर घर भरलं असतं. बागेतली फुलं तिच्या केसांवर चांदण्यासारखी माळली असती. अनूनं केलेलं कौतुक. सुरेखाचं लाडिक छळणं. शाळेतल्या मैत्रिणींची गुपितं अनूच्या कानांत उलगडली गेली असती. आज सुरेखाची आठवण फार येत आहे. जुहूवर जायचं का ? पण कसं विचारायचं ! एक वर्षाचा बांध मध्ये आहे. आज आपण एकटे आहोत. मासिक चाळत. क्लबमध्ये हरलो तेव्हा असेच बसलो होतो स्पोर्ट चाळत. प्रत्येकानं नको असलेल्या पानासारखं टाकून दिलं होतं. सुरेखाच्या वेळेस वसुधा अशीच सोडून गेली. एकटीच. त्या वेळेसच झालेली अनूची ओळख. त्यानंतर–पण आज ती दूर आहे. आजची संध्याकाळ अशीच जाणार का ? हरल्यासारखी ?

ती उठली. खिडकीतून हिरव्या बागेकडे पाहात राहिली. तिच्या पहिल्या भेटीत मोगरा लहान होता. आता मोठा झाला असेल. केळीचं फूल फुटतानाचा आवाज. एकदाच ऐकला आपण. सुरेखा गेली तेव्हा. मोगरासुद्धा लाल फुलांनी भिजल्यासारखा दिसला. गुलाबाची एक फांदी कुणीतरी तोडून दुसरीकडे लावण्यास नेली होती. येताना समोरच्या रस्त्यावर नवीनच भिकारीण दिसली. महारोगानं हात झडलेली. तशीच रोगट मुलं झाली असतील तिला. फांदी तोडायला नको होती. पण ही बोलत का

नाही ? बोलायचं तरी काय ? अशीच अबोली फुलली होती एकदा. सुरेखाच्या वेळेस. तिला ट्रिपला उगाच पाठवलं. काय करायला गेलो अन् काय झालं. दवाखान्यात अनूचं आकर्षण संपलं होतं. वर्षभर मोगरा फुललाच नाही. नुसती पानंच वाढली. मोटारीत खांद्यावर पडलेल्या अश्रूंचं बोलणं आता आठवत नाही. याच प्रकारचं असेल का ?

खोलीत आता संध्याकाळ उतरत असते. आकाशाच्या उदास क्षयी चेहऱ्यावर रक्त साकळत होतं. ती भिकारीण झडलेले हात जमिनीवर आपटत भीक मागत होती. रस्त्यावरची गडबड काचेतून पाहावी तशी संथ दिसत होती. मधू अजूनही स्पोर्टची पानं चाळत होता. या भिंतीसुद्धा आता आकसू लागल्या. स्मशानात नेहमीच कुणी वावरताना भास होतो तसा इथं होतोय. बाहेरची बाग, हे घर, या भिंती. हे सर्वच स्मशान. भिंतीवरचा सुरेखाचा फोटो. तो मात्र अजून ताजा आहे. नुकताच फुलल्यासारखा. आपणच कसे भुतासारखे. उलटे पाय असलेले. अनूचा स्पर्श कधी अनुभवलाच नाही. फक्त एकदाच. मोटारीत. पण तोही अगदी प्रेतासारखा. आजही तसाच असेल का ? तिच्या कपाळावर येणारी चंद्रकोरी बट हळूच मागें सारावी. पण कशी ? तिच्या केसांत स्मशानातला–बागेतला मोगरा आहे. सुरेखा तिला बिलगून आहे. साडी लपेटावी तशी. पण ती फोटोमधून बाहेर केव्हा आली ? माझ्याकडे कशी आली नाही ? मी असा एकटाच राहणार का ? सुरेखा. बोलावलं पाहिजे तिला जवळ. उठायला हवं.

मधू उठला. अनू समोरच्या दारातून बागेत गेली. बाहेर अंधार. काही ठिकाणी फक्त प्रकाशाची ठिगळं. फुलांचे वास अंधारात हलणारे. मधू व अनू फाटकापाशी. अनू– " मला माहीत आहे. तुम्ही कशाकरता आला आहात. मला तुमची बायको म्हणवून घेण्यापेक्षा सुरेखाची आई म्हणवून घेणं फार आवडलं असतं." दोन अश्रूंचे थेंब उरोज भिजताना. मधूचा हात अनूच्या हातात. क्षणभरच. मधू पाहात होता. अनू पाठमोरी. तिच्या हातात सुरेखाचा हात. तीही पाठमोरी. केसांत मोगऱ्याची निर्माल्यं. फुलांचे वास. विरलेले. सनईतून येणारे भैरवीचे सूर. वळवाची सर. रोगट रोपटं लावत जाणारी भिकारीण. दवाखान्यातला पांढरा वॉर्ड. मोडकी बाहुली. अनूचा थंड स्पर्श. खांद्यावर पडलेल्या अश्रूंचं सार्थ बोलणं. एक वर्षाचा फुटलेला बांध. तोडलेली फांदी. क्लबमधील हार. आजचा दिवस हरल्यासारखा मधू पाहात होता. एकटा अंधारात फाटकापाशी––


• • •

# तुमच्या लाडक्या लेकीच्या लग्नाला आम्ही रु. ३०००/- देऊं ..

तुम्ही विम्याची पॉलिसी घेतली की ठरविलेल्या रकमेची निश्चिती होते. एकदम रक्कम उभी करण्याऐवजी विम्यामध्यें लहान लहान हप्ते सोयीस्कर रीतीने भरता येतात. दुर्दैवाने आधीच वडिलांचा मृत्यु झाल्यास ठरलेल्यावेळी ठरलेली रक्कम पुढील हप्ते न भरता मिळते. हे फक्त विम्यानेच होऊ शकते. विमा उतरविणे किती सोपे व थोडक्यांत आहे ते पहा. उदा. तुमचे वय ३० असेल आणि लेकीचे २ असेल तर तिच्या लग्नाचें वेळी म्हणजे तिच्या २० व्या वर्षी ३००० रुपये हवे असतील तर दरमहा १२ रुपये विम्याचा हप्ता पडतो. तुमच्या विमाएजंटाचा आजच सल्ला घ्या.

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं

Pratibha-M/655/A

# ना ट क

## अ. पु. रा स ने

त्या दिवशी आम्हांला आधीच उशीर झाला होता. आम्ही चाललो होतो...झरझर ...झपझप. आणि तशातं रतन गडकरी भेटला. अगदी अचानक. ध्यानी-मनी नसताना एखाद्या धूमकेतूसारखा ! रस्त्यावर. भर चौकात. हॉटेलातून बाहेर पडत त्याने हाक मारली. एका हातात जळती सिगारेट होती. दुसऱ्या हातात वाजणारा ट्रान्झिस्टर होता. तोंडाने धुराचे फवारे उडवीत तो जवळ आला. त्याने मारलेली हाक ओळखीची वाटली. आवाज ऐकलेला वाटला. तो समोर येऊन उभा ठाकला. मग मला त्याची विजयला ओळख करून द्यावी लागली...

—पण तो भेटायला नको होता.

—आपले त्याचे संबंध संपलेले होते. पूर्वीच—फार पूर्वीच.

त्या वेळेस रतनचं आणि माझं सख्य होतं. पण तो काळ भूतकाळात गडप झाला आहे. साध्या भांडणावरून घटस्फोट घेतला होता. त्याला दिवसही बरेच झाले होते. मध्यंतरी माझा आणि विजयचा विवाह झाला. नंतर नोकरी लागली. मधलं वर्ष—दीड वर्ष कसं गेलं ते समजलं नाही. विजयच्या संगतीत. नव्या संसारात. आणि आता रतन पुन्हा कशाला आला ? का आला...?

ओळख झाल्यावर, विजयने त्याला घरी येण्याचं आमंत्रण दिलं. त्याने आभार मानले. आणि चिऽरोऽऽ म्हणून हसत हसत निघून गेला.

विजयने त्याला पत्ता का द्यावा ? तो देण्यापूर्वी निदान मला विचाराचं ? आता तो घरी येईल. तेही वेळी—अवेळी. हा घरात असताना आणि नसतानाही भूतकाळ उकरून काढील. नको त्या गोष्टींचा परवचा वाचीत राहील. आपल्याला मज्जाव करता येणार नाही. हटकता येणार नाही. एके वेळी आम्ही एकमेकांना पत्रं पाठविली होती—प्रेमपत्रं ! एकमेकांना भेटलो होतो—चोरून ! एकमेकांना मनं—हृदयं दिली होती—घेतली होती. आणा—भाका—वचनं—आश्वासनं यांचा नुसता पाऊस पडत होता—

याशिवाय त्याच्याजवळ दुसरा विषयच नसणार. पण त्याचं घरी येणं बरं नव्हे.

**मला वाटतं रतननं नाटक केलं. हे असं वाटत राहणंच मला सोईचं आहे. खरं-खोटं देव जाणे!**

मी त्याला भेटणं हे तर त्याहून वाईट. मी आता पूर्वीची राहिलेली नाही.

संध्याकाळी घरी गेल्यावर विजय विचारील, "कोण ग हा रतन? त्याची तुझी कुठली ओळख? कुठली मैत्री?"

-आणि नको तेच नेमकं घडणार! पण त्या दिवशी काहीच घडलं नाही.

विजयची येण्याची वेळ झाली होती. घरी आल्यावर त्याला खायला लागतं. मी स्टोव्ह पेटवला. त्यावर आधण ठेवलं, तोच बाहेर शीळ वाजली. बाहेर विजय आला होता.

"मधूऽऽ-!" त्याने हाक मारली.

थोड्या वेळाने मी ट्रेमध्ये बशा ठेवल्या, आणि ट्रे घेऊन बाहेर आले. खाता खाता सबंध दिवस ऑफिसमध्ये काय घडलं? कोणाची ऑर्डर आली? कोणाची बदली झाली? कोणाला बढती मिळाली? वगैरे नेहमीचेच प्रश्न आणि उत्तरं झाली.

ट्रेमध्ये बशा भरीत मी विचारलं, "जेवायला काय करायचं?"

"काहीही कर."

"तसं नको. तुम्ही सांगा."

त्याच्याकडूनच मेनू घेऊन मी आत आले. सैपाकाला बसले. विजय बाहेरच बसला होता. कसलं तरी मासिक चाळीत.

रतनविषयी काही तरी विचारील ही भीती आता संपत आली होती. तो विसरला, हे पाहून शिकाऱ्याच्या हातून सुटावं तसं मला हे वाटत होतं.

रात्रीचे नऊ वाजून गेले. मी दोन ताटं वाढली. विजयला हाक मारली. तो आला. त्याच्या हातात मासिक होतं. जेवता जेवता ते तो चाळीत होता. त्याला बोलतं करावं की न करावं, ह्याचा मला संभ्रम पडला. मी त्याच्याकडे पाहिलं. तो एका जाहिरातीकडे पाहात होता. जाहिरातीमधल्या तरुण मुलासारखा मुलगा आपण कुठे तरी पाहिला असल्याचा त्याला भास होऊ लागला. त्याने मला विचारलेसुद्धा. पण दुसऱ्याच क्षणी त्याला आठवलं, "अरे खरंच की!" तो म्हणाला. त्या आवाजाने

मी केवढ्यांदा तरी दचकले. कशाचा तरी हादरा बसावा, असं वाटलं.

" हा आपल्याला भेटला होता !"

" तुम्हांला भेटला असेल–"

" मला एकट्याला नव्हे. तू पण होतीस माझ्या बरोबर."

" मी ?" माझ्या पापण्या फडफडल्या.

" तूच तर त्याची ओळख करून दिलीस–"

माझ्या तोंडातला घास तोंडातच अडकला. आता लपवाछपवी करून चालणार नाही, हे मी ओळखलं.

" एवढ्यात विसरलीस ?"

मी गप्प होते.

विजय बोलतच होता, " हा बॉयफ्रेंड का तुझा ?"

हा घाव नेमका माझ्या वर्मी बसला.

" काहीतरीच बडबडताय ? झालं असलं तर हात धुवा पाहू–"

" काय करतो ग, हा तुझा फ्रेंड ?"

" काहीही करीत असेल. तुम्हांला काय करायच्यात नसत्या भानगडी ?"

" आपलं सहज विचारलं."

" पुन्हा विचारू नका. मला काही ठाऊक नाही. कॉलेजात असताना तो वर्गात होता. बस्. या पलीकडे त्याचा-माझा काहीएक संबंध नाही. त्यानंतर तो मला आज दिसला."

" प्रथमच भेटला ना–मग त्यात एवढं रागवायला काय झालं ?"

यावर मी काहीच बोलले नाही. आणि काय बोलणार ? माझे डोळे लाल झाले होते. मस्तक जड झालं होतं. नाक पुड्यांतून श्वास जोरजोरात आत बाहेर करीत होता.

पुन्हा मला तिथे बसणं आता शक्य नव्हतं. मी उठले आणि तशीच बाहेर आले. टेबलावर डोकं टेकून बसले. पापण्या भिजून सुकत चालल्या होत्या...

" वेडी कुठची !" विजयने माझ्या डोक्यावरून हात फिरवीत म्हटले.

पण तिथूनही मी उठले. आत आले. पडलेला पसारा, उष्टी ताटं, खरकटी भांडी आवरली. मग एकटीच जाऊन पलंगावर पडले. त्या वेळेस अकरा वाजून गेले होते. विजय बाहेरच बसला होता. कसलीशी इंग्रजी कादंबरी वाचीत. त्याला हाक मारावी, असं मला वाटलं नाही. आणि थोड्याच वेळात मी झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी शनिवार होता. शाळा सकाळची होती. उठायला उशीर झाला होता. झटपट आवरून मी कशीबशी रस्त्यावर आले. नेहमीची बस हुकली होती. शाळेची वेळ होऊन गेली होती. मनगटावरच्या घड्याळाकडे पाहात मी टॅक्सीला हाक मारली.

शाळेत आले तेव्हा शाळा भरून पंधरा–वीस मिनिटं झाली होती. वर्गात विद्यार्थी गोंगाट करीत होते. मी लगबगीनं वर्गाकडे निघाले होते तोच शाळेचा शिपाई माझ्यामागे आला आणि हाक मारीत म्हणाला, "बाई, तुमच्याकडे कोणी तरी आलं होतं."

मी एकदम जमिनीला जखडून गेले !

शिपाई माझ्याकडे पाहात होता.

"बाईसाहेब ! " बराच वेळ वाट पाहून त्याने हाक मारली.

"कोण आलं होतं माझ्याकडे ? " मी कसाबसा प्रश्न विचारला.

"नाव नाही सांगितलं त्यांनी."

"मग काय सांगितलं ? "

"परत येतो म्हणाले."

"परत येतो म्हणाले– ? " मी बरळले.

"हो. बाई मधल्या सुटीत भेटतील असं मी सांगितलं."

' कशाला सांगितलंस तसं– ? "

माझा तो रडवा सूर ऐकून बिचारा शिपाई पण कावराबावरा झाला.

वर्गावर जावं की न जावं, माझा निर्णय होत नव्हता. आणि तरीही मी मार्गावर आले. द्विधा मनःस्थितीत मुलींना शिकविणं शक्य नव्हतं. त्यांची हजेरी घेऊन धडा वाचावयास सांगितला.

' रतनच असणार तो ! ' मनाने पहिला टोला दिला.

–पण तो इथं का आला ? कसा आला ? हा पत्ता त्याला कोणी दिला ? एका विवाहित स्त्रीचा पाठलाग ? ...

विजयने रतनला घरचा पत्ता दिला होता. वाटल्यास त्याने घरी यायचं होतं. माझी काय शोभा करायची ती त्याने घरी करावी. तो इथं का आला ? आपला तमाशा करायला–सगळ्यांच्या देखत ?

–आणि विजयला हे समजलं तर ? आणि समजणारच कुठूनतरी.

तास संपला होता. मी हेडमिस्ट्रेसकडे आले. तब्येत बरी नसल्याचे सांगून घरी निघाले.

विजयला समजण्यापूर्वी हे प्रकरण मिटलं पाहिजे. कसंही करून, काहीही करून. आपण त्याला प्रथम टाळले पाहिजे. नाहीतर आपल्याला भरल्या संसारातून उठावं लागणार. रतनला आपले दोन्ही पत्ते ठाऊक झाले आहेत. तो आता सारखे खेटे घालणार. घिरट्या घालणार घारीसारख्या. घरून शाळेत. शाळेतून घरी ...

–मग विजयला सांगून मोकळं व्हायचं का ?

–नको !

–त्याचा गैरसमज होईल. त्यातून भलतंच लफडं निर्माण होईल.

मी घरी आले. मला सपाटून धाम सुटला होता. विजय घरी नव्हता. ऑफिसला गेला होता. प्रथम मी सर्व अंग टिपून काढलं. घरात एकटीच होते. त्यापूर्वी ते मला आजच्यासारखं कधी भकास वाटलं नाही. मला घर खायला उठलं नाही. घरात अवतीभवती, सभोवती मला रतन दिसू लागला. माझं मन शांतपणे बसू देईना, विचार सुचू देईना, निर्णय घेऊ देईना, पाऊल टाकू देईना. अशा अवस्थेत एकाच ठिकाणी बसून राहणं शक्य नव्हतं. मी पुन्हा घराला कुलूप घातलं. आणि कुलकर्णीबाईंच्याकडे गेले. त्यांच्याकडेच जेवले. सगळा दिवस तिथेच घालविला आणि संध्याकाळी घरी आले.

विजय माझी वाट पाहून थकला होता. तो कपडे करून बसला होता. कुठेतरी बाहेर जायच्या तयारीत होता. मला पाहताच तो म्हणाला, " केव्हाची आम्ही वाट पाहात होतो ? "

त्याच्या तोंडचा 'आम्ही' हा शब्द मला विशेष जाणवला.

मी म्हटलं, " आम्ही म्हणजे ? "

" आधी खाली तर बसशील, की ... "

मी त्याच्या शेजारी बसले. माझे कान त्याच्या बोलण्याचा वेध घेत होते.

" रतन आला होता ! " तो म्हणाला " तुझी वाट पाहिली अन् एवढ्यात गेला. थोडक्यात चुकामूक झाली. "

–कोणी तरी मुसकटात भडकवावी, त्याने कानठळ्या बसाव्यात, डोळ्यांपुढे काजवे चमकू लागावेत तसं वाटू लागलं.

–मी स्वत:ला विसरले होते !

" उद्या सकाळी येणार आहे. "

–मी दगड बनले होते !

" तो एम्. ए. झालाय– "

मी तिथे थांबले नाही.

एकाच गोष्टीचा विचार करून करून रात्री माझं डोकं इतकं चढलं, की रात्री मला ताप भरून आला. विजय घाबरला. त्याने डॉक्टरना बोलावून आणलं. मला तपासल्यावर डॉक्टरांनी एक इंजेक्शन दिलं. काही गोळ्याही दिल्या आणि जाताना ते एवढंच म्हणाले, " यांना जपलं पाहिजे. "

विजय माझ्याकडे पाहात होता. मी पलंगावर पडले होते. सगळीकडे कोंदट शांतता विखुरली होती. माझा चेहरा सांगत होता, आपल्या डोक्यात–मनात–उरात काहीतरी शिजतं आहे–फसफसतं आहे.

विजयने माझ्या डोक्यावरून हात फिरविला आणि हलकेच हाक मारली, " मधू ! "

दुसऱ्या दिवशी रविवार होता. विजय उशिराच उठला. माझ्या अंगात उठ-

ण्याची–हालचाल करण्याची–शक्ती नव्हती. त्याने चहा केला, दोघांनी घेतला. आंघोळ केल्यावर तो म्हणाला, " मी डॉक्टरकडे जाऊन येतो. "

" नको. मला सोडून जाऊ नका. मला भीती वाटते. "

" पण औषध नको का आणायला ? "

मी काहीच बोलले नाही.

" वेडी कुठची ! " असं म्हणत त्याने हलकेच माझ्या गालावरून हात फिरवला आणि वाटली घेऊन तो निघून गेला.

विजयला जाऊन दहा–एक मिनिटं झाली असतील किंवा नसतील. काल सांगितल्याप्रमाणे रतन पुन्हा आला होता. प्रथम त्याने विजयच्या नावाने हाक मारली. नंतर दार खडखडवले. आणि नंतर शब्द कानांवर आले, " मधू–मधुरेखा ऽऽ ! "

आता मला उठणं भाग होतं. भिंतीचा आधार घेत मी उठले. एक एक पाऊल टाकीत बाहेर आले.

रतन टेबलापाशी होता. त्याच्या हातात सिगारेट होती !

क्षणभर कोणी काहीच बोललं नाही. जागचं हललं नाही. दोघे एकमेकांकडे पाहात होतो. आम्ही एकमेकांना निरखत होतो, सशा–पारध्यासारखे ! नागा–मुंगसासारखे ! उंदरा–मांजरासारखे !

त्याच्या हातातली सिगारेट संपली होती. तिचा चटका त्याच्या बोटांना बसला. तो चपापला. खिडकीवाटे त्याने ते थोटुक फेकून दिलं. अवघ्या क्षणात तो जवळ आला. अगदी जवळ ...

आमच्या नजरा एकमेकांशी भिडल्या. आमचा नजरेचा सामना सुरू झाला होता. त्याच्याकडे टवकारून पाहता पाहता माझ्या अंगात एकदम बळ संचारलं. सर्व शक्ती एकवटून दोन्ही हातांनी मी त्याच्या मुसकटात भडकविण्यास सुरुवात


दि. ३ फेब्रु. ६६ महाशिवरात्रीनिमित्त खास डब्याने पुण्याहून

**रामेश्वर–कन्याकुमारी यात्रा**

विष्णूकांची, शिवकांची, मद्रास, म्हैसूर, बंगलोर, मदुराई,
पक्षीतीर्थ, कन्याकुमारी, गिरीबालाजी

**राजकमल यात्रा कं.**

६०५ शनवार पेठ, लोखंडे तालमीजवळ, पुणे २.
२६ मार्चला काशी-हरद्वार-पुरी यात्रा

केली. पण तो जागचा हलला नाही. तसूभर चळलादेखील नाही. मीच दमले. धापा टाकू लागले आणि खुर्चीत कोलमडले. तरी माझे समाधान झालेले नव्हते. मला खूप बोलायचं होतं. ओठ सळसळत होते, तोंडात शब्दांचा तोबरा भरला होता. त्याला शिव्याशाप देण्यासाठी. त्याचा पाणउतारा करण्यासाठी. पुन्हा इकडे न फिरकण्याची ताकीद देण्यासाठी आणि हे सर्व विजय परतण्याच्या आत !

एवढं झालं तरी तो गप्प होता. पण आता त्याने बोलण्यास सुरुवात केली, "मधू ! पहिल्या भेटीतच मी ओळखलं. माझं भेटणं तुला आवडणार नाही. तरीही मला राहवलं नाही. एके काळी आपण एकमेकांवर खूप प्रेम केलं आहे. तुमचा संसार पाहून मला आनंद झाला होता. पण तुझ्या कपाळावर आठ्या पाहिल्या. आपला मित्र असो, मैत्रीण असो, त्यांचं लग्न झाल्यावर जसा आनंद व्हावा, तसा आनंद तुम्हांला पाहून झाला होता."

"खोटं ! मला फसवायचा प्रयत्न करू नकोस."

"मधू–"

"मग तू शाळेत का आलास ? माझा पाठलाग करीत ?"

"तेही सांगतो." तो आवंढा गिळून म्हणाला. "विजयची आणि माझी ओळख नव्हती. त्यांच्या स्वभावाची मला कल्पना नव्हती. मी तुला भेटणं त्यांना सहन होतं न होतं, आवडतं न आवडतं, म्हणून म्हटलं तुला शाळेत प्रथम भेटावं."

मी त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर कसलाच भाव नव्हता. तो बोलत होता "अजूनही सांगतो, मधू, माझ्या मनात कसलाही आपपरभाव किंवा वाईट हेतू नाही आहे, मधू ! जिच्यावर आपण प्राणापलीकडे प्रेम केलं, ती माझी अखंड सहचारिणी व्हावी, अशी माझी भावना होती. इच्छा होती. पण ती पुरी झाली नाही. तुमच्या संसारात विष कालवण्याची माझी इच्छा नाही."

त्याचा गळा दाटून आला होता. डोळे डबडबले होते.

"मधू, मी जातो. पुन्हा तुला त्रास द्यायला येणार नाही."

मी त्याच्याकडे पाहण्यापूर्वीच तो झपझप पावले टाकीत दारापर्यंत पोहोचला होता.

तो जिना उतरून निघून गेला. माझे ते शब्द आणि हुंदके पुनः पुन्हा त्या घरात उमटत राहिले. हळूहळू हुंदके थांबले. मला वाटू लागलं की, खरंच रतन इतका सरळ मनाचा आहे, की मी साद दिली नाही म्हणून त्यानं हे नाटक केलं. मी सर्व काही प्रत्यक्ष पाहिलं होतं तरीपण मला वाटत होतं–हे सर्व खोटं आहे. हे असं वाटत राहणंच आता मला सोईचं होतं. खरं-खोटं देव जाणे !

● ● ●



# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध

लेखांक : १६ वा

युद्ध आता जर्मनीला भिडले होते. २० जुलैच्या धक्क्यातून फ्यूरर बाहेर आला न आला, तोच पश्चिम आघाडीवर बेल्जम व फ्रान्स या दोन्ही देशांतून जर्मन सैन्ये परागंदा होण्याची वेळ येऊन ठेपली. पूर्व आघाडीवरही लाल सैन्ये, जर्मन सलग आघाडीची छकले करीत—सैन्य विभागांना कोंडीत पकडून बर्लिनच्या दिशेने चौफेर सुटली होती. १० जूनला सुरू झालेल्या रशियन चढाईचा जोर विलक्षण होता. लाटांमागून लाटा याव्या, त्याप्रमाणे लाल सैन्य पूर्व प्रशियाच्या सरहद्दीवर आले व बाल्टिक विभागात सुमारे ५० डिव्हिजन जर्मन सैन्याची त्यांनी पुरती कोंडी केली. या चढाईची एक दिशा फिन्लंडकडे होती व लाल सैन्य व्हिबोर्गपर्यंत आत घुसले होते. सहा आठवड्यांत चारशे मैलांचे अंतर कापून लाल सैन्य वॉर्साच्या दक्षिणेस व्हिस्तुला नदीवर जुलैच्या अखेरीस मोर्चेबंदी करू लागले.

२० ऑगस्टला दक्षिणेकडे सुरू झालेल्या रशियन चढाईचा रोख बाल्कन राष्ट्रांकडे होता. कीव्हच्या दक्षिणेस व क्रिमियात जर्मन सैन्य कोंडीत होते. हे फास

आवळण्याचे काम चालू ठेवून रशियन सैन्ये ऑगस्टच्या अखेरीस रुमानियात घुसली. रुमानियाच्या तेलखाणी जर्मनांना सोडाव्या लागल्या. २६ ऑगस्टलाच बल्गेरियाने युद्धातून अंग काढून घेतले व बल्गेरिया सोडून, जर्मन सैन्ये हंगेरीच्या दिशेने काढून घ्यावी लागली.

युद्धाच्या या नाजुक अवस्थेत अमेरिकन अध्यक्षांच्या अडमुठेपणामुळे बाल्कनच्या मुक्ततेत ब्रिटिश–अमेरिकन सैन्याला अजिबात भाग घेता आला नाही व याचा परिणाम म्हणून सर्व बाल्कन राष्ट्रे ही आज कायमची रशियन वर्चस्वाखाली गेली आहेत.

चर्चिल यांना या भविष्यात घडणाऱ्या गोष्टींचा अचूक अंदाज होता. इटालीत लढणाऱ्या जनरल अलेक्झांडरने आपली सैन्ये आड्रियाटिक समुद्रातून युगोस्लाव्हियात उतरववावी व तेथून सरळ अडीचशे मैलांवर असलेल्या व्हिएन्नाचा कबजा करावा– असा चर्चिल यांनी या वेळी आग्रह धरला. ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांनी युगोस्लाव्हिया, हंगेरी व रुमनिया यांची मुक्तता करावी म्हणजे रशियाचा या भागांत होणारा हस्तक्षेप टाळता येईल, असा हा दूरदर्शी पवित्रा होता. या गोष्टीला या वेळी रशियाला उघड विरोध करणे अशक्य होते. कारण या देशांतून...जर्मनांना हुसकावे यासाठीच तर अँग्लो–अमेरिकन सैन्ये तेथे जाणार होती ! चर्चिल यांचा हा विचार स्वीकारायचा तर पूर्वी तेहरान परिषदेत ठरल्याप्रमाणे अलेक्झांडरच्या सैन्याने फ्रान्सच्या दक्षिणेस रिव्हेरावर उतरून आयसेन हॉवरला फ्रान्सची मुक्तता करण्यास मदत करणे शक्य होणार नव्हते. परंतु...फ्रान्सची मुक्तता हा आता केवळ अवधीचा प्रश्न होता...लष्करीदृष्टचा जर्मनीचा पराभव अटळ दिसत होता व पुढच्या थंड्या युद्धांचे पवित्रे आतापासून रशिया टाकू लागला होता, ही गोष्ट लक्षात घेता चर्चिल यांनी सुचवलेला बदल अत्यंत मुत्सद्देगिरीचा होता. दुर्दैव असे की, अध्यक्ष रुझवेल्ट यांनी चर्चिल यांची सूचना फेटाळून लावली. इतकेच नव्हे तर जेव्हा चर्चिल पोटतिडिकीने आपल्या योजनेचाच पाठपुरावा करू लागले, तेव्हा रुझवेल्ट यांनी त्यांना रागाने लिहिले–

" I cannot agree to the employement of U. S. troops against Istria & into the Balkans. "

[ इस्ट्रिया व बाल्कन देशांविरुद्ध अमेरिकन सैन्यदलाचा उपयोग करण्यास मी संमती देऊ शकत नाही.– ]

चर्चिल यांना रुझवेल्ट यांच्या या हट्टातील आत्मघात दिसत होता, परंतु लक्ष्मीधरांना दुखवणे त्यांना शक्य नव्हते. अखेर व्हायचे तेच झाले.

जनरल अलेक्झांडरकडून काढून घेतलेली दोस्तांची सेना २५ ऑगस्टला रिव्हेरात म्हणजे फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरली व पॅरिसच्या दिशेने वर सरकू

लागली. या चढाईची आवश्यकता नव्हती. इटालीतील दोस्त सैन्य यामुळे कमकुवत होऊन इटालीतील लढाईही आणखी ८–१० महिने तर रेंगाळलीच व बाल्कन राष्ट्रांना लाल रंग कायमचा फासला गेला.

स्टॅलिनला आता केवळ लष्करी विजय नको होते...तर या बाल्कन राष्ट्रांत, युद्धानंतर कम्युनिस्ट सरकारे अधिकारावर येतील, असा बंदोबस्तही लाल हुकूमशहाला अभिप्रेत होता. अमेरिकन अध्यक्षांच्या अदूरदर्शी धोरणामुळे रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी व युगोस्लव्हिया या देशांच्या मुक्ततेत केवळ लाल सैन्यानेच भाग घेतल्यामुळे, त्या त्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांच्या हाती राज्यकारभार सोपवणे रशियाला सोपेच झाले. या देशांत कम्युनिस्ट पक्ष कधीच लोकप्रिय नव्हते व लोकशाही मार्गाने या देशांत कम्युनिस्टांना सत्ता कधीच हाती घेता आली नव्हती; किंबहुना कुठल्याही देशात लोकशाही मार्गाने कम्युनिस्ट अधिकारावर आल्याचे एकही उदाहरण नाही.

## वॉर्साचे स्वातंत्र्ययुद्ध

पोलंडच्या बाबतीत स्टॅलिनने केवढे क्रौर्य केले पाहा––

दुसरे महायुद्ध पेटले ते पोलंडच्या डँझिग बंदरावरून ! ज्या वेळी हिटलरच्या सैन्याने पोलंडवर हल्ला केला, तेव्हा अर्धा पोलंड लाल हुकूमशहाने घशात घातला होता. पोलंडचे राष्ट्रीय सरकार परागंदा झाले ते ब्रिटनमध्ये अवशेषरूपाने होते. पोलंडचा पंतप्रधान मिकोलाज्यक्सी ( Mikolajczyk ) हा या सरकारचा प्रमुख होता. जर्मनव्याप्त पोलिश प्रदेशातील बंडखोरांशी या सरकारचा सतत संबंध होता व पोलिश सैनिक व प्रजाजन मनोमनी या परागंदा सरकारलाच मानीत होते.

वर सांगितल्याप्रमाणे २० जुलैच्या सुमारास लाल सैन्ये वॉर्साच्या दक्षिणेस व्हिस्तुला नदीवर येऊन थडकली. २० जुलैलाच हिटलरवरील वधाचा प्रयत्न फसला व पाठोपाठ बातमी आली की, रशियन सैन्याने व्हिस्तुला ओलांडली असून, आता लाल सैन्य वॉर्सात शिरण्यास केवळ काही दिवसांचाच अवधी आहे. अंतर सारे ३०-४० मैलांचे होते.

परंतु वॉर्सात शिरण्यापूर्वी वॉर्सात उद्या राज्य कुणाचे होणार, याचा निश्चित अंदाज स्टॅलिनला येत नव्हता ! रशियनव्याप्त पोलंडमधील लुब्लिन येथे "कम्युनिस्ट कमिटी ऑफ नॅशनल लिबरेशन" स्थापन झाली होती. या कमिटीतर्फे पोलिश कम्युनिस्टांनी २९ जुलैला मॉस्को रेडिओवरून वॉर्सातील जनतेला आवाहनही केले–की, "मुक्तता जाहीर करणारे तोफांचे आवाज आता तुम्हांला ऐकूही येऊ लागले असतील. वॉर्साच्या मुक्ततेत सहभागी व्हा."

३१ जुलैला वॉर्सात बातमी येऊन थडकली, की शहराच्या पूर्वेस, जर्मन तटबंदी फुटली असून लाल सैन्य काही तासांत शहरात शिरणार आहे. वॉर्साच्या मुक्ततेसाठी

भूमिगत अवस्थेत प्रयत्न करणाऱ्या, ३०-४० हजार सशस्त्र स्वातंत्र्य-सैनिकांचे नेतृत्व करणाऱ्या जनरल बोर याने ३१ जुलैला सायंकाळी ५ वाजता वॉर्सातील नागरिक व सर्व स्वातंत्र्य-सैनिकांना बंडाचे आवाहन केले. यानंतर शहरात काय घडले त्याचे वर्णन स्वत: जनरल बोर यानेच केले आहे —

" At exactly five o'clock thousands of windows flashed as they were flung open. From all sides a hurl of bullets struck passing Germans & their marching formations. In the twinkling of an eye the remaining citizens disappeared from the streets. In fifteen minutes an entire city of a million inhabitants was engulfed in the fight. Every kind of traffic ceased. The battle for the city was on—"

[ बरोबर ५ वाजता शहरातील घरांच्या हजारो खिडक्या फटाफट उघडल्या गेल्या व त्यांतून चकमकाट सुरू झाला. सर्व बाजूंनी रस्त्यांतून लष्करी संचलने करीत जाणाऱ्या जर्मन सैनिकांवर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच, शहरातील उरलेले नागरिकही रस्त्यांतून अदृश्य झाले. पंधरा मिनिटांत शंभर हजार लोकसंख्येचे ते शहर लढाईत गुरफटून गेले. सर्व व्यवहार—वाहने थंडावली. शहराच्या मुक्ततेचे युद्ध सुरू झाले होते – ]

वॉर्सातील राष्ट्रीय वीरांनी शहर पेटवले खरे, – परंतु वॉर्साची अशी मुक्तता स्टॅलिनला अभिप्रेत नव्हती ! याच वेळी रशियन सैन्याने बाहेरून तोफा डागल्या असत्या, तर काही तासांच्या आत वॉर्सा मुक्त झाले असते खरे, परंतु त्याचक्षणी वॉर्सात स्वातंत्र्यवीरांचे राज्य अवतरले असते. वॉर्सातील प्रजाजनांनी या स्वातंत्र्य-सूर्याचे अर्घ्य दिल्यावर, पोलंडभर राष्ट्रवादाची एकच लाट उसळली असती ! स्टॅलिनला हे नको होते. असे झाले तर लुब्लिनला स्थापन केलेल्या मॉस्को छाप कम्युनिस्ट कमिटीचे काय होणार ? असे झाले तर वॉर्सात लाल राजवट येण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्यामुळे या उठावाची मान परस्पर जर्मनांनीच मुरगळावी, असा अघोरी आणि भयानक उपाय स्टॅलिनने शोधून काढला.

लाल सैन्याची हालचाल तत्क्षणी बंद झाली ! वॉर्साच्या मुक्ततेचे आवाहन करणारा मॉस्को रेडिओ गळा घोटल्यासारखा स्तब्ध झाला. लाल विमाने विमानतळावरच मृत पक्ष्याचे सोंग घेऊन बसली !

## मुक्तियुद्धाची शोकांतिका

३१ जुलैला लाल सैन्याच्या आधारावर राष्ट्रवाद्यांनी उभी केलेली ही क्रांती, ४ ऑगस्टला जर्मन सैन्याने नेस्तनाबूद करण्यास सुरुवात केली. जमिनीखालून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या गटारांतून पोलिश बंडखोर मुख्यत: वावरत होते. जमिनी-

खालची हीच एक वाहतूक बंडखोरांना उपलब्ध होती. जर्मन सैनिकांनी ' मॅन्होल '-मधून हँडग्रेनेड व गॅस बॉम्बस् टाकून या गटारांचे मृत्युसापळे केले. १५-२० हजार नागरिक व राष्ट्रवादी सैनिकी बंडवाले यांची जर्मनांनी कत्तल उडवली.

जर्मनांनी या राष्ट्रवाद्यांची कत्तल उडवावी, हीच गोष्ट लाल हुकूमशाहीला अभिप्रेत होती. कम्युनिस्टांना धास्ती वाटते, ती अंगावर देशभक्तीच्या झुली घालून मिरवणाऱ्या भ्याडांची नाही. जो तो आपला शत्रू ओळखून वागतो. लाल हुकूमशहाला हे माहीत होते की, उद्या वॉर्सात लाल हुकूमशाही सरकारला कुणी कडक विरोध करतील तर ते कडवे राष्ट्रवादीच. त्यांचा परस्पर खातमा नाझींनी करावा हेच लाल हुकूमशहाला हवे होते आणि तसे त्याने ते घडवून आणले. या गोष्टी तर्काच्या नाहीत.

चर्चिल लिहितात की, त्यांनी स्टॅलिनला तार केली –

" पोलिश सशस्त्र प्रतिकारकांनी तातडीने धावा केल्यामुळे, हवा चांगली असल्यास विमानमार्गे त्यांना ५० टन शस्त्रास्त्रे व दारूगोळा पुरवण्याचा आमचा विचार आहे. वॉर्साच्या दक्षिण टोकाकडील कोपऱ्यात हा साठा टाकावयाचा आहे. त्यांनी तुमच्या-कडेही रशियन मदतीसाठी विनंती केली आहे, कारण तुम्ही त्यांना अगदी नजीक आहात. दीड डिव्हिजन जर्मन सैन्य बंडखोरांवर तुटून पडत आहे. अशी मदत करणे ही गोष्ट तुमच्या चढाईलाही मदत करणारीच ठरणार आहे — "

स्टॅलिनशहाचे टाकोटाक उत्तर आले —

" The home army of the Poles consists of a few detachments, which they incorrectly call Divisions. I cannot imagine how such detachments can capture Warsaw...? "

[ पोलंडचे हे गृहदल म्हणजे काही तुरळक सैनिकी दले आहेत व त्यालाच ते चुकीने ' डिव्हिजन ' म्हणतात. मला हे कळत नाही, की अशी ही दले वॉर्साचा कबजा कसा काय करणार ? ]

म्हणजे वैद्याला औषध विचारावे तर त्याने मृत्यूचा दाखलाच हातात दिला !

परंतु स्टॅलिनशहाची ही उडवाउडवी अमेरिकन वकिलाने उघडी पाडली. अमेरिकन वकिलाने मॉस्कोत विनंती केली, की तुम्ही मदत करणार नाही म्हणता, मग निदान आमची विमाने वॉर्सावर येतील, त्यांना तुमच्या विमानतळांवर उतरण्याची मुभा द्या ! यावर मॉस्कोने परराष्ट्रखात्याचे निवेदन वाचून दाखवले —

" American & British planes should not land on Soviet territory, since the Soviet Govt. do not wish to associate themselves either directly or indirectly with this adventure of Warsaw... "

[ अमेरिकन व ब्रिटिश विमानांना सोविएट प्रदेशात उतरू दिले जाणार नाही,

कारण वॉर्सातील या साहसाशी सोविएट सरकारला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने कसलाही संबंध ठेवण्याची इच्छा नाही ]

१० सप्टेंबरला म्हणजे पोलिश राष्ट्रवाद्यांनी उठाव केल्यापासून तब्बल ३६ दिवसांनी, सोविएट तोफा वॉर्सावर गोळाबारी करू लागल्या. सोविएट विमाने वॉर्सावर घिरट्या घालू लागली. चर्चिल यांनी यावर रोकडे भाष्य केलेले आहे –

" They wished to have non-communist Poles destroyed to the full but also to keep alive the idea that they are going to their rescue. Such was their liberation of Poland which they now rule. But this cannot be the end of the story. "

[ त्यांची इच्छा हीच होती, की जे कम्युनिस्ट नाहीत अशा सर्व वॉर्सातील पोलिश जनतेचा व सैनिकांचा निःपात व्हावा. परंतु त्याचबरोबर असा आभासही निर्माण व्हावा, की ते मदतीला धावून येत आहेत ! पोलंडची मुक्तता ही त्यांनी अशी केली ! ! अशा या मुक्त देशावर आज ते राज्य करीत आहेत. परंतु ही कथा इथेच संपणार नाही. – ! ]

८ सप्टेंबरला राष्ट्रवादी प्रतिकारकांनी रेडिओने अखेरचा संदेश प्रसृत केला तो असा होता —

" This is the stark truth. We were treated worse than Hitler's satellites. May God who is just, pass judgement on this terrible injustice & may he punish accordingly all those who are guilty..."

[ नागडे सत्य असे आहे की, हिटलरच्या कच्छपी लागलेल्या लोकांपेक्षा आम्हांला वाईट रीतीने वागवण्यात आले आहे. न्यायी परमेश्वराने, या अन्यायावर आपला न्याय द्यावा व ज्यांनी हे पाप केले आहे त्यांना शिक्षा द्यावी – ]

लाल रशिया हा कुणाचाच एकमेव मित्र नसतो ! ज्या देशांत कम्युनिस्ट राजवट येण्याची शक्यता असते, तिथल्या भ्याड आणि सत्तालोलुपांना तो चुचकारतो, तिथल्या राष्ट्रवाद्यांचा तो निःपात घडवून आणतो व मैत्रीचा हात फक्त तेव्हाच पुढे करतो की, जेव्हा तिथे लाल राजवट येणार हे निश्चित होते !

## पश्चिम आघाडीवरील सामसूम

पूर्वेकडील आघाडीवर वॉर्साच्या मुक्ततेची ही शोकांतिका घडत असताना – पश्चिम आघाडीवर दोस्तांच्या गोटात आणखी एक दुर्दैवी घटना घडली होती – आणि ती म्हणजे मॉंटगोमोरी व आयसेन हॉवर यांच्यांत लढाईतील डावपेचासंबंधी मोठाच मतभेद निर्माण झाला.

काएनजवळ माघार घेणारी जर्मन सैन्ये वर उत्तरेकडे व पूर्वेकडे दोस्तांनी रेटली होती. यांपैकी मॉंटगोमोरीच्या सेनेने अँटवर्पचा कबजा करून ऱ्हाईनच्या अलीकडील तीरापर्यंत कबजा केला होता. बेल्जममध्ये पकडल्या गेलेल्या जर्मन अधिकाऱ्यांच्या

जवान्यांवरून माँटगोमोरीने असा निष्कर्ष काढला होता की, जर्मनीची फळी आता पुरती विस्कळीत झाली आहे. त्यांना पुन: फळी उभी करण्याची उसंत न देता दक्षिण हॉलंडमधून आता ऱ्हाईन ओलांडून जर्मनीच्या रूहर प्रांतातच घुसावे व सरळ बर्लिनच्या दिशेने मुसंडी द्यावी.

याच वेळी अमेरिकन सेनाप्रमुख जनरल ब्रॅडले याने असा विश्वास प्रकट केला, की सिगफ्रिड तटबंदीला दोन-तीन ठिकाणी भगदाडे पाडून सार प्रांतात घुसावे व याच सेनेने वर रूहरचाही कबजा करावा, म्हणजे बरेच जर्मन सैन्य एकतर कोंडीत पकडले जाईल किंवा मागे हटेल.

परंतु माँटगोमोरी काय किंवा ब्रॅडले काय – टँकस्च्या मदतीशिवाय काहीच करू शकत नव्हते. जर्मनीच्या पॅन्झर तुकडीच्या तोडीचे नेतृत्व करणारा एक कणखर टँक कमांडर या वेळी अमेरिकनांना उपलब्ध झालेला होता. हाच तो जनरल पॅटन ! तेव्हा पॅटनच्या टँकदलाने एकतर माँटगोमोरीला साहाय्य करावे किंवा ब्रॅडलेला साहाय्य करावे. परंतु उत्तरेकडे किंवा दक्षिण फ्रान्समध्ये जोराची मुसंडी मारून त्वरेने बर्लिन गाठले पाहिजे. असे झाले तर लढाई पाच-सहा महिन्यांत संपुष्टात येईल असा आग्रह माँटगोमोरीने धरला.

यावर सुप्रीम कमांडर आयसेन हॉवर याचा निर्णयच होईना. आठवडा गेला, पंधरवडा गेला, महिना गेला. सुप्रीम कमांडर विचार करीत होता व अखेर निर्णय काय दिला तर जनरल पॅटनने दोघांना लागेल तशी मदत द्यावी व आगेकूच सर्व आघाड्यांवर सारखी ठेवावी ! जनरल ब्रॅडलेपेक्षा पॅटनचे टँकस् माँटीच्या दिमतीला देणे या वेळी अधिक योग्य होते. कारण माँटगोमोरी आर्नेम या ठिकाणी ऱ्हाईन ओलांडून सिगफ्रिड तटबंदीला वळसा घालून रूहरमध्ये उतरू शकत होता. ("Out flanking Siegfried Line on the North") पण असे करण्यात एक नाजुक अडचण होती ! जर्मनीचा मुख्यत: पराभव ब्रिटिश व कॅनेडियन सैन्याने केला असे मग झाले असते – आयसेन हॉवरला ही भीती होती. तेव्हा ते त्याने केले नाही. बरे, ब्रॅडलेला सर्व मदत द्यावी तर माँटगोमोरीची सैन्ये वरच लटकून राहणार व जर्मनीने मध्येच फळी फोडली तर पुन: डंकर्क ! हा धोका पत्करायचा नाही आणि श्रेय सोडायचे नाही असे हे खास लष्करी नेतृत्व होते आणि याचा परिणाम काय झाला तो पाहा.

माँटगोमोरीने मोठ्या मुसंडीचा भाग म्हणून छत्रीधारी सैनिकांनी ऱ्हाईन नदीवरील आर्नेमचा कबजा करण्याची जी सूचना केली होती, तेवढी फक्त आयसेन हॉवरने स्वीकारली व अमेरिकन व ब्रिटिश छत्रीधारी सैनिकांनी १७ सप्टेंबरला आर्नेमचा कबजा करण्याचा प्रयत्न सुरू केला. दुर्दैव असे की, ही दले नेमकी जिथे उतरली, तिथे जर्मनीच्या पॅन्झर तुकड्याच होत्या व उतरलेल्या सैनिकांची त्यांनी मोठी कत्तल उडवली. ९००० छत्रीधारी सैनिकांपैकी २१६३ मारले गेले व बाकीचे

पुन: मागे आले. आर्नेम जर्मनीच्या कब्जात राहिले. पॅटनच्या टँकस्नी रेटा दिला असता व शिवाय छत्रीधारी सैनिक उतरवले असते तर वर याहून थोडी अधिक किंमत देऊन का होईना आर्नेमचा कबजा मिळू शकला असता व ऱ्हाईन ओलांडून सरळ रूहर प्रांतात ही टँकदले शिरली असती.

आता उलट दोस्तांनीच वास्ती खाल्ली ! सुप्रीम कमांडरची आता अधिकच खात्री झाली की, जर्मनीच्या सरहद्दीच्या आत – सैन्ये शिरताच प्रतिकार असाच भीषण होत जाणार. तेव्हा घाई करून उपयोगी नाही !

माँटगोमोरीला आता जागीच थबकून राहण्याखेरीच गत्यंतर नव्हते. अँटवर्प कबजात होते, परंतु खाडीवरील बंदरे अजून जर्मनांच्या ताब्यात होती. समोर जर्मनीच्या पॅन्झर तुकड्या खड्या होत्या. पुरेसा पेट्रोल साठा नव्हता, अन्न नव्हते आणि टँकदले दिमतीला मिळत नव्हती !

ब्रॅडलेच्या सैन्याने भीषण रणकंदनानंतर २४ ऑक्टोबरला अँचेन शहराचा कबजा केला. दोस्तांच्या ताब्यात अशा रीतीने पहिले जर्मन शहर पडले ते अमेरिकन सेनेने जिंकले ! अँचेन घेतले खरे परंतु तेथील रणचंडीचे स्वरूप पाहून सुप्रीम कमांडरने निर्णय घेतला की, युद्ध १९४५ पूर्वी संपवणे शक्य नाही ! पुरेशी जमवाजमव करून मग पुन: चढाईला आता सुरुवात करायची !

ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यात पश्चिम आघाडी थंडावू लागली. नोव्हेंबर संपला तरीही आघाडी थंडच होती.

ही स्तब्धता दोस्तांना परवडणारी होती, परंतु जर्मनांना परवडणारी नव्हती ! जाता दिवस दोस्तांना बलिष्ठ करणारा होता आणि जर्मनांना खच्ची करणारा होता. शिवाय सतत संरक्षणाची भूमिका घेणे म्हणजे युद्धशास्त्रात पराजयालाच निमंत्रण ठरते ही गोष्ट फ्यूररला समजत होती.

## अखेरचा जुगार

१९४० चे स्वप्न फ्यूरर पुन: पाहू लागला...... ! !

ऑर्देन्सच्या जंगलातून पुन: एकदा मोठी मुसंडी द्यावी. दोस्तांच्या फळीचे दोन भाग होतील. माँटगोमोरी उत्तरेकडे राहील व ब्रॅडलेच्या सेना दक्षिण फ्रान्समध्ये राहतील. सरळ फ्रान्सच्या किनाऱ्यापर्यंत धडक देऊ व ब्रिटिश फौजांना वर रेटून त्यांचा खातमा करू ! हे झाले तरच आता हे युद्ध जिंकण्याची शक्यता आहे. पुन: एकदा चढाईची नशा चढल्याखेरीज जर्मन सैन्याला आता दुसरी संजीवनी नाही. हा अखेरचा जुगार ठरण्याची शक्यता आहे. परंतु त्यावाचून आता दुसरा मार्ग नाही.

अखेरच्या या जुगाराची चक्रे फिरू लागली. १५ ते १८ वर्षांची मुले व ५०–६० वर्षांचे धडधाकट वृद्ध यांचीही आता लष्करभरती सर्वत्र सुरू झाली होती. सप्टेंबर १९४४ व ऑक्टोबर १९४४ या दोन महिन्यांत अशा तऱ्हेचे ५०,००० सैनिक सैन्यात

दाखल झाले. ही सर्व माणसे यापूर्वी शस्त्रे करण्याच्या कारखान्यात काम करीत होती. यामुळे कारखान्यांवर वाईट परिणाम होणार हे उघड होते व तसा तो झालाही.

पश्चिम आघाडीवरील दोस्तांची चढाई का थंडावली याचा अंदाज हिटलरला आला होता. आघाडया किनाऱ्यापासून आत होत्या व गॅसोलिन व लष्करी सामग्रीचा पुरवठा आता पुरेसा होत नव्हता. एक चेरबूर्ग बंदरच काय ते दोस्तांच्या हाती होते. खाडीवरची इतर बंदरे अजून जर्मनांच्याच कबजात होती. चेरबूर्गपासून ३०० ते ४०० मैल आत सरकलेल्या सैन्याच्या नाडया आता नीट काम देत नव्हत्या.

आर्नेमच्या पराभवाने माँटगोमोरी व आयसेन हॉवर यांनी थोडी धास्ती घेतली होती. जनरल पॅटनला सप्टेंबरच्या मध्याला रूडन्स्टेंडने मॉसे नदीवर रोखून धरले होते. काहीशी निराशा डिसेंबर १९४४ मध्ये दोस्तांत पसरली होती.

१२ डिसेंबर १९४४ ला पश्चिम आघाडीवरील सर्व सेनानींना फ्रँकफूर्ट शहराजवळील झिगेनबर्ग येथील फ्यूररच्या छावणीत एकत्र येण्याचा हुकूम सुटला. या बैठकीत जर्मन सेनानींनी ही गोष्ट फ्यूररच्या नजरेस आणली की, १९४० पेक्षा आता परिस्थिती निराळी आहे. आपण आता बरेच दमलेले व कमकुवत आहोत तर अमेरिकन सैन्य ताजेतवाने व मोठ्या शक्तीचे आहे. पॅन्झर तुकडयांचे गुडेरिन व रोमेलसारखे सेनानी त्या वेळी फक्त आपल्यापाशीच होते. याउलट आज जनरल पॅटनसारखा धडाडीचा जनरल विरुद्ध बाजूला आहे.

फील्ल मार्शल रूडन्स्टेंडने पुढे याची कबुली दिली—

" When I received this plan early in Nov. 1944, I was staggered. Hitler had not troubled to consult me. The available forces were too small for such an extremly ambitious plan–"

[ जेव्हा नोव्हेंबर १९४४ च्या सुरुवातीला या चढाईचा आराखडा माझे हाती पडला, तेव्हाच मी चमकलो. हिटलरने या बाबतीत माझा सल्ला घेण्याचे कष्ट घेतले नव्हते. जे सैन्यदल यासाठी उपलब्ध होते ते अशा अत्यंत महत्त्वाकांक्षी बेताला पुरेसे नव्हते. ]

फ्यूरर मात्र आता या गोष्टी विचारात घेण्यास तयार नव्हता. डिसेंबरच्या पहिल्या आठवडयापर्यंत २५०० रणगाडे या चढाईसाठी फ्यूररने उपलब्ध केले होते. २८ डिव्हिजन सैन्यापैकी ९ डिव्हिजन पॅन्झर तुकडया होत्या. जनरल ब्रूमेंट्रिट व फील्ड मार्शल मॉडेल यांच्याकडे या आर्देन्समधील चढाईची सूत्रे देण्यात आली होती.

जानेवारी १९४५ मध्ये रशियन सैन्याची पूर्वेकडे हिवाळी चढाई सुरू होईल... ही गोष्ट स्पष्ट होती. पूर्वेकडील जर्मन सेनानी गुडेरिन याने आपल्या आघाडीवरील पॅन्झर तुकडया या चढाईसाठी हलवू नयेत असा सल्ला फ्यूररला दिला. फ्यूररने त्याचे ऐकले नाही. कारण फ्यूररची अशी अपेक्षा होती की, १९४० च्या इति-

ह्रासाची पुनरावृत्ती होणार ! ही चढाई सुरू झाल्यापासून...महिनाभराच्या आत दुसरे डंकर्क होऊन-दोस्तांची पुरती ससेहोलपट होईल...व या चढाईसाठी एकत्रित केलेल्या तुकड्या पुन: पूर्वेकडे पाठवता येतील.

या चढाईचा आणखी एक धाडसी भाग नमूद केला पाहिजे. ऑपरेशन ग्रीफ (Grief) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या योजनेचे पितृत्व खास फ्यूररचे होते. योजनेची जबाबदारी व नेतृत्व, मुसोलिनीची धाडसी सुटका करणारा कॅप्टन स्कोर्झेनी याचेकडे फ्यूररने सोपवले होते. २००० इंग्रजी भाषा उत्तम येणाऱ्या जर्मन सैनिकांना, अमेरिकन सैनिकांचे पोषाख चढवून अमेरिकेच्या पकडलेल्या जीप्स व टँक्स्मधून अमेरिकन सैन्यात घुसवण्यात येणार होते. या सैनिकांबरोबर स्कोर्झेनी हा स्वत:ही अमेरिकन सैन्यात मिसळणार होता. आर्देन्सची चढाई सुरू होताच अमेरिकन सेनादलात एकदम प्रतिकाराची गडबड व सैन्याची पुनर्रचना सुरू होणारच होती. त्या वेळी या सर्व अमेरिकन वेषधारी सैनिकांचे काम एकच होते की संशय येणार नाही, अशा रीतीने वाहतुकीत व्यत्यय आणणे, भलते निरोप भलत्याला सांगणे, सैन्याची दले चुकीच्या रस्त्याला लावणे व हे करता करता म्यूस नदीच्या दिशेने सटकून म्यूस नदीवरील पुलांचा कबजा करण्याची तयारी ठेवणे... ! यामुळे जेव्हा आर्देन्समधून जर्मन सैन्य म्यूसपर्यंत येईल, तेव्हा झटक्यासरशी म्यूस नदी ओलांडणे जर्मनांना शक्य होणार होते.

## विश्वासाचा संचार

१२ डिसेंबरला सर्व लष्करी अधिकाऱ्यांसमोर फ्यूररने भाषण केले. त्या वेळेस त्याच्या वृत्ती अत्यंत उल्हसित होत्या. या नव्या चढाईच्या यशाची त्याला खात्रीच होती. यामुळे चढाईविषयी योग्य त्या गोष्टी सांगून होताच हिटलर राजकीय प्रश्नाच्या चर्चेकडेही वळला. या ओघात त्याने सांगितले—

"आज आपल्या शत्रूत जी एकी झालेली दिसते, त्यात परस्परविरोधीपणा इतका आहे की, आतापर्यंतच्या इतिहासात असे उदाहरण नाही. यात भांडवलशाहीची पुरस्कर्ती राष्ट्रे आहेत व कडवे मार्क्सवादीही आहेत. ज्यांचे साम्राज्य सरणावर आहे, असे ब्रिटन यातच आहे, व या साम्राज्यासाठी जिभा चाटणारे युनायटेड स्टेटस् हेदेखील यात सामील आहे.

"यांतील प्रत्येक भागीदाराला, आपली राजकीय महत्त्वाकांक्षा सिद्ध होण्यासाठी या भागीची आवश्यकता वाटत आहे. अमेरिकेचा डोळा ब्रिटिशांच्या वसाहतींवर आहे. रशियाचा डोळा बाल्कन राष्ट्रांवर आहे. इंग्लंडला साम्राज्याची फाटकी झोळी सांभाळावयाची आहे. आताच यांच्यांत कुरबुरी सुरू आहेत. या संशय जाळ्यामध्ये बसून कुणालाही यांच्यात वाढत जाणाऱ्या परस्पर द्वेषाचा प्रत्यक्ष अंदाज घेता येईल.

"जर आपण या वेळी अधिक थोडे धक्के मारू शकलो तर कृत्रिम अशी ही

एकजूट कुठल्याही क्षणी सशब्द कोसळून पडेल......पण यासाठी जर्मनीत किंचितही निर्बलता शिरता कामा नये.

" विजय मिळणारच असा शत्रूचा विश्वास नष्ट करून टाकणे आवश्यक आहे. युद्धांचे निर्णय तेव्हाच लागतात की, जेव्हा आपण जिंकू शकत नाही अशी एका कुठल्यातरी बाजूची खात्री पटते. शत्रूला आपण याची सतत क्षणाक्षणाला आठवण देत राहिले पाहिजे, की त्याने काहीही केले तरी आमच्या शरणागतीची अपेक्षा त्याने करू नये. कधीही हे घडणार नाही ! कधीही नाही ! ! "

" Wars are finally decided by one side or the others–recognising that they cannot be won. We must allowd no moment to pass without showing the enemy that whatever he does he can never recon on our capitulation. Never ! Never ! ! "

जमलेले सर्व सेनानी व लष्करी अधिकारी आपआपल्या छावण्यांत परतले तेव्हा त्यांच्या कानांत फ्यूररची ही अखेरची वाक्ये घणघणत होती. ' शरणागती शक्य नाही–कधीही शक्य नाही ! ' आर्देन्समधली ही सुरू होणारी मुसंडी यशस्वी होणार व त्यासाठी सर्व कर्तृत्व पणाला लावण्याचा निर्धार त्यांच्या मनांत निर्माण करण्यात फ्यूररने यश मिळवले होते.

१५ डिसेंबरची रात्र काळोखी होती. दाट धुके सर्वत्र भरून राहिले होते व आर्देन्सच्या जंगलातील टेकड्यांवर बर्फाचे थर साचत चालले होते. सत्तर मैलांच्या आघाडीवर रेटा देण्यासाठी जर्मन सैन्याने मोर्चे रोखले होते. अॅचेनच्या दक्षिणेस या रेट्याचा दणका सुरू होणार होता. हवामान खात्याने अंदाज व्यक्त केला की, निदान चार–पाच दिवस धुक्याच्या भिंती विरळ होणार नाहीत. या हवामानात ब्रिटिश व अमेरिकन विमानांना उड्डाण करणेही शक्य होणार नव्हते. निसर्गाने असा हात दिल्यावर जर्मन सेनानी ही संधी कशी सोडतील ? १५ डिसेंबरला रात्री जर्मन पॅन्झर तुकड्यांनी अनेक ठिकाणी मुसंडी मारली व १६ डिसेंबरला सकाळपर्यंत ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांत जर्मन सैन्याची ७५ मैलांची पाचर सलग होऊ लागली.

' स्पा ' या ठिकाणी अमेरिकन सैन्याची मोठी छावणी होती व तिथून फक्त एक मैलावर ३०० लाख गॅलन गॅसोलिनचा साठा केलेला होता. १७ डिसेंबरला रात्री जर्मन सैन्य ' स्पा ' पासून आठ मैलांवर येऊन पोचले व 'स्पा' येथील छावणी खाली करून अमेरिकन सैन्य मागे सरकू लागले. अमेरिकेचे फक्त ४ डिव्हिजन सैन्य या भागांत होते व जर्मनांच्या या अचानक आलेल्या मोठ्या हल्ल्यामुळे त्यांना माघार घेण्यावाचून गत्यंतर उरले नव्हते.

कॅप्टन स्कोर्झेनीच्या नेतृत्वाखाली अमेरिकन सैनिकांच्या गणवेषात अमेरिकेचे पकडलेले ट्रक्स, रणगाडे व जीप्स यांची तोंडे उलटी करून निघालेले जर्मन सैनिक,

अमेरिकेच्या सैन्यात शिरून आता गोंधळ माजवू लागले होते. शत्रू कोण आणि मित्र यां गोंधळात – गोंधळ वाढतच चालला होता व सुमारे ४० जीप्स् भरून वेषांतर केलेले जर्मन सैनिक ठरल्याप्रमाणे म्यूस नदीपर्यंत जाऊन थडकले होते. पूर्वी ठरल्याप्रमाणे जर्मन सैन्य पुढे येताच म्यूस नदीवरील पूल कबजात घेण्याची तयारी करून स्कोर्झेनी आता बसला होता.


## " वाट बघत बसा "

' डिनांट ' या ठिकाणी पाचवी जर्मन पॅन्झर तुकडी म्यूसच्या दिशेने पुढे पुढे सरकण्याचा यत्न करीत होती. या सैन्याच्या मार्गात एकच शहर होते, की जे अमेरिकन सैन्य लढवीत होते. बॅस्टोने (Bastogne) हे या शहराचे नाव. या ठिकाणाहून अमेरिकन सैन्य हुसकले गेले की, म्यूस नदीच्या दिशेने रस्ता मोकळा होत होता. ' डिनांट 'पर्यंत आलेली पॅन्झर तुकडी गॅसोलिनसाठी वाट पाहात होती. गॅसोलिनचा साठा जर्मनांच्या दृष्टिक्षेपात आला होता. परंतु, बॅस्टोने घेतल्यावाचून हे गॅसोलिन पदरात पडत नव्हते. बॅस्टोने शहरात अमेरिकेची छत्रीधारी सेना आता उतरू लागली. बॅस्टोने शहराला जर्मन सैन्याचा वेढा पडण्यापूर्वी फक्त चोवीस तास अमेरिकन सैन्य विपुल संख्येने दाखल झाले. आर्देन्सच्या लढाईतील ही महत्त्वाची शर्यत अखेर जर्मनीने गमावली.

बॅस्टोने शहराला जर्मन सेनानीने अंतिमोत्तर धाडले की – " शरण या ! " अमेरिकन सेनाधिकाऱ्यांनी एकाक्षरी जबाब दिला – " Nuts " ( वाट बघत बसा ! ) कारण बॅस्टोनेच्या भोवतालचा वेढा उठवण्यासाठी अमेरिकन टॅंकदले येत असल्याची बातमी जनरल पॅटनने कळवली होती. २२ डिसेंबर ते २४ डिसेंबर – या दोन दिवसांत जनरल पॅटनचे टॅंक्स वेढा फोडण्यासाठी शर्थीने झुंजले व आता निसर्गही जर्मनांवर उलटला. हवा एकदम झपाट्याने निवळू लागली होती. जर्मन सैन्याच्या कुमकेवर व रसदीवर दोस्तांचे तुफानी विमानहल्ले अचानक सुरू झाले. ख्रिसमसचा सबंध दिवस जर्मन सैन्याने बॅस्टोने घेण्याची शिकस्त करून पाहिली......काही कळेना...... आणि दुसऱ्याच दिवशी जनरल पॅटनच्या तुकड्यांनी बॅस्टोनेच्या दक्षिणेस जर्मन वेढ्यास खिंडार पाडून गराडलेल्या अमेरिकन सेनेशी संपर्क साधला. वेढा कोसळताच जर्मन सैन्याला आता एकच मार्ग उरला की, कोंडले जाण्यापूर्वी ' पाचर ' अलगद काढून घेणे.

जर्मन सेनानींनी फ्यूररला संदेश पाठवला – " चढाई फसली आहे – माघार घेण्याची अनुज्ञा द्यावी ! " फ्यूररने २८ डिसेंबरला निर्णय दिला – " माघार शक्य नाही. बॅस्टोनेवर तुटून पडा व म्यूसच्या दिशेने पुढे सरका ! " फ्यूररचे उद्‌गार आहेत –

" I do not believe that in the long run the enemy will be able to resist Forty-Five German Divisions–we shall yet master fate."




१५-१२-४४ आर्देन्समधील अखेरचा जुगार

[ पंचेचाळीस जर्मन डिव्हिजन्सपुढे शत्रूचा निभाव लागतो, यावर माझा विश्वास नाही. अजून आपण नशिबावर मात करू शकू – ]

नव्या वर्षाच्या शुभदिनी – फ्यूररने आणखी आठ डिव्हिजन सेना ऱ्हाईनच्या वरच्या बाजूस या लढाईचा एक भाग म्हणून लढाईत लोटली. आर्देन्समध्ये पुढे घुसलेल्या जर्मन सैन्याला जो प्रखर विरोध सुरू झाला होता, तो ढिला पाडण्यासाठी हा उपाय होता. (छांब विभागातील पाक मुसंडी व लाहोर विभागातील आपली हालचालही याच प्रकारची होती!) परंतु, हा उपायही फसला. ३ जानेवारी १९४५ ला बॅस्टोनेवर पुन: पुन्हा निकराचे हल्ले करूनही बॅस्टोने पडेना. घनघोर युद्ध झाले व ५ जानेवारीला जर्मन सेनानी मॉडेल याने जयाची आशा सोडली व ८ जानेवारीला निराश झालेल्या फ्यूररने माघारीला संमती दिली.

आर्देन्समधली मुसंडी मागे घेण्यात येऊ लागली. दोस्तांच्या कुशीतला काटा हळूहळू उपटला जाऊन, १६ डिसेंबरला पुढे सरकलेले जर्मन सैन्य, मोठ्या प्रमाणावर हानी सोसून १६ जानेवारीला पुनःश्च होते त्या ठिकाणी आले. या एकाच लढाईत १,२०,००० जर्मन सैनिक मारले गेले वा जखमी-निकामी झाले, ६०० टँक्स्, १,६०० विमाने व ६,००० लष्करी वाहने जर्मनांनी गमावली.

अमेरिकेची हानीही जबरदस्त केल्याचे समाधान मात्र जर्मनांना मिळाले. ८,००० अमेरिकन सैनिक मारले गेले, ४८,००० जखमी झाले, २१,००० पकडले गेले वा बेपत्ता झाले, ७२३ अमेरिकन टँक्स व असंख्य लष्करी वाहने निकामी झाली.

फरक इतकाच होता की, झालेली सामग्रीची व सैनिकांची हानी काही दिवसांत

भरून काढणे अमेरिकेला शक्य होते, परंतु जर्मनीला हे अशक्य होते.

सर्वच्या सर्व आघाडी एकाच वेळी पुढे सरकवण्याचा सुप्रीम कमांडर आयसेन हॉवर यांचा हव्यास अशा तऱ्हेने दोस्तांना महागात पडला होता. सुदैवाची गोष्ट एवढीच की, आर्देन्सच्या या लढाईत पराभवाची छाया पसरू लागताच आयसेन हॉवरने योग्य ते निर्णय झपाट्याने घेतले. जनरल ब्रॅडलेच्या दिमतीला दिलेले जनरल पॅटनचे टँक्स तातडीने त्याने बॅस्टोनेच्या मुक्ततेसाठी धाडले. त्याच्या एक गोष्ट चटकन् ध्यानात आली की, बॅस्टोनेच्या लढाईत जर्मनीने आपली उरलीसुरली शक्ती पणाला लावली आहे. याच लढाईवर उरलेल्या युद्धाचे भवितव्य ठरणार आहे. या वेळी काढलेल्या आज्ञेत आयसेन हॉवरने म्हटले आहे.

" By rushing out from his fixed defences, the enemy has given us the chance to turn his great gamble into his worst defeat. "

[ निश्चित केलेल्या संरक्षण फळीमधून अचानक बाहेर येऊन शत्रूने मोठा जुगार मांडला आहे. याचा शेवट त्याच्याच भीषण पराभवात करण्याची हीच संधी आहे. ]

आयसेन हॉवर याने ही संधी हेरली व राबवलीही. १६ जानेवारीपासून पुढे केव्हाही जर्मन सैन्याला चढाईची नशा चढू शकली नाही.

पूर्वेची चढाई जनरल गुडेरीन लढत होता. वॉर्साची कहाणी सांगून झालीच आहे. १२ जानेवारीला रशियन सेनानी कोनेव्ह याने सायलोशियाच्या दिशेने चढाई सुरू केली. झुकोव्हने १७ जानेवारीला वॉर्सा घेतले. रशियाची सर्वांत मोठी चढाई जानेवारीच्या मध्याला सुरू होत आहे, असा इषारा जनरल गुडेरिनने फ्यूररला दिला होता व बजावले होते–

" The Eastern front is like a house of cards. If the front is broken through at one point, the rest will collapse –"

[पूर्व आघाडी म्हणजे पत्त्यांचा बंगला झाला आहे. एका बिंदुपाशी जरी ती भंगली, तरी सर्व फळी कोसळून पडेल– ]

मोठ्या या रशियन चढाईला आता सुरुवात झाली होती. १८० डिव्हिजन सैन्य या लढाईत रशियाने लोटले होते. वॉर्सा पडले आणि पूर्व आघाडी कोसळू लागलीच! २७ जानेवारीला झुकोव्हच्या सैन्याने ' ओडर ' नदी लुवेनजवळ ओलांडली, याचा अर्थ फक्त पंधरा दिवसांत २२० मैलांचे अंतर त्याने काटले व आता लाल सैन्य बर्लिनपासून फक्त १०० मैलांवर येऊन थडकले.

पश्चिमेकडे रूहरवर दोस्त विमानांनी अग्निवर्षाव चालवला होता व आता लाल सैन्याने सायलोशियादेखील घेतला. कोळसा व पोलादाची दोन मोठी केंद्रस्थाने शत्रूने ताब्यात घेतल्यावर आता युद्ध ते काय उरले ?

२७ जानेवारीला बर्लिन येथील फ्यूररच्या चॅन्सेलरीत या वेळी फ्यूरर-गोअरिंग व जोडल यांचे जे संभाषण झाले, त्याचा काही भाग जर्मन कागदपत्रांत उपलब्ध

झाला आहे. तो वाचला तर लक्षात यते की, फ्यूररने आता पराभव मान्यच केला होता. हे संभापण असे होते—

**हिटलर** : तुम्हांला असे वाटते का, की रशियन आघाडीवर जे घडत आहे त्याचा इंग्लिशांना आनंद होतो आहे ?

**गोअरिंग** : रशियन सेनेने सर्व जर्मनी कबजात घेईपर्यंत, आपण त्यांना अडवून धरावे, अशी योजना काही त्यांनी केली नव्हती...त्यांची अशी कल्पनाही नव्हती, की रशियन सैन्य जर्मनीत आत आत घुसेपर्यंत आपण त्यांना वेडाच्या भरात रोखून धरू.

**जोडल** : रशियनांविषयी ब्रिटिशांना नेहमीच संशय वाटत आलेला आहे.

**गोअरिंग** : जर असेच काही दिवस गेले तर त्यांच्याकडून (इंग्लिशांकडून) आपल्याला तार आल्याशिवाय राहणार नाही...(तहासाठी) !

—अरेरे ! रशियन सैन्य बर्लिनपासून शंभर मैलांवर येऊन धडकी मारू लागल्यावर तिसऱ्या राईशच्या या कर्तृत्ववान, परंतु क्रूर व घमेंडखोर नेत्यांना आशा काय ती एवढीच उरली की, रशियन अस्वलाच्या भीतीने अँग्लो–अमेरिकन हे जर्मनीशी तावडतोब तह करतील !! एके काळी अँग्लो-अमेरिकेविरुद्ध रशियाशीच अनाक्रमणाचा संधी केलेल्या नाझी नेतृत्वाची अशी परवड सुरू झाली असताना इंग्लंड शस्त्रसंधी करून, हातीतोंडी आलेला संपूर्ण लष्करी विजय ऱ्हातचा दवडील असे फ्यूररला वाटले तरी कसे ?

कारण ३ सप्टेंबरला युद्ध सुरू झाले व विन्स्टन चर्चिल चेंबरलेन मंत्रिमंडळात दाखल झाले. मंत्रिमंडळात दाखल झाल्याबरोबर १–१०–१९३९ ला बी. बी. सी. वरील भाषणात चर्चिल यांनी स्पष्ट सांगितले होते—

" The war began when Hitler wanted it, and it will end when we are convinced that he has had enough of it ! "

[ हिटलरला परवडत होते तेव्हा त्याने युद्ध सुरू केले, परंतु जेव्हा आमची खात्री पटेल की आता हे बस् झाले, तेव्हाच हे युद्ध आम्ही संपवू ! ]

एखाद्या हुकूमशहाने त्याला वाटेल तेव्हा युद्ध सुरू करावे, आमची मुले माणसे मारावी, आमच्या असंख्य सैनिकांनी, आपल्या प्राणांच्या आहुती द्याव्या आणि जरा कुठे डाव उलटू लागला, की त्याने शस्त्रसंधीची हूल उठवताच त्याच्या गळ्यात जाऊन पडावे अशी ब्रिटनची स्वतःची राजनीती नाही व नव्हती. ही नीती ते इतर राष्ट्रांना शिकवतात. कारण घरच्या बाजारात या नीतीला ते किंमत देत नाहीत ! अर्थात् जर्मनीने अशी आशा या वेळी करणे म्हणजे बुडत्याने काडीचा आधार शोधावा त्यातलाच प्रकार होता.

**वाटणीचा तपशील**

याचा अर्थ स्टॅलिनची पावले कशी पडत आहेत याचा या वेळी चर्चिल यांना

अंदाज आला नव्हता असे मात्र नाही. वॉर्साच्या शोकांतिकेने चर्चिल यांचा स्टॅलिन-वरील विश्वास उडाला होता. अध्यक्ष रुझवेल्ट यांच्या अदूरदर्शीपणामुळे बाल्कन-मध्ये लाल सैन्याला जर्मनांचा एकट्यानेच पराभव करण्याची सुसंधी लाभली आहे व त्याचा फायदा उठवल्याखेरीज स्टॅलिन राहणार नाही ही गोष्ट हेरून चर्चिल यांनी १९४५ ऑक्टोबरात नऊ तारखेलाच मॉस्कोवारी केली होती. ९ ऑक्टोबर १९४४ ते १९ ऑक्टोबर १९४४ या दहा दिवसांत चर्चिल यांनी स्टॅलिनशी वाटाघाटी केल्या. या वाटाघाटींत स्टॅलिन याने कुठल्या देशांच्या राज्यकारभारात कुणाचे किती वर्चस्व राहावे यावरही निश्चित वचने दिली. ती अशी होती–

**रुमानिया** – रशियाचे वर्चस्व ९० टक्के

**ग्रीस** – ब्रिटन–अमेरिकेचे वर्चस्व ९० टक्के.

**युगोस्लव्हिया** – रशियाचे व दोस्तांचे ५० : ५० टक्के.

**हंगेरी** – रशियाचे व दोस्तांचे ५० : ५० टक्के.

**बलगेरिया** – रशिया ७५ टक्के व दोस्त २५ टक्के.

पोलंडबाबत मुख्यत: वाटाघाटी झाल्या. जर्मनीच्या कबजातून जिंकलेला (Lvov) लव्हॉव्ह हा भूभाग स्टॅलिनने रशियाला जोडण्याचा आग्रह धरला व हा भूभाग पचविण्यासाठी वॉर्सात कम्युनिस्ट सरकार आणण्याचे कारस्थान त्याने उरकले होते. पोलंडच्या परागंदा सरकारला वॉर्सात राज्य देण्याच्या बाबतीत चर्चिल यांचे सर्व प्रयत्न मात्र फसले. कारण ज्याच्या हाती ससा तोच अखेर पारधी ठरला होता.

या मॉस्कोवारीनंतर तीन महिन्यांत बऱ्याच घटना घडल्या होत्या. रशियन सैन्य आता बर्लिनपासून १०० मैलांवर येऊन थडकले होते, तर माँटगोमेरी व जनरल ब्रॅडले यांनी अजून ऱ्हाईन नदीही ओलांडलेली नव्हती.

वॉर्सामध्ये लुब्लीन कमिटीचे जे लाल सरकार आता अधिकारावर आले होते, त्याला ५ जानेवारीला स्टॅलिनने मान्यता देऊन टाकली. याचा अर्थ जर्मनीशी संगनमत करून जो पोलंड रशियाने व्यापला तो तर त्याने पचवलाच, शिवाय लव्हॉव्हचा लचका या पोलिश लालभाईंनी आता स्टॅलिनला नजर केला.

जर्मनांचा संपूर्ण पराभव ही आता केवळ काही दिवसांची बाब राहिली असल्याने युरोपातील वर्चस्वाचे छुपे युद्ध आता उघडपणे सुरू झाले होते. रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, अल्बानिया, युगोस्लाव्हिया, ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया या सगळ्या देशांत कम्युनिस्ट राजवटी निर्माण करण्याचे स्वप्न स्टॅलिन आता पाहात होता.

मार्च किंवा एप्रिलमध्ये दोस्त सैन्ये ऱ्हाईन ओलांडणार होती. पश्चिम आघाडी-वरील हे चढाईचे दडपण, लाल सैन्य ओडर ओलांडीत असताना दोस्त कायम ठेवतील की नाही, अशा शंकेने स्टॅलिनशाही बेचैन झाली होती. ओडर नदीवरच लाल सैन्याने थांबावे असे हुकूम सुटले होते. जर्मनीची अवस्था आता कोंडलेल्या वाघासारखी

झालेली असल्याने जर्मनी निकराने उरलीसुरली ताकद आपल्याविरुद्ध लावील, तेव्हा दोस्तांनी मागून दगा देऊ नये अशी स्टॅलिनची रास्त अपेक्षा होती. वस्तुतः असा दगाफटका करण्याचा विचारही दोस्तांपाशी नव्हता. परंतु स्टॅलिनला अशी भीती वाटणे साहजिक होते.

## याल्टा परिषद

तात्पर्य, स्टॅलिन, चर्चिल, रुझवेल्ट यांना अशी निकड वाटू लागली की, तिघांनी तावडतोब भेटले पाहिजे. पत्रापत्री झाली व क्रिमियात याल्टा (Yalta) येथे शिखर परिषद भरवावी असे निश्चित झाले. याल्टा बेटावर २ फेब्रुवारी १९४५ ला पंतप्रधान चर्चिल व अध्यक्ष रुझवेल्ट यांच्या वाटाघाटी झाल्या व स्टॅलिनशी बोलणी करण्याकरता हे दोघे ३ फेब्रुवारी १९४५ ला याल्टा येथे दाखल झाले.

चर्चिल, अँथनी ईडन व ब्रिटिश चीफ ऑफ स्टाफ, अध्यक्ष रुझवेल्ट, हॅरिमन व अमेरिकन चीफ ऑफ स्टाफ, मार्शल स्टॅलिन, मोलोटोव्ह व रशियन सेनानी, असे सर्व परिषदेसाठी याल्टा येथे जमले होते.

या परिषदेनंतर प्रे. रुझवेल्ट व स्टॅलिन यांची भेट होण्याचा प्रसंगच आला नाही. कारण, दोन महिन्यांत अध्यक्ष रुझवेल्ट यांचा अंत झाला. परंतु याच परिषदेत आता सिक्युरिटी कौन्सिलमध्ये ज्याचा पुनः पुन्हा उल्लेख होतो–त्या 'व्हेटो'ची कल्पना रुझवेल्ट यांनी मांडली व स्टॅलिनला ही 'व्हेटो' पद्धत मान्य करावयास लावण्यात पंतप्रधान चर्चिल यांना यश आले.

स्टॅलिनचे म्हणणे असे होते–"पुढची ५० वर्षे तरी आपल्याला शांतता हवी आहे. यासाठी रशिया, अमेरिका व ब्रिटन या तीन मोठ्या शक्ती व उद्या या रांगेत येऊ पाहणाऱ्या फ्रान्स व चीन या सर्व शक्तींची एकजूट टिकली पाहिजे. आज आपण हयात आहोत, परंतु उद्या नवी पिढी येईल व आपण जे भोगले आहे, त्याची पूर्ण कल्पना नसल्याने, या पाच शक्तींतच पुनः संघर्ष उडण्याची शक्यता निर्माण होईल."

यासाठी सिक्युरिटी कौन्सिलचे निर्णय मतदानाने घ्यावे, असा रशियाचा आग्रह होता. यावर अमेरिकन अध्यक्षांनी अशी सूचना मांडली की, जर एखाद्या प्रश्नावर रशिया, ब्रिटन व अमेरिका यांचे एकमत होऊ शकले नाही तर त्या राष्ट्राला 'व्हेटो'चा अधिकार वापरून तो प्रश्न तसाच अनिर्णित व लोंबकळत ठेवता येईल. 'व्हेटो'चा हा अधिकार असा जन्म पावला... ! झाले हे बरे झाले की वाईट, ते भविष्यकाल ठरवीलच. युनायटेड नेशन्सही या व्हेटोमुळे या तिघां राष्ट्रांची कायमची बटिक झाली ही गोष्ट मात्र निश्चित.

ज्या पोलंडच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीच ब्रिटनने हा युद्धाचा डोंब पेटवला, त्या पोलंडचेच रशिया भक्ष्य करीत आहे ही गोष्ट चर्चिल यांना फार डाचत होती. त्यांनी म्हणूनच सूचना मांडली–

"Could we not create a Govt. for Poland pending full and

free elections which would be recognised by all ?"

[ आपण पोलंडसाठी असे सरकार निर्माण करू शकत नाही का, की जे संपूर्ण व खुल्या निवडणुका होईपर्यंत आपणा सर्वांनाच मान्य होईल ? ]

यावर स्टॅलिनने कोलदांडा घातला व सांगितले की वॉर्सात असलेले सरकार हेच ते सरकार आहे ! पोलंडचा जो भाग रशियाला जोडला गेला तो रशियाकडेच का राहावा हे सांगताना स्टॅलिनने सांगितले–

" Poland was a question of honour for Britain, but it was a question of both honour and security for Russia. "

[ पोलंड हा ब्रिटनचा केवळ मानापमानाचा प्रश्न असेल. परंतु रशियाचा तो मानापमानाचा व शिवाय संरक्षणविषयक प्रश्न आहे– ]


तिबेट चीनच्या घशात जाऊन आता ज्याप्रमाणे फक्त परागंदा दलाई लामा आपल्यापाशी उरला आहे, त्याचप्रमाणे त्या वेळी पोलंडचा लचका रशियाच्या घशात जाऊन, फक्त पोलंडचे परागंदा सरकार ब्रिटनपाशी उरले होते. मॅकमोहन रेषेचे जे बुजागावणे आपल्यापुढे कृष्ण मेनननी उभे केले तसेच बुजगावणे १९१८ साली अमेरिकेने मान्य केलेल्या, परंतु कागदावर प्रत्यक्ष नसलेल्या अशा 'कर्झन' रेषेचा आधार घेऊन स्टॅलिनने उभे केले. पोलंडच्या प्रश्नावर याल्टा परिषदेत अखेर दोस्तांना तोंड दाबून मार सहन करावा लागला. परिस्थितीच तशी होती. अजून जर्मनीचे दोनशे डिव्हिजन सैन्य लढत होते...जर्मनीचा पराभव केल्याखेरीज तर रशियाशी भांडण करणे शक्यच नव्हते !

९ फेब्रुवारीला ही याल्टा परिषद संपली. या परिषदेचे पोलंडविषयक निर्णय चर्चिल यांनी जेव्हा कॉमन्स सभागृहापुढे ठेवले, तेव्हा युद्धकालात प्रथमच ३० सरकार–पक्षीय सभासदांनी या निर्णयाला पाठिंबा दिला नाही व त्यांनी सरकारविरुद्ध मते दिली. चर्चिल यांचे स्वतःचे खाजगी मतही या तीस सभासदांप्रमाणेच होते !

## ऱ्हाईन ओलांडली

याल्टा परिषदेचा मुख्य फायदा एवढाच झाला की, जर्मनीचा संपूर्ण लष्करी पराभव व शरणागती मिळेपर्यंत जर्मनांशी दोस्त किंवा रशिया स्वतंत्र शस्त्रसंधी करणार नाहीत, याची परस्परांनी खातरजमा करून घेतली व जर्मनीला आठवडाभरातच अखेरच्या उचक्या देणाऱ्या चढाया दोन्ही आघाड्यांवर सुरू झाल्या.

आर्देन्सच्या लढाईत साहस अंगाशी आलेले असूनही जर्मनांनी ऱ्हाईनच्या पश्चिमेसच लढाई देण्याचे ठरवले. मॉंटगोमेरी हा सिगफ्रिड रेषेच्या उत्तरेस व जनरल ब्रॅडले हा सिगफ्रिड रेषा ॲचेनजवळ ओलांडून जर्मनांशी लढा देत होते. सबंध फेब्रुवारी महिना व जवळजवळ मार्च महिना चकमकी झडत होत्या. जर्मनांचा प्रतिकार आता अधिक कणखर होत होता. ऱ्हाईन-म्यूस नद्यांना पूर आलेले होते व नद्यांचे दोन्ही काठावर चिखलाचा रबडा माजला होता. ॲचेन येथे पडलेल्या




मार्च १९४५ र्‍हाईन ओलांडली

मगदाडासमोरच रोएर नदी आहे. त्या नदीवरील धरणे अडवून जर्मनांनी सर्व प्रदेश जलमय करून टाकला व १० डिव्हिजन्स जर्मन सैन्याने १० मार्चलाच रोएर नदी ओलांडली.

जनरल ब्रॅडलेचे सैन्य व जनरल पॅटनच्या टँक्स यांनीही पाठलाग सुरू केला...... व माघार घेण्यात जर्मन सैन्याने या वेळी जी एक लहानशी चूक केली, त्यामुळे र्‍हाईन नदीही अनपेक्षितरीत्या अमेरिकन सेनेने ओलांडली.

वस्तुत: जर्मन सेनानी रूडन्स्टेंड याने सर्व जर्मन सैन्य र्‍हाईनपलीकडे नेऊन तेथे संरक्षण फळी उभारावी, असा आग्रह धरला. हिटलरने ते ऐकले नाही व रोएर

नदी व ऱ्हाईन नदी यांच्या पट्टयातील प्रदेशांतही प्रतिकार करा, अशी आज्ञा सोडली. या भूपट्टयातील लढाईत आयसेन हॉवरच्या ८५ डिव्हिजन सैन्यापुढे जर्मन सैन्याचा निभाव लागला नाही व या लढाईतही ३,५०,००० जर्मन सैन्य मारले गेले वा जखमी झाले. पकडलेल्या सैनिकांची संख्या २,९३,००० होती. या पराभवानंतर ऱ्हाईन ओलांडून जर्मन सैन्य पलीकडे नेण्याच्या गडबडीत ऱ्हाईन नदीवरील रेमजेन् (Remagen) येथील पूल सुस्थितीत अचानकपणे अमेरिकन सैन्याच्या हाती पडला व तेथे पोहोचल्यानंतर ऱ्हाईन पार करा, असा आदेश मिळण्याची वाट न पाहाता अमेरिकन सेनेने ऱ्हाईन नदी ओलांडली! फ्रँकफूर्टच्या दिशेने या पुलावरून अमेरिकन सैन्य जर्मनीत ओतले जाऊ लागले व ऱ्हाईनवर प्रदीर्घ काळ युद्ध खेळून दोस्त सैन्याला थोपवण्याचा रूडन्स्टेंडचा इरादाही ढासळून पडला.

अमेरिकन सेनेने ऱ्हाईन ओलांडली खरी, परंतु माँटगोमोरीला ऱ्हाईन ओलांडण्यास अद्याप अवधी होता. २० मार्चपर्यंत निमजेन् ते कोलोन, हा ऱ्हाईनचा सर्व पश्चिम किनारा दोस्तांच्या हाती पडला होता.

ब्रिटिश व कॅनेडियन सैन्य ऱ्हाईन नदी ओलांडताना प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा चर्चिल यांच्या मनात निर्माण झाली. वस्तुत:, दोस्त सैन्य फ्रान्समध्ये नॉर्मंडीत कसे उतरले ते प्रत्यक्ष पाहावयास जाण्याचीच तयारी चर्चिल यांनी केली होती. त्या वेळी तो बेत इंग्लंडच्या राजांनी मोठ्या कौशल्याने हाणून पाडला. या वेळी मात्र चर्चिल कुणाचेच ऐकेनात. जर्मन सैन्य ऱ्हाईन पलीकडे आहे. मध्ये नदीचे मोठे पात्र असल्याने धोका होता, परंतु कमी होता .....व आपल्या इच्छेप्रमाणे ऱ्हाईन नदीवरील लढाई प्रत्यक्ष पाहण्याकरता चर्चिल माँटगोमोरीच्या छावणीवर २३ मार्चला दाखल झाले.

या लढाईत महत्त्वाचा भाग १४,००० छत्रीधारी सैनिकांचा होता. सैन्य नदी ओलांडण्यासाठी निघताच, नदीपलीकडे शत्रुसैन्यामागे उतरून लढाई सुरू करण्याची कामगिरी या सैनिकांची होती.

## याचसाठी केला होता अट्टाहास

२४ मार्चला पहाटे ऱ्हाईनची लढाई सुरू झाली. २,००० यार्ड अंतरावरच चर्चिल यांनी दोस्तांची ही जमिनीवरील चढाई डोळाभरून पाहिली.

२,००० विमाने सारखी ये-जा करीत होती. छत्रीधारी सैनिक उतरत होते; सर्व चढाई अपेक्षेबाहेर यशस्वी झाली व दोन दिवसांत नदीपलीकडे ब्रिटिश सैन्याला जागा मोकळी झाली. ऱ्हाईन पलीकडे गेलेल्या सैन्याची प्रत्यक्ष पाहाणी करून २६ मार्चला चर्चिल लंडनला परतले.

एवढा धोका पत्करून चर्चिल या लढाईत का सामील झाले, याचे कारण सांगतात. त्यांच्याबरोबरचे ब्रिटिश चीफ ऑफ स्टाफ अॅलनब्रुक आपल्या दैनंदिनीत लिहितात —

" I honestly believe that he would have liked to be killed on the front at this moment of success. He had often told me that the way to die is to pass out fighting, when your blood is up and you feel nothing. "

[ माझी अशी प्रामाणिक-श्रद्धा आहे की, आघाडीवरील या विजयाच्या क्षणी मरण येते ते चर्चिल यांना आवडले असते. त्यांनी मला अनेक वेळा सांगितले होते की, लढत असताना मरण यावे. कारण, त्या वेळी रक्त सळसळत असते व मृत्यू येतो आहे हेदेखील माणसाला कळत नाही – ]

दोस्त सैन्याने ऱ्हाईन ओलांडण्यापूर्वीच म्हणजे १० मार्चला फ्यूररने फील्ड मार्शल रूडन्स्टेंडच्या जागी इटालीत शर्थीने लढत राहिलेल्या फील्ड मार्शल केसर-लिंग याला पश्चिम आघाडीचे नेतृत्व दिले होते.

एकदा ऱ्हाईन ओलांडताच दोस्त सैन्य अशा परिस्थितीत होते की, ते म्हणेल त्या दिशेला वळू शकत होते. २९ मार्चला अमेरिकन सेनेने फ्रँकफूर्टचा कबजा केला होता.

**बर्लिनचे महत्त्व**

वावड्या अशा उठत होत्या की, हिटलर बर्लिन सोडून दक्षिणेकडे येणार आहे व याच दृष्टीने त्याने इटालीतील जर्मन सैन्य अद्याप मागे घेतलेले नाही. ऑस्ट्रियाच्या डोंगराळ भागांत लढाई चालू ठेवण्याचा त्याचा इरादा आहे.

परंतु यावर चर्चिल यांचा विश्वास नव्हता ! पूर्वेच्या दिशेने, रशियन सैन्य बर्लिनच्या दिशेनेच रेटा देणार ही गोष्ट चर्चिल यांनी हेरली होती. त्यांनी आयसेन हॉवर यांना विचारणा केली की – " पुढील लढाईची दिशा कोणती ? "

आयसेन हॉवरने उत्तर पाठवले– " लिप्झिग्च्या दिशेने पुढे जाऊन लाल सैन्याशी हातमिळवणी करण्याचा माझा इरादा आहे. "

वस्तुत: सैन्यविषयक हालचालींबाबत दोस्त सेनानीने थेट स्टॅलिनला विश्वासात घेणे गैर होते. परंतु विजयाच्या नशेत आयसेन हॉवर याने २८ मार्चला आपला हा बेत स्टॅलिनला तारेने कळवला !

विजयाची नशा स्टॅलिनला चढलेली नव्हती. क्रेमलिनमध्ये बसून त्याने पुढचे फासे टाकण्यास कधीच सुरवात केलेली होती. हा मासा आयता गळाला लागताच स्टॅलिनने उलट तार केली –

" This dovetails perfectly with the ideas of the Soviet High Command. Berlin has lost its former stratigic importance. "

[ सोविएट हाय कमांडरची जी योजना आहे, त्याच्याशी आपला बेत तंतो-तंत जुळणारा आहे. बर्लिनला आता तसे फारसे महत्त्व राहिले नाही. ]

आयसेन हॉवर गाढवपणा करीत आहे, हे लक्षात येताच चर्चिल यांनी १ एप्रिल १९४५ ला अध्यक्ष रुझवेल्ट यांना तार पाठवली.

"I say quite frankly that Berlin remains of high strategic importance. Nothing will present a psychological effect of despair upon the German forces equal to that of fall of Berlin."

[ माझे असे स्पष्ट मत आहे, की बर्लिनचे महत्त्व मुळीच कमी झालेले नाही. 'बर्लिन पडले' या घटनेने जर्मन सैन्यावर जो विशादयुक्त परिणाम घडवून आणता येईल, तो अन्य कशानेही साधणार नाही. ]

शत्रूच्या लष्करी यंत्रणेवर मरणांतिक प्रहार करावयाचा असेल, तर त्याचे सर्वांत महत्त्वाचे शहर कबजा करूनच त्याचे नाक कापले पाहिजे. एवढेच सांगून चर्चिल थांबले नाहीत तर त्यांनी पुढे इशारा दिला—

" राजकीय दृष्टचाही जर्मनीत शक्य तेवढे पूर्वेला घुसणे आवश्यक आहे व जर बर्लिन कबजात घेता येत असेल, तर ते प्रथम कबजात घेतले पाहिजे ! लष्करी दृष्टचाही असे करणे आवश्यक आहे. "

चर्चिल यांचा हा संदेश अध्यक्ष रुझवेल्ट यांना मिळाला तेव्हा त्यांनी बरीचशी कामे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना वाटली होती. तेरा दिवसांवर त्यांचा मृत्यू येऊन ठेपलेला होता.

१२ एप्रिल १९४५ ला वयाच्या केवळ ६३ व्या वर्षी अध्यक्ष रुझवेल्ट जॉर्जिया येथे निधन पावले. ते आजारी होतेच, परंतु सुधारत होते. तोच मृत्युने त्यांच्यावर अचानक झडप घातली.

उपाध्यक्ष ट्रुमन यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. अध्यक्ष ट्रुमन यांना स्टॅलिनच्या पावलांचा अचूक अंदाज होता व चर्चिल हे रुझवेल्ट यांच्या अंत्य-संस्कारासाठी अमेरिकेत गेले असते तर प्रत्यक्ष बोलणी होऊन, चर्चिल यांना अनेक गोष्टी आता साधल्या असत्या. परंतु कामाच्या ताणापुढे व जर्मनीत क्षणाक्षणाला काय घडत आहे, याची उत्सुकता असल्यामुळे चर्चिल अंत्यसंस्काराला गेले नाहीत.

—आपण अध्यक्ष रुझवेस्ट यांच्या अंत्यसंस्काराला न जाण्यात या दृष्टीने मोठी चूक केली, असे चर्चिल यांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे.

१ एप्रिल ते १३ एप्रिल १९४५ या काळात ब्रेमेन, हॅम्बुर्ग, ल्युबेक ही शहरे व सर्व रूहर प्रांत दोस्त सैन्याने व्यापला होता. फील्ड मार्शल मॉडेल हा रूहर प्रांतात कोंडला जाऊन १८ एप्रिलला ३० सेनानी व सुमारे ३,२५,००० जर्मन सैन्याने शरणागती पत्करली. शरण आलेल्या सेनाधिकाऱ्यांत मात्र फील्ड मार्शल मॉडेल नव्हता. त्याने गोळी झाडून आत्महत्या करणे पत्करले.


या पूर्वी आठवडाभर म्हणजे ११ एप्रिल १९४५ लाच अमेरिकन सैन्याने मॅग्डे-बर्ग शहर घेऊन एल्ब नदीही ओलांडली व बर्लिनपासून आता हे सैन्य केवळ ६० मैलांवर पोहोचले होते.


१६ एप्रिलला अमेरिकन सेनेने न्यूरेंबर्ग घेतले व त्याच दिवशी वॉर्सा घेऊन

ओडर नदीवर थबकलेल्या मार्शल झुकॉव्हच्या लाल सैन्याने ओडर नदी ओलांडली. २१ एप्रिलला लाल सैन्य बर्लिनच्या परिसरात येऊन पोहोचले.

२५ एप्रिलला बर्लिनच्या पश्चिमेस ७५ मैलांवर एल्ब नदीवरील तोरगो या शहरानजीक अमेरिकन सैन्याची व लाल सैन्याची हातमिळवणी होऊन, जर्मनीचे आता उत्तर व दक्षिण असे दोन भाग पडले ! मध्ये अमेरिकन व रशियन सैन्याची भिंत उभी राहिली; तिसऱ्या राईशचे दैवत—ॲडॉल्फ हिटलर बर्लिनमध्ये कोंडला गेला.

[अपूर्ण]





[ बर्लिनमध्ये या वेळी काय घडत होते ? हिटलर-च्या आसपास कोण कोण होते....बर्लिन ३० एप्रिलला पडले.... ! २० एप्रिलनंतर अखेरच्या दहा दिवसांत बर्लिनमध्ये ज्या विलक्षण घटना घडत होत्या त्यांची हकीकत पुढील अंकी....प्रस्तुत लेखमालेमधील हा शेवटचा भाग सांगून मी वाचकांची रजा घेणार आहे. —लेखक ]


# दिवा जळू दे सारी रात–दोन प्रतिक्रिया

## १ : दि वे ऑफ ऑल कालेलकर....

मुळात या नाटकाचे उगमस्थान परदेशातले. (तसे ते पुष्कळच मराठी नाटकांचे असते म्हणा !) 'The Way of All Flesh' ही ती कथा. त्यावर हॉलिवुडमध्ये किमान दोनदा चित्रपट तयार झाले. मूकपटात एमिल जॅनिंग्ज आणि बोलपटात अकिम टॅमिरॉफ या नटश्रेष्ठांनी त्यातली मध्यवर्ती भूमिका गाजविली. हिंदी निर्माते दलसुख पंचोली यांचा 'खजांची' हा चित्रपट याच कथेवर आधारलेला होता. या कथेवरून श्री. कालेलकरांनी 'क्षण आला भाग्याचा' ही पटकथा लिहिली. तो बोलपट (आजचे मराठी चित्रसृष्टीचे एकंदर 'वैभव' लक्षात घेता) खरोखरीच चांगला म्हटला पाहिजे इतक्या दर्जाचा होता. श्री. राजाभाऊ परांजपे यांच्यासारखा समर्थ अभिनेता मध्यवर्ती भूमिकेला लाभला. त्यामुळे ती भूमिका फारच उत्कृष्ट झाली. पटकथेतला एक निबंध-वाचनाचा प्रसंग पाहून तर जुन्या जाणत्या पटकथा-कारांनाही भारावल्यासारखे झाले असे ऐकतो.

त्या बोलपटाच्या कथेचे हे नाटक श्री. कालेलकरांनी तयार केले आहे. पण ते करताना मुळातले हृद्य, साधेसुधे प्रसंग पार हरवले आहेत आणि कृत्रिम, अवास्तव प्रसंगांची भाऊगर्दी मात्र झाली. वास्तविक पाहाता मध्यवर्ती भूमिका पोस्टमास्तरची. पण ती करण्याला समर्थ अभिनेता वेळेवर उपलब्ध झाला नसावा म्हणून त्याच्या मुलीलाच महत्त्व देण्यात आले. ती भूमिका रेखाबाईंसारखी समर्थ अभिनेत्री कर-णार ! मग काय विचारता ? पोस्टमास्तर बिचारा नॉटपेड पत्रासारखा बाजूला पडला अन् ही त्याच्या मुलीचीच कथा झाली. बरे, ती तरी जरा वास्तव पद्धतीने सांगायला काय हरकत होती ? पण ती इतकी कृत्रिम नि अवास्तव केली गेली आहे की, जाणत्या प्रेक्षकाला फारच खटकावी.

हा पोस्टमास्तर प्रथम दिसतो, तेव्हा मुलाला फॉरिनला पाठवण्याचे बेत चाललेले असतात. घरातली एकंदर सजावटही चांगल्या श्रीमंत घराला साजेशी दिसते. कल्याणसारख्या ठिकाणी पोस्टमास्तरला पगार असून असणार किती ? बरे, हा मास्तर "वरकमाई" करणाराही दिसत नाही. मग त्याची परिस्थिती मुलाला फॉरिनला सहज पाठवण्याइतकी उत्तम कशी ? अहो, इथे पुण्यातल्या इंजिनियरिंग कॉलेजचा खर्च मध्यम वर्गातल्या माणसांना झेपत नाही आणि कालेलकर खुशाल फॉरिनला (म्हणजे नेमके कुठे ते मात्र त्यांनी सांगितले नाही.) पाठवण्याच्या गोष्टी करताहेत ! असो.



भावना [ रेखा ]
गुप्तेकाका
[ शरद तळवलकर ]

हा मुद्दा सोडला तरी जो मुख्य प्रसंग रगवला आहे तोहा अगदा भुसभुशीत वाटतो. रात्रीच्या वेळी पोस्टमास्तरकडे एक बाई आपले सेव्हिंग बँकबुक घेऊन येते. तिचा नवरा अत्यवस्थ आहे आणि त्याचे ऑपरेशन पहाटे व्हायचे आहे म्हणे ! डॉक्टर तरी असला उलटचा काळजाचा भेटला आहे की, त्याला ऑपरेशनची फी अर्ध्या रात्री अगदी ' रोख कॅश ' पाहिजे. नाही तर तो ऑपरेशन करणार नसतो. तेव्हा तिला बुकातले तीन हजार रुपये ताबडतोब हवेत. खाते नवऱ्याच्या नावाचे ! तो सही करण्याच्या अवस्थेत नाही. हे सारे ऐकून पो. मा. विरघळतो अन् खुश्शाल पोस्टाची तिजोरी उघडून तिला तीन हजार रुपये देऊनही टाकतो.

दुसऱ्या दिवशी ती बाई नवऱ्याची सही घेऊन येणार असते. पण त्याआतच इन्स्पेक्टर तपासणीला हजर. लागलीच पो. मा. वर ठपका ! मुलीचा निरोप घेऊन निरवानिरव करून तो परागंदा. अरे, काय आहे काय हे ?

मूळ मुद्दा असा की, बॅन्कबुकातली शिल्लक दाखवून उद्या पैसे देऊ असे म्हटल्या-वर जगातल्या कोणत्याही डॉक्टरने ऑपरेशन ताबडतोब केले असते. रोगी त्याच्या ताब्यातच राहायचा होता ना ! बरे, ही बाई पो. मा. कडे आली. पो. मा. ने तिला तात्पुरते आपल्याजवळचे पैसे का नाही दिले ? (त्याचेजवळ मौल्यवान दागिने आहेत. दुसऱ्या अंकात तसा उल्लेख आहे.) हेही दृष्टिआड केले तरी इतक्या प्रामा-

णिक पोस्टमास्तरला इन्स्पेक्टर काहीतरी मुदत देईलच. एकदम त्याचेवर ठपका कसा ठेवील ? असे अनेक प्रश्न मनात येतात. आणि हा प्रसंग एकदम तकलादू वाटतो. मध्यवर्ती प्रसंगांची अशी दुर्दशा झाल्यामुळे नाटक व्यवस्थित उभेच राहत नाही. जाणत्या प्रेक्षकाला, त्यात स्वारस्य वाटेनासे होते. मग फक्त रेखाबाईंच्या अभिनयाला दाद द्यायची, शरद तळवकर नि बबन प्रभू यांच्या विनोदाला हसायचे एवढेच बाकी राहाते. नाही म्हणायला दुसऱ्या अंकाच्या शेवटचा प्रसंग श्री. कालेलकरांनी चांगला लिहिला आहे. तिथेसुद्धा कृत्रिम योगायोग आहे पण तेवढा खपतो ! (अर्थात 'सिंहाचा वाटा' रेखाबाईंच्या अभिनय कौशल्याचाच आहे) तिसरा अंक म्हणजे तर काहीही सांगायचे शिल्लक न राहिल्यामुळे काहीतरी अनावश्यक नि अतिरंजित घटनांची खिचडी अशा स्वरूपाचा झाला आहे.

नाटक संपते तेव्हा जाणत्या प्रेक्षकाला एका चांगल्या कथेचे 'हे असे' झालेले पाहून रुखरुख लागते तर भाबडा प्रेक्षक भलताच खूष झालेला असतो. त्याला घटनांमधली वास्तवता वगैरेची गरज नसल्यामुळे नि पोटभर रडायला–हसायला मिळाले असल्यामुळे तो ( कदाचित पुन्हा येण्याचा बेत करीत) खूष होऊन नाट्यगृहाबाहेर पडतो. नाराज होतो तो फक्त जाणता प्रेक्षक ! त्याच्यासाठी हे नाटक नाही, असे निरुपायाने म्हणावेसे वाटते.

## अभिनय

आता अभिनयाविषयी. रेखाबाईंचा अभिनय एकदम लाजवाब आहे. दुसऱ्या अंकाच्या शेवटी तर त्यांनी कमालीची उंची गाठली आहे. नाटकाचे निम्मे यश त्यांनीच मिळविले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. राहिलेल्या यशात मोठा वाटा आहे शरद तळवळकर नि बबन प्रभू यांचा ! शरद तळवळकरांच्या तोंडी श्री. कालेलकरांनी पोस्टातली परिभाषा घातली आहे ती शोभून दिसते. बबन प्रभूंना अगदी योग्य भूमिका मिळाली आहे, त्यामुळे ते धमाल करतात. त्या दोघांचे विनोदी प्रसंग कालेलकरांनी सुरेखच लिहिले आहेत.

विनोदी लिहिण्यात कालेलकरांचा हातखंडाच आहे म्हणा ! 'एक्झॅक्टली' हा 'करायला गेलो एक' मधला विनोद चोरण्याचे मात्र काही कारण नव्हते. श्री. गोविंद कुलकर्णी यांचे काम व्यवस्थित आहे तरीदेखील रेखाबाईंच्या अतिशय प्रभावी अभिनयामुळे ते फिके वाटतात. त्यांना वावही तसा कमीच आहे म्हणा ! श्री. सतीश रणदिवे यांनी तिसऱ्या अंकातला अभिनय चांगला केला आहे. विशेषतः, बायकोच्या तोंडात मारण्याचा प्रसंग त्यांनी चांगला वठवला आहे. श्री. जयवंत वालावलकरांचा 'मारवाडी' थेट 'वेगळं व्हायचंय् मला' मधल्या त्यांच्याच भूमिकेवर बेतलेला दिसतो. ते काम त्यांनी लक्षात राहण्याइतके चांगले केले आहे. बाकीच्या पात्रांविषयी उल्लेखनीय असे काही नाही.

एकंदरीत सर्वसामान्य प्रेक्षकांच्या भावनेला एकदम हात घालून त्यांना जिंकून

घेणारे हे नाटक जाणत्या प्रेक्षकांना आवडत नाही आवडणार नाही हे खरे. तथापि, नाटक ' धंदा ' मात्र करणार हे निदान बनविण्यास जरादेखील भीती वाटत नाही.

सुधीर दामले

## २ : आगे बढो कालेलकर ...

' पुस्तक हातांत घेतलं, वाचलं आणि संग्रहात कायम ठेवावंसं वाटलं ' असा अभिप्राय एका पुस्तकाचे संबंधांत प्रा. ना. सी. फडके यांनी दिला होता. त्याच चालीवर ' नाटचगृहात गेलो, नाटक पाहिलं आणि स्मृतिमंजूषेत कायम ठेवावंसं वाटलं ' असेच वर्णन श्री. मधुसूदन कालेकर यांच्या नव्या ' दिवा जळू दे सारी रात ' या नाटकाचे करावे लागेल.

आज विशेषत:, भावा-बहिणीची नाती ही ओव्यांपुरतीच मर्यादित राहिलेली दिसतात. भावाच्या प्रेमाचे मोजमाप त्याने घातलेल्या ओवाळणीच्या पैशावरून करणाऱ्या बहिणी फार दिसू लागल्या आहेत. अशा या ' जिव्हाळ्याचे दुर्भिक्ष ' झालेल्या दिवसांत या नाटकाने फार मोठी सांस्कृतिक कामगिरी बजावली आहे असे मला म्हणावेसे वाटते.

काही स्वयंमन्य टीकाकार सोडले तर बाकी सर्वांनी या नाटकाचे भरपूर कौतुक केलेच आहे. ताज्या वार्तेप्रमाणे महाराष्ट्राचे कविश्रेष्ठ ग. दि. माडगूळकर नि विनोदाचे बादशहा पु. ल. देशपांडे हेही हे नाटक पाहून कमालीचे भारावून गेले आहेत. यापेक्षा मोठे शिफारसपत्र नाटकाला कोणते मिळावे ? जे टीकाकार निष्कारण टीका करून शाई आणि कागद फुकट घालवीत आहेत, त्यांचे बाबतीत ' ते के न जानीमहे ' एवढेच म्हणतो.

नाटकाची कथा मुद्दामच सांगत नाही. सर्वांनी पाहावे अशी मनापासून इच्छा आहे म्हणूनच.

आता अभिनय-रेखाबाईंच्या कामाविषयी स्तुति करायला शब्द अपुरे पडावेत इतके त्यांचे काम प्रभावी झाले आहे. विशेषत:, दुसऱ्या अंकाच्या शेवटी त्यांचे काम इतक्या उंचीला चढले आहे की, त्या मानाने तिसरा अंक काहीसा फिका वाटतो. खरोखर नाटकाचे ' फिफ्टी पर्सेंट ' यश श्री. कालेकरांचे असेल तर ' फिफ्टी पर्सेंट ' नक्कीच रेखाबाईंचे आहे. दुसऱ्या अंकातील त्यांचा अभिनय हा मराठी रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट अभिनयप्रसंगाचे मालिकेत आपोआप जाऊन बसला आहे. तो विलक्षण ताण सहन न होऊन एका कोवळ्या मनाच्या स्त्रीप्रेक्षकास फीट आली होती ती उगीच नव्हे !

हा असह्य ताण कमी करण्याचे काम सर्वश्री शरद तळवलकर आणि बबन प्रभू

या दुकलीने मोठ्या सफाईने केले आहे. श्री. तळवलकर गुप्तेकाकांच्या भूमिकेत जणू काही ती भूमिका प्रत्यक्ष जगतात. वाक्ये अशा बहारीने फेकतात की प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दाद द्यावी. श्री. बवन प्रभूना अगदी 'फिट्ट' भूमिका मिळाली आहे. तिसऱ्या अंकातले त्यांचे परिवर्तन प्रत्यक्ष पाहिलेच पाहिजे. त्याशिवाय त्यातली मजा कळणार नाही. तेही प्रत्येक वाक्याचे चीज करतात. श्री. गोविंदराव कुलकर्णी यांनी आपली भूमिका अत्यंत कसोशीने केली आहे. पण त्यांना वाव जरा कमी आहे असे वाटते. तरीपण ते कोठेही कमी पडलेले नाहीत. श्री. सतीश रणदिवे हे नाव मला तरी नवीन वाटले. पण त्यांचा अभिनय पाहिल्यावर ते नवे आहेत असे वाटले नाही. एखाद्या मुरलेल्या नटासारखा सुरेख अभिनय त्यांनी केला. श्री. जयवंत वालावलकर यांचा 'घेलाशेट' स्मरणीय वाटला. अगदी त्यांच्या 'वेगळं व्हायचंय'-मधल्या कोटिबुद्धे इतकाच ! अर्थात ती आणि ही ह्या दोन्ही भूमिकांत फार अंतर आहे. दोन्ही तुफान गाजणार एवढेच साम्य ! बाकीच्या कलावंतांच्या भूमिकाही चांगल्या झाल्या. श्री. आत्माराम भेंडे यांच्यासारख्या अनुभवी दिग्दर्शकाने नाटक बसविले आहे त्यामुळे साऱ्या हालचाली कशा बिनचूक, सफाईदार होतात. आपण नाटक पाहात नसून प्रत्यक्ष आपल्या घरात घडणारे प्रसंग पाहात आहोत असे वाटते. श्री. सुरीद कार ('कांच की गुडिया' या हिंदी बोलपटाचे संगीत दिग्दर्शक) यांचे संगीतही प्रसंगानुरूप वाटते. एकच गीत आहे पण ते श्री. स्नेहल भाटकर यांनी सुरेख गायले आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, स्वयंमन्य टीकाकारांकडे मुळीच लक्ष न देता श्री. कालेलकरांनी अशीच अनेक नाटके लिहून प्रेक्षकांना आनंदित करावे. आगे बढो कालेलकर ! यश आपलेच आहे !

रा. वि. पारखी

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.





# पाचवा महाराष्ट्र नाट्य महोत्सव

## पुणे केंद्र

यंदाचे वर्षी पुणे केंद्रातर्फे सादर करण्यात आलेल्या नाटकांत एकूण एकशेसत्तावीस कलावंत प्रत्यक्ष रंगभूमीवर आले तर रंगभूमीमागे ऐंशी तंत्रज्ञांनी काम केले. सुमारे अकरा हजार प्रेक्षकांनी ही नाटके पाहिली.

परीक्षक होते, प्रा. रा. शं. वाळिंबे, सौ. उषा सातारकर व श्री. दत्ता सराफ.

प्रा. ना. सी. फडके, श्री. के. नारायण काळे, व्यंकटेश माडगूळकर यांनी स्पर्धेतील जवळजवळ सर्व नाटके संपूर्ण पाहिली.

## १ : पी. डी. ए. चे 'तू वेडा कुंभार'

यंदाच्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट नाटक सादर करण्याचा मान पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या नामांकित संस्थेकडे जातो. प्रा. भालबा केळकर ह्यांच्या समर्थ नेतृत्वाखाली नाट्यक्षेत्रात धडाडीने नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या ह्या संस्थेने यंदा श्री. व्यंकटेश माडगूळकरांचे 'तू वेडा कुंभार' हे नाटक सादर केले.

——नव्हे प्रत्यक्ष जिवंत केले.

ह्याच संस्थेने हेच नाटक – 'जाणार कुठे ?' ह्या नावाने पूर्वी सादर केले होते व ते अयशस्वी झाले होते. परंतु त्याच नाटकात आवश्यक त्या सुधारणा करून त्यांनी मोठ्या जिद्दीने हे नाटक यंदा स्पर्धेत केले.

नाटकात पात्रे तशी ढिगाराभर. परंतु मुख्य पात्रे चार. गावात मोटारीमागून येणाऱ्या बकाल विचारसरणीला अडवण्याचा प्रयत्न करून प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा प्रयत्न करणारा म्हातारा इजाप्पा. त्याची तरणी सून. तिचा बेकार व पुरुषत्व नष्ट झालेला नवरा आणि मोटारीबरोबर आलेला सतरा गावचं पाणी प्यालेला व इजाप्पाच्या सुनेवर वाकडी नजर ठेवणारा रंगेल ड्रायव्हर.

नाटकाची सुरुवात होते ती मोटार आलेली आहे अशा परिस्थितीत. कुंभाराचे घर, त्याच्या भोवतालचे वातावरण, ह्यांचे दृश्य अशा काही बहारीने उभे केले होते की, पाहणारास वाटावे, आपण कुंभारवाड्यात तर नाही ना ? रंगभूमीवरील ह्या दृश्याबाबत आणखी काही अपेक्षा बाळगणे केवळ अशक्य आहे. इजाप्पाचे काम करणाऱ्या श्री. वासुदेव पाळंदे ह्यांनी दोन मडकी चाकावरून अशा काही कौशल्याने उतरवली, की पाहणारास ते शंभर नंबरी कुंभार वाटावेत. इजाप्पाची सून सौ. सेवा चौहान ह्यांनी अशा ठसक्यात उभी केली की, या भूमिकेला ह्यापेक्षा अधिक न्याय मिळवून देणे खरोखरच अशक्य आहे.

स्पर्धेतील मला आढळलेल्या सर्वोत्कृष्ट कलावंत म्हणूनच त्यांचा गौरव करावा लागेल. तोंडात दम असणारा, बापाविषयी तिडीक असणारा कुंभाराच्या पेशातून बाहेर पडण्यास उत्सुक असणारा इजाप्पाचा मुलगा — जब्बार पटेल ह्यांनी यशस्वीपणे उभा केला. श्रीराम खरे ह्यांचा ड्रायव्हर — त्यांच्या अंतस्थ हेतूसह प्रकट झालेला दिसला. हा ड्रायव्हर इजाप्पाच्या मुलास हॉटेल घालण्याचा सल्ला देताना —, भांडवलाविषयी चर्चा चालू असताना — इजाप्पाच्या सुनेचा सूचक प्रवेश दाखविण्यात प्रा. केळकरांचे दिग्दर्शनकौशल्य दिसून येते.

दुसऱ्या अंकातील — इजाप्पाची सून व गावातील एक नवविवाहित खेडवळ तरुणी (कु. अंजली फडके) ह्यांच्यांतील संवाद म्हणजे नाटकाचा आत्मा ह्या दोन प्रथमश्रेणीच्या कलावंतांकडून प्रा. केळकरांनी अशा काही बहारीने प्रकट केला आहे की, त्यातून इजाप्पाच्या सुनेची व्यथा तर स्पष्ट होतेच, पण तिच्यात होणारा वैचारिक बदल प्रेक्षकांस समजतो — त्यांची तिच्याबद्दलची सहानुभूती कायम राहते. इजाप्पाच्या मुलाला गावातल्या टोळभैरवांकडून मारपीट होते. हे दृश्य शंभर नंबरी जिवंतपणे करण्यात आले.

तिसऱ्या अंकात ड्रायव्हरची उत्सुकतेने वाट पाहणारी इजाप्पाची सून व ड्रायव्हरचे गाडीसह आगमन ही दृष्ये म्हणजे तंत्रवापरातील, तसेच दिग्दर्शनकौशल्याची

परिसीमाच होय. प्रत्येक छोटा–मोठा कलावंत नाटकातील आपली भूमिका जगत होता, 'करत' नव्हता. तंत्र नाटकासाठी आहे, तंत्रासाठी नाटक नव्हे, ह्याची जाणीव दिग्दर्शकाला होती. तसेच नाटकाचे यश हे व्यक्तिगत यशात नसून उत्कृष्ट संघकार्यात आहे, हे प्रत्येकाने ओळखले होते व ह्या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे निर्विवादपणे पहिला नंबरच दिला जावा, अशा स्वरूपाचा नाटच-प्रयोग ही संस्था देऊ शकली.

## २: नाटचसंघाचे 'याजसाठी केला होता अट्टाहास'

पुणे केंद्रातर्फे अंतिम स्पर्धेसाठी निवडले गेलेले दुसरे नाटक श्री. बाळ भाटे-लिखित 'याजसाठी केला होता अट्टाहास.' नाशिकच्या नाटचसंघाने हे सादर केले. नाटक कोरे हे पहिले वैशिष्टच. त्यात रहस्यप्रधान व मानसिक विकृतीवर आधारलेले, त्यामुळे प्रेक्षक सुरुवातीपासूनच प्रयोगाबाबत उत्सुक होते.

नाटकाच्या लेखनात छोटे–मोठे अनेक दोष सापडतील, परंतु ते ज्या पद्धतीने सादर केले, ती निर्दोष तर होतीच, परंतु इतकी समर्थही होती की, प्रेक्षकाला लेखनातील दोषांकडे बघण्यासाठी सवडही मिळाली नाही. उत्तम व परिणामकारी प्रकाशयोजना, प्रत्येक पात्राचा उत्तम अभिनय, प्रसंगाला उठाव देणारे पार्श्वसंगीत, या सर्वांच्या एकत्रित येण्याचा परिणाम इतका विलक्षण झाला की, प्रेक्षक अक्षरश: आपल्या खुर्चीत खिळून बसला होता. त्यात दोन्ही अंकाचे शेवटी लेखकाने असे काही प्रसंग उभे केले (Shocks) की, पुढे काय होणार ही उत्कंठा शेवटपर्यन्त कायम राहिली.

सरोजचे काम करणाऱ्या कु. उर्मिला भाटे ह्यांनी आपली अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका तर यशस्वीपणे पार पडलीच; पण त्याचबरोबर आपण इतर कलावंतांच्या फार वर जाणार नाही ह्याचीही त्यांनी दक्षता घेतली. नाटचप्रयोगाच्या यशाने प्रेक्षक अक्षरश: थरारून गेले. मात्र पहिल्या अंकात बाबासाहेबांच्या मृत्युनंतर विठ्ठलाच्या तसबिरीवरील हार तुटणे, त्याच वेळी तेथील दिवा जाणे, ह्यांसारख्या क्षणिक परिणामी वाटणाऱ्या, परंतु विचारांती दोष ठरणाऱ्या गोष्टींपासून दिग्दर्शिका कु. कुमुद अभ्यंकर दूर राहत्या तर बरे झाले असते. तसेच लेखकाचे यश मान्य करूनही नाटक पाहत असताना गेल्या वर्षीच पुण्याच्या कलोपासकांनी सादर केलेल्या व गाजवलेल्या गो. गं. पारखींच्या 'कथा कुणाची व्यथा कुणा' ह्या नाटकाची आठवण झाल्यावाचून राहिली नाही. वरील गोष्टी सांगितल्यावरही एक गोष्ट मोकळ्या मनाने मान्य केली पाहिजे की, निर्मितिमूल्ये, अभिनय व तांत्रिक यश ह्या बाबतींत नाटकाचा दर्जा प्रथमश्रेणीचा होता व म्हणूनच पुण्यातील रसिकांनी मोकळ्या मनाने नाटच संघाच्या या प्रयोगाचे कौतुक केले.

**शरद गोखले**

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### ● संपादक विरुद्ध मच्छर

वर्तमानपत्राचा उपयोग काय ? या प्रश्नाचे साधे व सरळ उत्तर म्हणजे जगातल्या ताज्या घडामोडींची माहिती पुरविणे. पण कुठलीही गोष्ट आता इतकी साधी व सरळ राहिलेली नाही. अमेरिकेतल्या हार्वर्ड विश्वविद्यालयाचे शास्त्रज्ञ म्हणे ' न्यूयॉर्क टाइम्स 'च्या कागदापासून डास मारण्याचे औषध तयार करीत आहेत ! हर, हर जनमताला जाग दिण्याची ईर्ष्या बाळगणाऱ्या संपादकाचे कर्तृत्व शेवटी झोप नीट यावी म्हणून मच्छरांवर शस्त्र उपसण्यांत खर्च व्हावे ना ? खरे म्हणजे १०० पानी न्यूयॉर्क टाइम्स चाळता चाळताच झोप यायला हरकत नाही. तेव्हा आणखी त्याच्या कागदापासून डास मारण्याचे औषध काढण्याची काय गरज होती ?

भारत सरकारचे आरोग्यखाते प्रस्तुत प्रयोगात दिलचस्पी घेत आहे, अशी वातमी आहे. पण ज्या हिंदुस्थानातल्या माणसांनी अमेरिकन पॅटन 'रणगाड्यांना दाद दिली नाही त्या हिंदुस्थानातले मच्छर अमेरिकन मच्छराला दाद देतील काय ? त्यांचा मुकाबला करायचा म्हणजे एखादे जहाल प्रकृतीचे भारतीय वर्तमानपत्रच पाहिजे. एकूण भारत सरकारचे एक खाते मच्छीमारीची वाढ करीत असताना दुसरे खाते मच्छरमारीला प्रोत्साहन देत आहे म्हणायचे. मागे लाल चीनने माशा मारण्याची मोहीम आरंभिली होती. म्हणजे तिकडे माशी विरुद्ध माणूस होता, तर इकडे मच्छर विरुद्ध संपादक उभा ठाकणार.

आता वर्तमानपत्रामुळे डास मरतात, तर इतर चिलटांनी काय पुण्य केले आहे ? आमचा ' नेपा न्यूज प्रिंट ' डासच काय, पण झुरळापासून स्तंभलेखकापर्यंत यच्चयावत् जीव-जंतू खलास करू शकतो, असे उघडकीला आले तर माझ्यासकट सर्व पत्रकारांची मान देशाभिमानाने ताठ झाल्याखेरीज राहणार नाही. इतकेच काय, पण ' माणूस ' च्या संपादकांनी ' माणूस 'चे नाव बदलून ' मच्छर ' ठेवावे आणि प्रगतिशील देशभक्ती प्रकट करावी, असे मी त्यांना आवाहन करेतो.

### ● कुत्र्याचे नकली जिणे

आजच्या विश्वामित्री दुनियेत माणसाला असली-नकली ओळखता येण्याची पंचाईत झाली आहे, तेथे बिचाऱ्या कुत्र्याचा काय पाड ? माणसाच्या समजुतीसाठी प्लास्टि-

कच्या फुलांना खऱ्या फुलांचा सुगंध देणारी रसायने निघाली होती,–तर आता कुत्र्याला बनविण्यासाठी रबराच्या हाडकाला खऱ्या हाडकाचा (सु) वास देणारी रसायने निघाली आहेत. आहे की नाही उलटी गंगा ? आता एखादे रबरी हाडुक पैदा करून त्याच्यावर 'श्वानप्रिया' नामक एखादे अत्तर शिंपडीत बसण्याचा खटाटोप करीत बसण्यापेक्षा सरळ बिचाऱ्या मोत्याला एखादे खरे हाडुक दिले तर ? –पण असे केले तर विज्ञानाची प्रगती थांबेल म्हणतात. जी गोष्ट निसर्गाकडून (किंवा एखाद्या मेलेल्या बोकडाकडून) विनासायास मिळू शकते, ती बऱ्याच खटाटोपाने स्वत: तयार करण्यात माणसाचे कर्तृत्व आहे अशी एक फॅशनेबल समजूत आहे. पण तिच्यापायी आधीच वाईट असलेले कुत्र्याचे जिणे आता अगदी नकली झाले आहे त्याची काय वाट !

असाच आणखी एक बनवाबनवीचा प्रकार म्हणजे उंदरांना पळविण्यासाठी जपानमध्ये एक यांत्रिक मांजर तयार करण्यात आले आहे. त्याचे डोळे म्हणे अंधारात चमकतात आणि ते थोडचा थोडचा वेळाने 'म्यांव्' करते. हे मात्र फारच झाले. उंदीरमामा आणि मनी मावशी यांचे आपसांत फारसे बरे नसते, ही गोष्ट खरी असला तरी ही ॲटोमॅटिक मूषकमर्दिनी अहोरात्र पहारा करू लागली म्हणजे समस्त उंदीर समाजावर कायमचाच कर्फ्यू बसायचा आणि सगळेच उंदीर मेल्यावर नवकाव्यास विषय कसा उरणार ?

## ● इलेक्ट्रिक प्रेम

लहानपणी अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी मोठचा आवडीने वाचल्या, पण आता मोठेपणी इंग्रजी भाषेत त्याहून सुरस आणि कमालीच्या चमत्कारिक गोष्टी वाचायला मिळतात. परवा 'नेकेड सोसायटी' नावाचे एक इंग्रजी पुस्तक वाचले. त्यात लिहिले आहे की, माणसाच्या मेंदूत इलेक्ट्रोड नावाच्या विजेच्या तारा खुपसल्या आणि त्या कमरेच्या पट्टयाला लावलेल्या बटणांना जोडल्या की, बटण दाबून मनात हुकमी भावना निर्माण करता येतात. म्हणजे संपलाच कारभार ! यापुढे आधुनिक प्रेमवीराला आपली प्रीतिदेवता केव्हा प्रसन्न होते याची वाट पाहात तटकळत बसायला नको. 'प्रेम' नावाचे बटण दाबले की, स्विच दाबून दिवा लावावा त्याप्रमाणे तिला प्रेमाचा झटका येईल. आजपर्यंतच्या जुनाट काळात प्रेम भावनेची जोपासना करायला काव्य, चंद्र आणि हिंदी सिनेमा असल्या गोष्टी लागत होत्या– पण आता इलेक्ट्रिशियन लागणार. नाही तर हे इलेक्ट्रिक प्रेम मध्येच 'फेल' व्हायचे. दोन बटणांच्या मीलनाची ही नाजुक बाब सोडली तरी इतरही बरेच फेरबदल होणार. यापुढे सरकार विरोधी पक्षीयांचे मन वळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी बटण फिरविण्याचा प्रयत्न करणार. आणि एखादा हुकूमशहा हा तर चक्क आज्ञाधारक माणसांचा सरकारी कारखाना उभारणार. विजेवर रेडिओ चालतात, रेफ्रिजरेटर चालतात, मोटारी चालतात–तशी आता माणसे चालणार. ●


**जगाच्या पाठीवर**
**वा. दा. रानडे**

## □ जनरल द गोल

फ्रान्सच्या अध्यक्षपदी जनरल द गोल यांची पुन: सात वर्षांसाठी निवड झाली. पण फ्रेंच जनतेत त्यांची पूर्वीसारखी प्रतिष्ठा राहिलेली नाही हे मतदानावरून स्पष्ट झाले. आपण निर्णायक मतदानाने सहज निवडून येऊ, या त्यांच्या आत्मविश्वासाला ५ डिसेंबरच्या मतदानाने मोठा धक्का दिला. या मतदानात त्यांना फक्त ४४ टक्के मते मिळाली आणि मतदानाच्या दुसऱ्या फेरीत उतरण्याचा नामुष्कीचा प्रसंग फ्रान्सच्या या सूत्रधारावर आला. त्यांत ५५ टक्के मते मिळवून ते विजयी झाले हे खरे. पण त्यांची लोकप्रियता कमी होत चालली आहे हेही यावरून स्पष्टपणे दिसून आले. द गोल अधिकारावर आल्यापासून फ्रान्समध्ये आतापर्यंत अनेक वेळा निरनिराळ्या प्रश्नांवर सार्वमत घेण्यात आले. त्यात साधारणपणे ७५ टक्क्यांखाली मते द गोल यांना मिळत नसत. पण त्यांची प्रतिष्ठा कमी होऊ लागली आहे हे १९६२ मधील सार्वमतात प्रथम दिसून आले या सर्वमतात त्यांना ६२ टक्के मते मिळाली. घटनादुरुस्तीच्या मंजुरीसाठी हे सार्वमत होते. अध्यक्षीय निवडणुकीच्या मतदानात हा पाठिंबा आणखी खाली आला.

द गोल ७५ वर्षांचे असले तरी या वयातही त्यांची स्मरणशक्ती आणि बुद्धी तल्लख आहे. त्यांना निकटचे मित्र नाहीत. वैयक्तिक भावना विकार त्यांनी पूर्ण आटोक्यात ठेवले आहेत. असे असले तरी दुसऱ्यांच्या भावनांना ते जपतात. एखाद्या मंत्र्याला मुलगा झाला तर त्याच्या घरी ते आठवणीने फुले पाठवितात. सहज हसतखेळत मंत्र्यांचे दोष ते दाखवितात. पाहुण्याशी एखाद्या मंत्र्याची ओळख करून देताना ते म्हणतील, "या मंत्र्यांना काहीही विचारा, ते उत्तर देतील. फक्त त्यांच्या खात्याबद्दल मात्र विचारू नका." राष्ट्रावर केवढाही गंभीर पेचप्रसंग आलेला असो ते मनाची शांतता ढळू देत नाहीत. लाळघोटेपणाचा त्यांना तिटकारा आहे, अशा लोकांना ते दूर ठेवतात.

मंत्रिमंडळापैकी मुख्यमंत्र्यांची भेट द गोल आठवड्यातून तीन-चार वेळा आणि परराष्ट्रमंत्र्यांची भेट आठवड्यातून एकदा घेतात. इतर मंत्र्यांची व त्यांची अनेक महिने भेट होत नाही. अलीकडे ते कमी वाचतात. स्वत:च्या कामाचे तासही त्यांनी कमी केले आहेत. रोज सकाळी पावणेदहा वाजता ते ऑफिसच्या टेबलाशी बसतात. रोज आपल्या चारही सल्लागारांची भेट घेतात. या सल्लागारांना निरनिराळ्या



[ पूर्वी ७५ टक्के ]　　: द गोल :　　[ आता ५५ टक्के ]

विषयांची मंत्र्यांपेक्षाही जास्त माहिती असते. हे सल्लागार म्हणजे एकप्रकारे दुसरे मंत्रिमंडळच आहे.

भेटीसाठी येणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे द गोल शांतपणे, लक्षपूर्वक ऐकून घेतात व प्रत्येक मुद्याला व्यवस्थित उत्तर देतात. एका बँकरने आपल्या मुलाखतीत अकरा मुद्दे उपस्थित केले होते. द गोल यांनी ऐकताना कोणतीही टिपणे केली नाहीत. पण त्यातला एकही मुद्दा न विसरता किंवा एकाचाही क्रम न चुकता द गोल यांनी सर्व मुद्यांची व्यवस्थित उत्तरे दिल्याचे पाहून त्या बँकरला आश्चर्य वाटले. अलीकडे रात्री साडेसातच्यापुढे ते आफिसमध्ये थांबत नाहीत. रोजच्या वृत्तपत्रांपैकी ' ल मोंडे ' हे वृत्तपत्र ते पूर्णपणे वाचतात. आपण ठरविलेली व सांगितलेली कामे योजनेप्रमाणे पार पडतात की नाही. यासाठी, सर्व तपशीलांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते.

द गोल यांनी फ्रान्सला स्थिर राजवट दिली, जगाच्या राजकरणात प्रतिष्ठा मिळवून दिली, अमेरिकेच्या तंत्राने न चालता युरोपने स्वतंत्र भूमिका घ्यावी, असे त्यांचे धोरण आहे. नाटो करार पश्चिम युरोप एकीकरण यांत अमेरिकेचे वर्चस्व असल्याने या योजनांना त्यांचा विरोध आहे. आपल्या नेतृत्वाखाली पश्चिम व पूर्व युरोपचा एक गट स्थापण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

## □ सॉमरसेट मॉम

विशीतल्या तरुणाची ती पहिलीच कादंबरी प्रकाशकांनी स्वीकारली पण त्यातील कठोर वास्तववाद वाचकांना कितपत आवडेल अशी शंका त्यांना वाटत होती. म्हणून फारच थोड्या प्रती त्यांनी छापल्या. पण त्यांचा अंदाज चुकला. पुस्तकाला एवढी मागणी आली की, त्यांना थोड्याच अवधीत दुसरी आवृत्ती काढावी लागली. सॉमरसेट मॉम यांची ती पहिली कादंबरी ' लिझा ऑफ लॅम्बेथ ' होती. १८९७ साली ती प्रसिद्ध झाली. विद्यार्थी मॉम त्या वेळी मेडिकल कॉलेजच्या चौथ्या वर्षाला होता. ही कादंबरी लिहिण्यापूर्वी त्याने हॉस्पिटलमधील प्रसूतिगृह विभागात तीन आठवडे काम केले. लंडनच्या लेंबेथ भागातील गलिच्छ वस्तीतील ६३ स्त्रियांचे बाळंतपण त्याने या काळात केले. या अनुभवातूनच पहिल्या कादंबरीचा विषय व कथानक त्याला मिळाले.

आपल्या शैलीत साधेपणा व सहजता कशी आली हे सांगताना मॉम लिहितात, " लेखकाचा व्यवसाय स्वीकारल्यानंतर बराच काळ लेखन कसे करावे, हे शिकण्यात मी घालविला. शैली सुधारण्यासाठीं मी कंटाळा येईपर्यंत परिश्रम घेऊ लागलो. पण माझी नाटके सादर होण्यास सुरुवात झाली, तेव्हा हे प्रयत्न मी सोडून दिले. या नंतर मी लिहू लागलो ते मात्र अगदी निराळ्या हेतूने. अलंकृत शब्दरचनेसाठी पूर्वी मी व्यर्थ परिश्रम घेत असे तसे, न करता साधेपणा व सहजता आणण्याचा मी प्रयत्न केला. " नाटकातील संवादांच्या सहजतेचा परिणाम होऊन त्यांच्या एकंदर शैलीतच सहजपणा आला.

भरपूर प्रवास आणि विविध प्रकारच्या अनुभवांनी समृद्ध झालेले जीवन यातूनच त्यांच्या थोर साहित्याची निर्मिती झाली. पहिल्या महायुद्धाच्या वेळी रेडक्रॉस शुश्रूषा पथकाबरोबर ते फ्रान्सला गेले. पुढे ब्रिटिश गुप्त हेर—दलात सामील झाले. ' अशेन्डेन ' या त्यांच्या कादंबरीत या कालातील काही अनुभवांचे चित्रण आहे. अमेरिका, पॅसिफिकमधील' बेटे, चीन, ब्रह्मदेश, भारत या देशांचा त्यांनी प्रवास केला. कादंबरीची कल्पना सुचली तरी कथानक आणि व्यक्ती त्यांच्या स्वभाव-वैशिष्ट्यानिशी डोळ्यापुढे पूर्ण उभ्या राहिल्याशिवाय मॉम लेखनाची घाई करीत नसत. ' दि मून अँड सिक्स पेन्स ' या कादंबरीची कल्पना दहा वर्षे त्यांच्या मनात घोळत होती. असेच इतर कादंबऱ्यांबद्दलही म्हणता येईल. या कादंबऱ्यांमधील स्वभावचित्रण इतके वास्तव असे की, ' थिएटर' ही त्यांची कादंबरी वाचून आपलेच स्वभावरेखाटन लेखकाने केले आहे असे त्या काळच्या एका प्रमुख नटीस वाटले.

मॉम यांनी स्वत:विषयी व स्वत:च्या लेखनकलेविषयी फारसे लिहिलेले नाही. ' दि समिंग अप ' आणि नंतरच्या ' ए राइटर्स नोटबुक ' या दोन पुस्तकांवरून या थोर कलावंताची व त्याच्या कलेची घडण कशी होत गेली याची काहीशी

कल्पना येते. आपल्या स्वभावप्रवृत्तीबद्दल ते दुसऱ्या एका पुस्तकात लिहितात 'माणसे जशी दिसतात तशी मान्य करणे ही माझी वृत्ती नाही. माझ्यावर कोणाचाही सहज प्रभाव पडत नाही. माणसाच्या हृदयात कोणती रहस्ये दडली असतील त्याचा शोध घेणे त्याबद्दल अंदाज बांधणे मला आवडते." माणसाच्या हृदयातील ही रहस्ये त्यांच्या प्रतिभेस गवसली व त्यांतूनच त्यांच्या थोर कलाकृतींचा जन्म झाला.

## ☐ कोण अधिक खरे बोलतो ? स्त्री की पुरुष ?

"कोण अधिक खरे बोलतो ? पुरुष की स्त्री ?" "पुरुष" असे मी या प्रश्नाचे उत्तर दिले तर साऱ्या स्त्रीवर्गाचा माझ्यावर रोष ओढवेल. पण हे माझे उत्तर नाही. एका पाहणीचा हा निष्कर्ष आहे. विवाहितांपैकी संततिप्रतिबंधक साधनांची किती जणांना माहिती आहे, किती जण त्याचा उपयोग करतात हे अजमावण्यासाठी डेव्हिड यॉकी, बी. जे. रॉबर्टस आणि विल्यम ग्रिफिथ्स या तीन संशोधकांनी पूर्व पाकिस्तानची राजधानी डाक्का शहरातील सरकारी नोकरांच्या वसाहतीत राहणाऱ्या ५४७ जोडप्यांची पाहणी केली. कारकुनांपर्यंत, झाडूवाल्यापर्यंत विविध थरांचे नोकर त्यात होते. पुरुषांची पुरुषांनी व स्त्रियांची स्त्रियांनी मुलाखत घेतली. नवराबायकोंना सारखेच प्रश्न विचारले. पण उत्तरात मात्र तफावत आढळली. पुरुषांची उत्तरे अधिक विश्वसनीय व खरी असल्याचे आढळून आले.

आपण साधने वापरता की नाही, या प्रश्नाला पती व पत्नी दोघांचेही उत्तर एकच असायला हवे की नाही ? पण ११५ जोडप्यांचे बाबतीत असे दिसून आले की, पतीने केलेल्या उत्तराच्या उलट उत्तर पत्नीने दिले. १९४ जोडप्यांत पुरुषांनी आम्ही काही साधने वापरतो असे सांगितले, तर ९४ स्त्रियांनी आम्ही काहीही साधने वापरीत नाही, असे उत्तर दिले. ४१६ नवरे व ३७८ बायकांना एक किंवा अधिक साधनांची माहिती असल्याचे दिसून आले पण तुमच्या जोडीदाराला साधनांची माहिती आहे का, असे विचारता ३७६ बायकांना माहिती आहे असे उत्तर नवऱ्यांनी दिले तर ३२२ नवऱ्यांना माहिती आहे असे बायकांनी सांगितले.

तुमच्या लग्नाला किती वर्षे झाली हा अगदी साधा प्रश्न. पण त्याचेही उत्तर नवरा-बायकोचे एक नव्हते. ५४७ पैकी २१२ म्हणजे निम्म्यापेक्षाही कमी जोडप्यांचे याबाबत एकमत नव्हते. १९४ जोडप्यांनी दिलेल्या उत्तरात फक्त एक वर्षाचा, ६५ जणांच्या उत्तरांत दोन वर्षांचा, पंचवीस जोडप्यांच्या उत्तरांत तीन वर्षांचा, अठरा जणांच्या उत्तरांत चार वर्षांचा आणि पाच जोडप्यांच्या उत्तरांत तर नऊ वर्षांचा फरक आढळून आला. याही प्रश्नाच्या बाबतीत पुरुषांची उत्तरे अधिक बरोबर असल्याचे दिसले.

●

## ऋत्विक घाटक निर्मित

# सुवर्णरेखा

एका लहानशा कथेवर आधारलेला हा चित्रपट पाहताना कुठेही कंटाळवाणा वाटत नाही. दिग्दर्शकाचं कौशल्य त्यामुळं चटकन् नजरेत भरतं.

कथेची पार्श्वभूमी अशी : १९४८-चा काळ ! कलकत्यानजीक निर्वासितांची एक छावणी. निर्वासितांनी मिळेल त्या जागेवर आपल्या झोपड्या उभारलेल्या आहेत. त्या जागेचे मालक मोठे मोठे सावकार आहेत. त्यामुळे साहजिकच ते सावकार त्या गरीब निर्वासितांना छळतात; कारण त्यांनी ती जागा सोडावी. त्या निर्वासितांमध्ये ईश्वर नामक एक तरुण आहे. त्याला त्याच्या बहिणीशिवाय–सीतेशिवाय–ह्या जगात कुणीच उरलेलं नाही.

चित्रपटाच्या सुरुवात होते– काही भाडोत्री गुंड ह्या निर्वासितांना छळण्यास येतात. खूप बायका ते एका ट्रकमध्ये भरतात व घेऊन जातात. आणि उरतो तो फक्त रडण्याचा आवाज ! ईश्वर सीताला जवळ घेऊन ते दृश्य पाहात असतो. मर्द असून परिस्थितीपुढे मान तुकवून नार्मद झालेले पुरुष ते दृश्य नुसतेच पाहात असतात. एक छोटासा मुलगा–अभिराम–ज्याची आई त्या गुंडाने पळवून नेलेली आहे–जोरजोरात रडत असतो. ईश्वरला त्याची दया येते. ईश्वर सीताबरोबर त्याला पण पोटाशी कवटाळतो.

अचानक एके दिवशी ईश्वरला त्याचा जुना कॉलेजमित्र रामविलास भेटतो. रामविलास ईश्वरला एका 'राईस मिल' मध्ये कॅशियरची नोकरी देतो. सुवर्णरेखा नदीच्या तीरावर एक छोटंसं गाव असतं तेथे ती मिल असते. ईश्वर, सीता व अभिरामला घेऊन त्या गावात येतो.

काळ भराभर निघून जातो. सीता व अभिराम आता मोठी होतात. आणि इतक्या दिवसांच्या त्यांच्या मैत्रीचं प्रीतीत रूपांत होतं. अभिरामला इंजिनियरिंगच्या शिक्षणासाठी जर्मनीला पाठवावं असं ईश्वरला वाटत असतं, पण अभिरामचा ओढा लेखनाकडे असतो. एक प्रथितयश लेखक बनावं अशी त्याची इच्छा असते. अभिराम व सीताचं प्रेमप्रकरण ईश्वराच्या लक्षात येतं व इतक्यात......

अभिरामाची आई त्या गावच्या स्टेशनावर मरणोन्मुख अवस्थेत सापडते. तिच्या सांगण्यावरून ईश्वरला कळतं, की अभिराम अनौरस संतती आहे. चिडून जाऊन ईश्वर सीताचं लग्न एका चांगल्या घराण्यातील मुलाबरोबर ठरवितो. सीताला ते लग्न मान्य नसतं. लग्नाच्या दिवशी सीता अभिरामबरोबर कलकत्याला पळून जाते. सीता व अभिरामचं जीवन धकाधकीत सुरू होतं. लेखक म्हणून प्रसिद्धी



दिग्दर्शक घाटक [उभे असलेले]

अभिभट्टाचार्य

माधवी मुकर्जी

मिळविण्यास अभिरामला खूप प्रयास पडतात व अखेर त्याच्या पदरी निराशा येते. गरिबीत दिवस काढताना त्यांना एक मुलगा होतो. त्या मुलाला वाढविण्यासाठी अभिराम ड्रायव्हरची नोकरी पत्करतो. एका प्रवासात त्याच्या मोटारीखाली एक मुलगा येतो; व चिडलेले लोक अभिरामला मारतात. त्यात तो मरण पावतो. आता सीता एकटीच उरते. तिच्या असहाय्य स्थितीचा फायदा घेऊन तिचे शेजारी तिला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात.

इकडे रामविलास गावकऱ्यांमुळे ईश्वरला कामावरून कमी करतो. ईश्वरला दारूचे व्यसन लागते. तो कलकत्त्याला मजा करण्यासाठी येतो. एका दलाला-बरोबर तो वेश्याकडे येतो. ती वेश्या त्याची बहीण सीता असते. तो सीताला व सीता त्याला ओळखते. जवळच पडलेला कोयता घेऊन सीता स्वतः आत्महत्या करते. ईश्वर स्वतः पण आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो, बाहेर सीताचा लहान मुलगा रडत असतो: त्या मुलाचं रडणं ईश्वरच्या कानांवर येतं. त्या लहान मुलाला घेऊन ईश्वर परत सुवर्णरेखाच्या किनारी येतो. सुवर्णरेखा संथपणे वाहातच असते—

चित्रपटात काहीतरी नावीन्य शोधणाऱ्यांना हा चित्रपट नक्कीच आवडेल. एक वास्तववादी चित्रपट म्हणून ह्या चित्रपटाकडे बोट दाखविता येईल.

ऋत्विक घाटक ह्या दिग्दर्शकांनी केलेल्या अप्रतिम दिग्दर्शनाने हा चित्रपट एक उत्कृष्ट चित्रपट झाला आहे. अभिनयाबद्दल तर बोलणे नलगे ! माधवी मुखर्जीची

सीतेची निष्पाप भूमिका सरस वठली आहे. अभिभट्टाचार्य ईश्वरच्या भूमिकेला योग्य न्याय देतात.

ह्या चित्रपट बंगाली भाषेत असल्याने भाषेची अडचण येण्याचा संभव आहे असे खूप मराठी प्रेक्षकांना वाटतं. पण 'महाराष्ट्र टाईम्स' च्या समीक्षकांनी म्हटल्याप्रमाणे ह्या चित्रपटास भाषेची अडचण येत नाही; कारण नुसत्या अभिनयावरून हा चित्रपट आपण समजू शकतो. हे माधवी मुखर्जी, अभिभट्टाचार्य, जोहर रॉय इत्यादींच्या अभिनयाचं फळ आहे. उस्ताद बहादुर खान ह्यांनी दिलेल्या रागदारी संगीतानं धुंद होता येतं. क्षणभर सुवर्णरेखाच्या किनारी गेल्यासारखं वाटतं !

**अभय नाडकर्णी**

## कौटुंबिक जिव्हाळ्याचे चित्र

# काजल

कल्पनालोक ह्या चित्रसंस्थेचे नवे चित्र काजल अनेक दृष्टींनी समाधान देणारे आहे, चित्रपटाच्या कथेत फारसे नावीन्य नसले तरी ज्या पद्धतीने चित्रीकरण केले आहे त्यामुळे चित्रपट शेवटपर्यंत मनोरंजक आहे.

**कथानक**

चित्रपटाची कथा गुलशन नंदा ह्यांच्या 'माधवी' ह्या कादंबरीवरून घेतली आहे. कौटुंबिक सुखापुढे स्वतःचे सुख तुच्छ मानणारी माधवी हे चित्रपटाचे मध्यवर्ती पात्र होय.


माधवी व तिचा भाऊ एका श्रीमंत घरी–घरच्यासारखे राहात असतात. परंतु माधवीचा भाऊ बुडून मरतो व माधवीच्या दुर्दैवास सुरुवात होते. माधवीचे दुःख हलके करण्यासाठी कुटुंबातील कर्ता पुरुष राजेश पुढे होतो. मात्र तो तिला आपली बहीण मानतो. (बहीण-भावांचे हे नाते पुरेसे स्पष्ट केलेले नाही). राजेशचे लग्न झाल्यानंतर माधवीचे आणखीनच हाल सुरू होतात. माधवीचे लग्न घाईघाईने मोतीबाबू ह्या दारूड्याशी लावले जाते. पुढे हाच मोतीबाबू इस्टेटीचा खरा वारस ठरतो तर राजेश हा केवळ मुनीमाचा मुलगा असल्याचे सिद्ध होते. शेवटी सर्व गोष्टींचा खुलासा होऊन कथेचा शेवट सुखान्त होतो. वास्तविक कथेत नावीन्य कमीच आहे. पटकथाकार म्हणून फणी मुजुमदार व संवाद–लेखक म्हणून केदार शर्मा ह्यांनी काम केले आहे. परंतु ह्या रथी-महारथींनी म्हणण्याजोगी कामगिरी मात्र केलेली नाही.

एका स्त्रीची महती सांगणारा हा चित्रपट स्त्री-वर्गाच्या विशेष पसंतीस उतरेल असे वाटते.

**शरद गोखले**


— ही आमची 'बचत योजना'!
परदेशी दौरे
बाळांनो! सुखी राहा !!
नोकर कपात
राजेंद्र गायकवाड

MANOOS (Fortnightly) : 1 Jan. 1966 : 30 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर